कर्नाटक सरकार

# समाज विज्ञान

## भाग - II

## मराठी माध्यम

## (सुधारित)

# 7

## इयत्ता सातवी

कर्नाटक पाठ्यपुस्तक संघ (रजि.)
100 फूट रिंग रोड, बनशंकरी 3 रा टप्पा
बेंगळूरु - 560 085.

## अनुक्रमणिका


| पाठ क्रमांक | इतिहास | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| 1 | भारतात युरोपियनांचे आगमन | 1 |
| 2 | भारतात ब्रिटिशांच्या सत्तेचा विस्तार | 8 |
| 3 | ब्रिटिश सत्तेचा परिणाम | 18 |
| 4 | सामाजिक आणि धार्मिक सुधारणा | 29 |
| 5 | स्वातंत्र्य चळवळ | 42 |
| 6 | कर्नाटक – समाजाभिमुख चळवळी | 81 |
| 7 | कर्नाटक–आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन | 93 |
| 8 | महिला स्वातंत्र्य सेनानी | 98 |
| 9 | कर्नाटकाचे एकीकरण आणि सीमा वाद | 106 |
| | नागरिक शास्त्र | |
| 10 | आपली संरक्षण दले | 114 |
| 11 | संविधान दुरुस्ती | 122 |
| | भूगोल विज्ञान | |
| 12 | ऑस्ट्रेलिया – अत्यंत समतल भूखंड | 125 |
| 13 | अंटार्क्टिका – पांढरा भूखंड | 143 |

| पाठ 1 | भारतात युरोपियनांचे आगमन |
| --- | --- |

## पाठाचा परिचय

17 मे 1498 रोजी वास्को द गामा केरळमधील कालिकत येथे पोहोचला आणि त्याने भारताला जाणारा नवीन जलमार्ग शोधून काढला. हेच युरोपियनांचे भारताला येण्याचे कारण झाले. या जलमार्गाच्या शोधामुळे पोर्तुगीज, डच, इंग्रज आणि फ्रेंच हे व्यापारासाठी भारतात आले.

## सामर्थ्ये

1) भारतातील युरोपियनांच्या प्रारंभीच्या घडामोडी समजून घेणे.
2) भारतात युरोपियनांच्यात झालेला संघर्ष समजून घेणे.
3) भारतात आलेल्या युरोपियनांच्या व्यापारी कंपन्यांचा परिचय करून घेणे.
4) शेवटी इंग्रजांची सत्ता भारतात स्थिर होण्याची कारणे कोणती याची यादी करणे.
5) भारताच्या नकाशात युरोपियनांची व्यापारी केंद्रे दर्शविणे.

## पोर्तुगीज (सा.श. 1498–1961)

17 मे 1498 रोजी वास्को द गामा याने केरळच्या कालिकत येथे पोहोचला आणि त्याने भारताला येण्याचा नवीन जलमार्ग शोधून काढला. या जलमार्गाच्या सहाय्याने भारतात पोहोचलेले पहिले युरोपियन म्हणजे पोर्तुगीज होत. वसाहती, साम्राज्याचा विस्तार करणे, ख्रिस्त धर्माचा प्रचार करणे ही त्यांची मुख्य ध्येये होती.

### पोर्तुगीजांच्या उत्कर्षाची कारणे

- कालिकतचा राजा झामोरीन याने पोर्तुगीज खलाशी वास्को द गामा याला व्यापाराची अनुमती दिली.

- सा.श. 1509 मध्ये अल्बुकर्क याची भारताचा गव्हर्नर जनरल (व्हाईसराय) म्हणून नेमणूक झाली. याने सा.श. 1510 मध्ये विजयनगरच्या सुलतानाकडून गोवा जिंकून घेतले. पोर्तुगीज भारत सोडून जाई पर्यंत गोवा ही त्यांची राजधानी होती.
- अल्बुकर्क नंतर आलेल्या गव्हर्नरांनी दीव, दमण, साल्सेट, बेस्सीन, चौल, मुंबई, सॅनथोम आणि बंगालमधील हुगळी येथे आपल्या वसाहती स्थापन केल्या.

## पोर्तुगीजांच्या अधोगतीची कारणे

- बलवान नौकादळ असलेले डच आणि इंग्रज हे पोर्तुगीजांचे प्रबल प्रतिस्पर्धी होते.
- पोर्तुगीज सरकारच्या नोकर वर्गाने भ्रष्टाचार केल्यामुळे त्यानी विश्वास गमावला. त्यामुळे त्याचे सरकार हीन स्थितीला पोहोचले.
- धार्मिक असहिष्णूता हेच पोर्तुगीजांच्या अधोगतीचे प्रमुख कारण ठरले. पोर्तुगीजांनी येथील विविध धर्मातील लोकांचे बळजबरीने धर्मांतर केले.
- विजयनगरच्या साम्राज्याची अधोगती झाल्याने त्यांचा व्यापार कुंठीत झाला.

फ्रान्सिस्को डी अल्मेडा हा भारतातील पोर्तुगीजांचा पहिला व्हाइसराय (गर्वनर) होय. भारतात सर्व प्रथम आलेले युरोपियन म्हणजे पोर्तुगीज आणि भारतातून सर्वात शेवटी गेलेले युरोपियन म्हणजे पोर्तुगीजच होत. शेवटी पर्यंत गोवा, दीव, आणि दमण एवढयाच ठिकाणी पोर्तुगीजांची सत्ता होती. ब्रिटीश सत्तेचा शेवट 1947 मध्ये झाला तरी पोर्तुगीजांनी आपली सता सोडली नाही. गोवा मुक्तीसाठी तेथील भारतीयांनी अहिंसात्मक रितीने चळवळ केली. परंतु चळवळ करणाऱ्यांना अमानुष हिंसा सहन करावी लागली. शेवटी सा.श. 1961 मध्ये भारतीय सैन्याने पोर्तुगीजांना गोव्यातून पळवून लावले आणि गोवा मुक्त केले.

## डच (सा.श. 1596-1792)

पोर्तुगीजानंतर भारतात आलेले युरोपियन म्हणजे डच होत. ते नेदरलॅन्ड देशाचे प्रमुख होते. सा.श. 1602 मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. या कंपनीने पूर्वेकडील देशांबरोबर व्यापार करण्याचा परवाना मिळविला. या प्रदेशात युद्ध करण्याचा, शांती करार करण्याचा अधिकार मिळविला. 'पुलिकत' ही डचांची राजधानी होती.

### डचांची व्यापारी केंद्रे

भारतातील आग्रा, मच्छलीपट्टण, सुरत, कारकल, नागपट्टण, कोची इत्यादी ठिकाणी डचांची व्यापारी केंद्रे होती.

### डचांची अधोगती

डच हे इंग्रजांशी संघर्ष करू लागले. परंतु इग्रजांनी डचांचा पराभव केला. भारतातील इंग्रजांचे आक्रमण थोपविणे शक्य न झाल्याने त्यानी आपला मोर्चा आग्नेय आशियातील बेटांकडे वळविला.

**आग्नेय आशियातील बेटे :** इंडोनेशिया, मलाया, थायलँड, फिलिफाइन्स, कंबोडिया.

## इंग्रज (सा.श. 1600-1947)

इंग्रजांनी शांततापूर्ण मार्गाने व्यापार करणे हीच आपली नीती आहे. याचेच अनुकरण ते सतत करत आले. परंतु भारतातील दिशाहिन राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन राजकीय सार्वभौमत्व स्थापन केले.

इंग्लंडमधील व्यापाऱ्यांनी पूर्वेकडील देशांबरोबर व्यापारी संपर्क ठेवण्यासाठी सा.श. 1600 मध्ये 'ईस्ट इंडिया कंपनी' स्थापन केली. एलिझाबेथ राणीच्या परवानगीने भारताबरोबर व्यापारी संपर्क वाढविला.

प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनीची जहाजे सुरत बंदरावर थांबत असत. सा.श. 1615 मध्ये सर थॉमस रो यांनी मोगल सम्राट जहांगीर याच्याकडून सूरत मध्ये व्यापार करण्याची परवानगी मिळविली. नंतर आग्रा, अहमदाबाद आणि भडोच येथे आपली व्यापारी केंद्रे सुरू केली. त्यानंतर मद्रास, कलकत्ता आणि मुंबई येथे व्यापारी वखारी स्थापन केल्या. कलकत्ता ही ब्रिटिशांची पहिली राजधानी होती.

दिवसे दिवस ईस्ट इंडिया कंपनीला व्यापारात भरपूर फायदा झाला आणि तो वाढतच गेला. मोगल सम्राट फारूक सिया यांचे कडून बंगाल प्रांत (सध्याचे बंगाल, बिहार व ओरिसा) आणि सुरत मध्ये जकात मुक्त (करमुक्त) व्यापार करण्याची परवानगी 'दस्तक' मिळविला. त्यामुळे इंग्रज व्यापारी स्थानिक व्यापाऱ्यांपेक्षा बलवान झाले.

'दस्तक' म्हणजे इंग्रज व्यापाऱ्यांना भारतात करमुक्त व्यापार करण्यासाठी दिलेला विशेष परवाना होय.

ब्रिटिशांनी आपले प्राबल्य वाढविण्यासाठी आपल्या वसाहती भोवती तट उभारले. त्याच्या रक्षणसाठी सैनिक आणि तोफा ठेवण्यास सुरूवात केली. लवकरच इंग्रजांचे सैन्यबल प्रबळ झाले.

## फ्रेंच (सा.श. 1664–1954)

फ्रेंच हे व्यापारासाठी भारतात आलेले शेवटे युरोपियन होत. त्यानी सा.श. 1664 मध्ये 'फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची' स्थापना केली. फ्रेंचानी आपली व्यापारी वखार सा.श. 1668 मध्ये सूरत येथे सुरू केली. त्यानंतर अल्प कालावधितच भारताच्या विविध भागात आपली व्यापारी केंद्रे स्थापन केली.

**फ्रेंचांची व्यापारी केंद्रे** पाँडिचेरी, मच्छलीपट्टण, कालिकत, माहे, कारकल आणि चंद्रपूर या ठिकाणी आपली व्यापारी केंद्रे सुरू केली. पाँडिचेरी ही फ्रेंचांची राजधानी होती.

फ्रेंच गव्हर्नर म्हणून आलेल्या डुप्ले यांच्या चातुर्यामुळे हैद्राबाद आणि कर्नाटक (तामिळनाडूचा पूर्वभाग) राज्यातील फ्रेंचांचा प्रभाव अधिक वाढविला. भारतात व्यापारासाठी आलेल्या ब्रिटिश आणि फ्रेंच यांच्यात राजकीय तसेच व्यापारात विकासासाठी (वाढीसाठी) अनेक युद्धे झाली. त्यांना कर्नाटकची युद्धे म्हणून ओळखले जाते.

## फ्रेंचांच्या अधोगतीची कारणे

- भारतातील फ्रेंच सैन्य प्रमुखांना फ्रान्स सरकारने पूर्ण पाठींबा दिला नाही.
- फ्रान्समध्ये राजकीय गोंधळ आणि क्रांती घडून आल्या. हे भारतातील त्यांच्या अधोगतीचे कारण ठरले.
- फ्रेंच नौकादळ हे ब्रिटिश नौकादळाइतके प्रबळ नव्हते.

## कालगणना

| | |
|---|---|
| ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी | : 1600 |
| डच ईस्ट इंडिया कंपनी | : 1602 |
| फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी | : 1664 |


भारत 1765
युरोपियन व्यापारी केंद्र
दिल्ली
गंगा
यमुना
कोरा
अलाहाबाद
बक्सार
पाटणा
प्लासी
मुर्शिदाबाद
चंद्रनगर
कलकत्ता
नर्मदा
दीव(P)
सुरत(Br)
दमन(P)
तापी
मुंबई(Br)
गोदावरी
हैदराबाद
बलासोरेस(Br)
नार्दर्न सरकार
बंगालचा उपसागर
अरबी समुद्र
मछलीपट्टन
ब्रिटिश ईस्ट इंडीया कंपनी
P पोर्तूगीज
Fr फ्रेंचा
Du डच
Br ब्रिटिश
गोवा(P)
कर्नाटक
पुलीकत(Du)
मद्रास(Br)
पॉडीचेरी(Fr)
पोर्टोनोवो(Du)
माहे(Fr)
त्रिचनापल्ली
कारकल(Fr)
कोचीन(Du)
तंजोर
नागपट्टम(Du)
N
हिंदी महासागर

## अभ्यास

### I. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1) भारतात व्यापारासाठी समुद्रमार्गाने सर्वप्रथम आलेले युरोपियन कोण?

2) भारताला येण्याचा जलमार्गाचा शोध कोणी लावला?

3) डचांची राजधानी कोणती?

4) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केव्हा झाली?

5) फ्रेंचांची व्यापारी केंद्रे कोणती? ते सांगा.

6) ब्रिटिशाना दस्तक हक्क दिलेला मोगल राजा कोण?

### II. खालील प्रश्नांची उत्तरे गटात चर्चा करून लिहा.

1) भारतात पोर्तुगीजांच्या अधोगतीच्या कारणांची यादी करा.

2) भारतात फ्रेंचांच्या अधोगतीची कारणे कोणती?

### III. खालील अ गटातील संबंधित ब गटातील विषयांच्या जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| पोर्तुगीज | पाँडिचरी |
| डच | कलकत्ता |
| फ्रेंच | पुलिकत |
| ब्रिटिश | गोवा |

### कृती

भारताचा नकाशा काढून युरोपियनाच्या आरंभिच्या वसाहती दाखवा.

☆ ☆ ☆

| पाठ 2 | भारतात ब्रिटिशांच्या सत्तेचा विस्तार |
|---|---|

## पाठाचा परिचय

ब्रिटिश आणि फ्रेंच यांचे सैन्य सामर्थ्य, राजकीय महत्वाकांक्षा तसेच स्थानिक राजांचा अंतरकलह या सर्व गोष्टीनी युद्धांना प्रेरणा दिली. त्यामुळे ब्रिटिशांनी भारतात अनेक युद्धे केली. चतुराईने आणि कुटील नितीमुळे कर्नाटक आणि बंगालमध्ये सा.श. 1857 पर्यंत आपले अधिपत्य स्थापन केले होते.

## सामर्थ्ये

1) भारतात ब्रिटिशांच्या राजकीय उत्कर्षासाठी सहायक गोष्टी समजून घेणे.

2) प्लासी व बक्सारच्या लढाईची कारणे व परिणाम समजून घेणे.

3) कर्नाटकच्या युद्धाची कारणे व परिणाम समजून घेणे.

4) सहाय्यक सैन्य पद्धतीचा अर्थ, करार याची माहिती समजून घेणे.

5) दत्तक पुत्राना हक्क नाही ही निती समजून घेणे.

## प्लासीची लढाई (सा.श. 1757)


सिराज-उद-दौल

बंगाल हा मोगल साम्राच्याचा समृद्ध प्रांत होता. त्याचा प्रांताधिकारी असलेला अलिवर्दीखान हा मोगल साम्राज्य अधोगतीच्या मार्गावर असताना तो स्वतंत्र झाला. त्याच्या नंतर सिराज-उद-दौल हा बंगालचा नवाब बनला.

नवाब सिराज-उद-दौल हा तरूण युवक होता. त्यामुळे इंग्रजानी त्याला बाजूला ठेवून त्याची परवानगी न घेताच कलकत्ता येथे 'पोर्ट विलियम किल्ला' मजबूत केला. तसेच त्यांच्या व्यापारातील सवलतीचा दुरुपयोग करु लागले.

## प्लासीच्या लढाईची कारणे

इंग्रज आपला आदेश न पाळता आपल्या शत्रूबरोबर हात मिळवणी करून गैर व्यवहार करताहेत असा समज सिराज उदौलाने करून घेतला. त्यामुळे त्याने इंग्रजांचे किल्ले ताब्यात घेतले. हेच पुढे प्लासीच्या लढाईचे कारण ठरले.

नवाब सिराज उदौलाच्या चढाईची वार्ता समजताच मद्रासमधील कंपनीचा अधिकारी रॉबर्ट क्लाईव्हच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी कलकत्याला सैन्याची रवानगी केली. बंगालच्या परिस्थितीचा विचार करून क्लाईव्हने नवाबाविरुद्ध खलबत करण्यास सुरूवात केली. सिराज उदौलाचा सेनापती मीर जाफरला नवाबगीरीची आशा दाखवून क्लाईव्हने गुप्त करार केला.

नवाबचा सेनापती मीर जाफरने नवाबगीरीच्या आशेने इंग्रजांबरोबर करार केला. त्या कराराप्रमाणे नवाब झाल्यावर ताबडतोब इंग्रजांना 175 लाख रूपये दिले पाहिजे असे ठरले. या गैर व्यवहारामध्ये अमिनचंद या व्यापाऱ्याने मध्यस्ती केली.


रॉबर्ट क्लाईव्ह


मीर जाफर

ब्रिटिश आणि सिराज उदौला यांच्यामध्ये प्लासी येथे 23 जून 1757 रोजी युद्ध सुरू झाले. यामध्ये मीर जाफरने ब्रिटिशांना मदत केली. अखेर सिराज उदौलाचा पराभव झाला आणि त्याला ठार मारण्यात आले. मीर जाफरच्या फितूरीमुळे इंग्रजांचा विजय झाला आणि ब्रिटिश वसाहत शाहीची स्थापना झाली.

### परिणाम

आधुनिक भारताच्या इतिहासात प्लासीची लढाई ही एक निर्णायक लढाई झाली आहे. या युद्धात सिराज उदौलाच्या पराभवाने इंग्रजांनी बंगालच्या राजकारणात महत्वाचे स्थान मिळविले.

* ब्रिटिशांच्या कृपेने मीर जाफर बंगालचा नवाब झाला परंतु तो बिटिशांच्या हातातील बाहुले बनला.
* ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने अपार संपत्ती आणि परगण्यांची जमीनदारी हक्क (जहांगीरी) मिळविले. 24 परगणा म्हणजे जिल्हयांचा जमीनदारी हक्क मिळविला.
* प्लासीची लढाई पुढे बक्सारच्या लढाईस कारणीभूत ठरली.
* व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजांनी तेव्हा पासून शासन व्यवस्था चालविण्याचा अधिकार मिळविला.
* प्लासीची लढाई भारतात ब्रिटिशांचे साम्राज्य स्थापनेची नांदी ठरली.

### बक्सारची लढाई (सा.श. 1764)

ब्रिटिशांच्या अनंत मागण्या पुरविण्यास दीर्घकाळापर्यंत मीर जाफर असफल झाला. त्यावेळी ब्रिटिशांनी त्याला बंगालच्या नवाब पदावरून पदच्यूत केले व त्याचा जावई मीर कासिम याला बंगालचा नवाब बनविले.

**कारणे** मीर कासिम हा स्वतंत्र विचारसरणीचा होता. त्याने दस्तकचे परिशीलन केले. ब्रिटिश जकात मुक्त (करमुक्त) व्यापार परवान्याचा गैरवापर करत आहेत हे त्याच्या लक्षात येताच त्याने बंगालचा संपूर्ण व्यापार जकात मुक्त केला. त्यामुळे भारतीय व्यापाऱ्यांच्या स्पर्धेला ब्रिटिशांना सामोरे जावे लागले. त्यामुळे मीर कासिमला नवाब पदावरून काढून टाकण्यात आले व पुन्हा मीर जाफरच्या हाती बंगालची सत्ता सोपविण्यात आली.

यामुळे मीर कासिमच्या मनात सूडाची भावना निर्माण झाली. औंध संस्थानाचा नवाब षूजा-उद्-दौल आणि मोगल बादशहा दुसरा शहा आलम याच्याशी मैत्री वाढविली. अशाप्रकारे त्याच्या सहाय्याने बंगालची सत्ता पुन्हा आपल्या हाती घेण्यासाठी ब्रिटिशांशी सा.श. 1764 मध्ये युद्धाची घोषणा केली. हीच प्रसिद्ध अशी बक्सारची लढाई होय. या युद्धात हेक्टर मन्रो याच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्याने मीर कासिमच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला. षूजा-उद-दौला याने रोहिलखंडात आश्रय घेतला. दुसरा शहा आलम ब्रिटिशांच्या आश्रयाला गेला.

**परिणाम**

- मीर कासिमने युद्ध भूमीतून पलायन केले.
- मीर जाफर पुन्हा बंगालचा नवाब बनला.
- बक्सारच्या युद्धाने बंगालमधील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराला स्थिरता आली.
- या युद्धामुळे इंग्रजांना आपल्या प्रभावाचा विस्तार बंगालपासून अलाहाबादपर्यंत करण्याची संधी मिळाली.
- मोगल राजा दुसरा शहा आलम यांचे कडून बंगाल प्रांतात दिवाणी हक्क (महसूल जमा करण्याचा) मिळविला.
- सा.श. 1765 मध्ये मीर जाफरच्या मृत्यूनंतर निजाम उदौला हा बंगालचा नवाब झाला.

## कर्नाटकाच्या लढाया (सा.श. 1746-1763)

कर्नाटक हा मोगल साम्राज्याचाच एक प्रांत होता. कोरोमंडल किनारा. (सध्याचे तमिळनाडू आणि आंध्रप्रदेशाचा किनारपट्टीचा प्रदेश) आणि त्याच्या मागील प्रदेशाला युरोपियन कर्नाटक (Carnatic) असे म्हणत असत.

ब्रिटिश आणि फ्रेंच यांच्या मध्ये दक्षिण भारतातील व्यापाराच्या वर्चस्वासाठी स्पर्धा चालली होती. अल्पावधित त्या स्पर्धेचे रूपांतर युद्धात झाले. या पार्श्वभूमीवरून झालेल्या तीन लढायाना या कर्नाटक प्रदेशाची भूमिका महत्वाची होती. त्यामुळे या लढायांना कर्नाटकच्या लढाया म्हणून ओळखले जाते.

## पहिले कर्नाटक युद्ध (सा.श. 1746-1748)

### कारणे

* भारतामध्ये इंग्रज आणि फ्रेंच यांच्यामधील व्यावहारिक मत्सर, संघर्ष आणि राजकीय महात्वाकांक्षा युद्धास कारणीभूत ठरली.
* युरोप खंडात, ऑस्ट्रियाच्या उत्तराधिकारी पदाच्या कारणासाठी इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यात युद्ध सुरू झाले. हे भारतात आलेल्या या दोघांच्या युद्धाचे कारण झाले.

अर्काट ही कर्नाटक संस्थानची राजधानी होती. इंग्रजांनी आग्नेय किनारपट्टी जिंकुन घेऊन फ्रेंचांच्या ताब्यात असलेल्या पाँडिचेरीवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. याचा बदला घेण्यासाठी फ्रेंच गव्हर्नर डुप्ले याने मद्रास जिंकून घेतले. इंग्रजांनी कर्नाटकचा नवाब अन्वरुद्दीन याचे सहाय्य मिळविले. नवाबला मद्रास पुन्हा आपल्या ताब्यात घेण्यासाठी पाठविले पण या लढाईत नवाबचा पराभव झाला. एवढयात युरोपमध्ये इंग्रज आणि फ्रेंच यांच्यातील युद्ध थांबले व करार झाला. आणि हा करार भारतातील ब्रिटिश व फ्रेंच यानाही लागू झाला.

| |
|---|
| पहिल्या कर्नाटक युद्धात फ्रेंचानी आपले वर्चस्व राखले हे एक्स-लॉ-चापेल करारानुसार संपुष्टात आले. |

### परिणाम

- मद्रास इंग्रजांच्या स्वाधिन झाले.
- फ्रेंचानी अर्काटमध्ये आपले स्थान प्रबळ केले. त्यामुळे डुप्लेची प्रतिष्ठा वाढली.
- परस्परांनी युद्ध कैद्याना सोडून दिले.

## दुसरे कर्नाटक युद्ध (सा.श. 1749–1754)

### कारणे

- अर्काट आणि हैदराबादमध्ये राज्याच्या वारसाची समस्या उद्‌भवली ही युद्धाचे प्रमुख कारण ठरले.
- अर्काटमध्ये चंदासाहेब आणि अन्वरूद्दीन तसेच हैद्राबादमध्ये नासिरजंग आणि मुजाफरजंग यांच्या मध्ये सिंहासनासाठी संघर्ष सुरू झाला.
- डुप्ले यांनी चंदासाहेब आणि मुजफरजंग याना गुप्तपणे भेटून एक करार केला. त्यांच्या सहाय्याने अन्वरूद्दीनचा पराभव केला व त्याला ठार मारले. त्याच्या मुलगा महंमद अली तिरुचनापल्ली येथे पळून गेला.

त्यानंतर चंदासाहेब अर्काटचा व मुजफरजंग हैद्राबादचा नवाब होण्यास फ्रेंचानी सहाय्य केले. काही काळानंतर मुजफरजंग मारला गेला. त्याच्या जागी फ्रेंचानी सलाबत जंगला नवाब बनविले. त्यामुळे क्रोधित झालेल्या इंग्रजांनी रॉबर्ट क्लाईव्ह यांच्या नेतृत्वाखाली अर्काटवर चढाई केली व अर्काट नगरावर आपला ताबा मिळविला. चंदासाहेबला ठार केले. त्याशिवाय महंमद अली याला अर्काटचा नवाब बनविले. या युद्धानंतर डुप्ले याला फ्रेंच सरकारने आपल्या देशाला परत बोलावून घेतले. 1754 ला पाँडिचेरी करार झाला व युद्धाचा शेवट झाला.

### परिणाम

* अर्काटमध्ये फ्रेंचांचा प्रभाव कमी झाला.
* ब्रिटिशांनी महसूल जमा करावयाचा तसेच सैन्याची तुकडी (तैनाती फौज) ठेवण्याचा हक्क मिळविला.

दुसऱ्या कर्नाटक युद्धाच्या शेवटी इंग्रजांनी अर्काटमध्ये व फ्रेंचानी हैद्राबादमध्ये आपली सत्ता राखून ठेवली.

## तिसरे कर्नाटक युद्ध (सा.श. 1758-1763)

### कारणे

युरोपमध्ये सप्तवार्षिक युद्धास सा.श. 1756 मध्ये सुरूवात झाली. याचाच परिणाम म्हणून भारतामध्येही फ्रेंच आणि इंग्रज यांच्यात तिसरे कर्नाटक युद्ध सुरू झाले.

सा.श. 1760 मध्ये इंग्रज सेनापती सर ऐरकोटनी आणि फ्रेंच गव्हर्नर कौंट-डी-ल्याली यांच्यात पाँडिचेरी जवळ वांडिवाष येथे युद्ध झाले. या युद्धात फ्रेंचांचा पराभव झाला. फ्रेंच इंग्रजांना शरण आले. युरोपमध्ये यावेळी सप्तवार्षिक युद्धाची समाप्ती झाली व पॅरीस करार झाला. याचाच परिणाम म्हणून भारतातही युद्धाची समाप्ती झाली.

### परिणाम

- भारतात फ्रेंचांच्या राजकीय आणि सैनिक सत्तेचा शेवट झाला.
- भारतात इंग्रज हे युरोपमधील प्रबळ सत्ताधारी म्हणून समोर आले.

## सहाय्यक सैन्य पद्धती (1798)

ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली याने सहाय्यक सैन्य पद्धती अंमलात आणली. ही योजना ब्रिटिश सत्तेचा विस्तार आणि भारतावरील ब्रिटिशांचे राजकीय नियंत्रण दृढ ठेवण्यास एक महत्वाची योजना ठरली.

आपल्या शेजारच्या राजाकडून आक्रमण होऊ नये म्हणून ब्रिटिश सैन्याचे सहाय्य घेण्यासाठी भारतीय राजाना प्रवृत केले. काही राजावर याबाबत जबरदस्ती करण्यात आली.



**लॉर्ड वेलस्ली**

### सहाय्यक सैन्य पद्धतीच्या अटी

* ही पद्धत स्वीकारलेल्या राजांना ब्रिटिशांचे सैन्य आपल्या राज्यात ठेवून घ्यावे लागत होते.
* याच्या मोबदल्यात सैन्याला खर्चासाठी लागणारी रोख रक्कम ब्रिटिशांना द्यावी लागे.
* ब्रिटिश सैनिकांची एक तुकडी आपल्या पदरी ठेवून त्यांना लागणारा खर्च राजानी करावा लागत असे.

### सहाय्यक सैन्य पद्धतीचे परिणाम

* सैन्यासाठी अफाट खर्च केल्यामुळे भारतीय राजे आर्थिक दृष्या दुर्बळ झाले.
* ब्रिटिशांनी बराच भू-भाग आपल्या कब्जात घेतला.
* ही पद्धत मान्य केलेल्या राजानी आपला सर्वाधिकार गमावला.

सहाय्यक सैन्य पद्धत मान्य केलेली राज्ये: हैद्राबाद, मैसूरु, तिरुवांकूर, बडोदा, जयपूर, जोधपूर, भरतपूर, नागपूर, ग्वालीयर, औंध, तंजावर, सूरत इत्यादी.

### दत्तक पूत्राला हक्क नसलेली नीती (1848)

ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी याने दत्तक पूत्राला हक्क नाही ही नीती अंमलात आणली. कोणत्याही भारतीय राजाला पुत्र नसेल तर दत्तक घेतलेल्या मुलाला त्याचा वारस म्हणून हक्क मिळणार नाही असे डलहौसीने घोषित केले.


**लॉर्ड डलहौसी**

पूत्र नसलेल्या राजाचा मृत्यू झाल्यास त्यांची राज्ये ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आली. भारतामध्ये प्राचीन काळापासून दत्तक पूत्र वारसा ही पद्धत आचरली जात होती. या परंपरेला ही नीती विरोधक ठरली.

### परिणाम

* ✻ या कुटील नीतीमुळे औंध, सातारा, नागपूर, आणि झाशी इत्यादी राज्ये थेट ब्रिटिशांच्या ताब्यात गेली.
* ✻ सा.श. 1856 मध्ये डलहौसी आपल्या देशाला परत गेला. तेव्हा भारताचा दोन-तृतियांश (2/3) भू-प्रदेश इंग्रजांच्या सतेखाली आला होता.

### कालगणना

| | | |
|---|---|---|
| प्लासीची लढाई | : | 1757 |
| बक्सारची लढाई | : | 1764 |
| कर्नाटकची युद्धे | : | 1746 ते 1763 |
| सहाय्यक सैन्य पद्धत | : | 1798 |
| दत्तक पूत्र हक्क नामंजूर निती | : | 1848 |

## अभ्यास

### I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दाच्या सहाय्याने पूर्ण करा.

1) प्लासीच्या लढाईनंतर ................. हा बंगालचा नवाब झाला.

2) बक्सारच्या युद्धात ................ या मोगल राजाने भाग घेतला होता.

3) दुसऱ्या कर्नाटक युद्धाचा शेवट ................. या कराराने झाला.

4) वांडिवाष युद्ध ................ मध्ये झाले.

## II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1) बक्सारची लढाई कोणाकोणामध्ये झाली?

2) कर्नाटक युद्धात शेवटी कोणाचा विजय झाला?

3) सहाय्यक सैन्य पद्धत कोणी अंमलात आणली?

4) दत्तक पुत्राना हक्क नाही ही नीती कोणी अंमलात आणली?

## III. गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) बक्सारच्या लढाईचे परिणाम कोणते?

2) प्लासीच्या लढाईची कारणे कोणती?

3) सहाय्यक सैन्य पद्धतीचे परिणाम सांगा.

4) दत्तक पुत्राला हक्क नाही या नितीमुळे भारतातील कोणती राज्ये इंग्रजांच्या ताब्यात गेली?

☆ ☆ ☆

| पाठ 3 | ब्रिटिश सत्तेचा परिणाम |
|---|---|

## पाठाचा परिचय

1600 ते 1757 पर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी केवळ व्यापारी कंपनी होती. व्यापारी हित साधण्यासाठी आलेल्या ब्रिटिशानी हळू हळू राजकीय मोह वाढविण्यास प्रारंभ केला. सुरवातीला भारताच्या विविध राजकीय ठिकाणी विनंती करून व्यापाराची मुभा मिळविली. त्यानंतर त्यानी विनंतीचे सूत्र बदलून युद्धाचे तंत्र सुरू केले. यामुळे इंग्रज राजकीय दृष्ट्या बलाढ्य झाले. युद्ध करून मिळविलेला भारत शहाणपणाने आपल्या नियंत्रणाखाली आणला आणि त्यानंतर दूरदर्शी उपायांची योजना केली. दूरगामी स्वप्नांचा विचार करून राजकीय सुधारणा करणे हा मार्ग त्यानी अवलंबिला. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात विविध कायदे अंमलात आणले. इंग्रजानी स्वतःच्या हितरक्षणासाठी हे कायदे केले. परंतू अंमलात आणलेले कायदे 'सुधारणा' म्हणून इंग्रजानी प्रसार केला. प्रारंभिक काळात भारतीयानी यावर विश्वास ठेवला. इंग्रजानी अंमलात आणलेल्या सुधारणामुळे भारतीय समाजावर चांगला परिणाम झाला असला तरी तो आकस्मिक असा परिणाम होता. असे आम्ही समजूया. या पाठात सुधारणांना संबंधित चार क्षेत्रांची निवड करून विवेचन केले आहे. महसूल, इंग्लिश शिक्षण, आर्थिक प्रभाव आणि सामाजिक सुधारणा ही ती चार क्षेत्रे होय.

## सामर्थ्ये

1) महसूल व्यवस्थेत अंमलात आलेली कायम जमीनदारी पद्धत, महलवारी पद्धत, रयतवारी पद्धत यांची वैशिष्ट्ये समजून घेणे.

2) भारतात प्रवेश केलेल्या इंग्लिश पद्धतीची माहिती करून घेणे.

3) आर्थिक प्रभावांची यादी करणे.

4) समाजातील सुधारणा जाणून घेणे.

## 1.भूमहसूल व्यवस्था

एका निर्दिष्ठ प्रमाणामध्ये महसूल सरकारच्या खजिन्यात जमा करावा असा दंडक होता. कारण भारतात झालेल्या युद्धांचा खर्च भरून काढणे, भरपूर पगार मिळविणाऱ्या हजारो ब्रिटिश नोकरांचा पगार देणे आणि इतर उद्देशासाठी कंपनीला पैशाची फार गरज होती. त्यासाठी कंपनीचे भारतातील शेतकऱ्याकडून दुप्पट जमीन कर वसूल केला.

आपल्या अधिकाराच्या काळात वॉरन हेस्टिंग्जने कर वसूलीसाठी लिलाव करण्याची व्यवस्था सुरू केली. लिलावाच्या वेळी जमीनदार परस्पर ईर्षेने जादा रक्कम कर देण्यासाठी बोली बोलून मान्य करत पण वसूली करण्याच्या कार्यात विफल झाले. महसूलाचे प्रमाण अधिक वाढत गेले. परिणामी ब्रिटिशाना या समस्येचे निवारण करण्यासाठी त्यानी तीन महसूल पद्धतींचा अवलंब केला.

### कायम जमीनदारी पद्धत (सा.श. 1793)



गव्हर्नर जनरल कॉर्नवालीसने बंगाल, बिहार, ओरिसा येथे भू-महसूलामध्ये कायम स्थिरता यावी या हेतूने महसूल निर्दिष्ठ करण्याचे ठरविले. महसूल गोळा करण्याच्या संदर्भात कॉर्नवालीसने जमीनदाराबरोबर करार केला. यालाच कायम जमीनदारी पद्धत असे म्हणतात. कायम जमीनदारी पद्धतीमध्ये जमीनदार ब्रिटिश सरकारच्या दलालाप्रमाणे कार्य करत होते. कंपनीने ठरविलेला जमीन कर कायम झाला. त्यामुळे सरकारला निर्दिष्ट प्रमाणात उत्पन्न मिळण्याची निश्चित सोय झाली. महसूल वसूल करण्याचा खर्च कमी झाला. जमीनीचा कर वसूल करणारे शेतकरी जमीनदार झाले. ते सरकारच्या अनेक कठीण प्रसंगी सरकारला पाठीबा देत असत. आपल्याला पाठींबा देण्यासाठी आपले समर्थन करण्यासाठी असे अनेक वर्ग ब्रिटिशानी निर्माण केले.

### शेतकऱ्यावर झालेले परिणाम

कर मिळविण्याच्या उद्देशाने जमीनदार शेतकऱ्यावर दबाव आणत असत. जमीनदारानी शेती उत्पन्न वाढविण्यासाठी आस्था दाखविली नाही. जरी पीक मिळाले नाही तरी शेतकऱ्याला कर भरावाच लागे. एकंदरीत कायम जमीनदारी पद्धतीमुळे शेतकरी संकटग्रस्त झाले. आपल्या जमीनीत पाहिजे असलेली व्यापारी पिके पिकविण्यासाठी बळजबरी करण्यात आल्यामुळे शेतकरी पून्हा अधिक गरीब झाले. या कारणामुळे शेतमजूरांची संख्या जास्त प्रमाणात वाढू लागली.

### 2. रयतवारी पद्धत (सा.श. 1820)

रयतवारी पद्धत म्हणजे मध्यस्थाची मदत न घेता शेतकऱ्यानी स्वतः थेट कर सरकारला जमा करणे. सरकार आणि शेतकरी यांच्या मधला थेट संबंध हीच रयतवारी पद्धत होय. ही पद्धत दक्षिण आणि पश्चिम भारतात लागू करण्यात आली. परिणामी ही पद्धत कायम जमीनदारी पद्धतीपेक्षा वेगळी नव्हती.

रयतवारी पद्धतीनुसार दरवर्षी भरण्यात येणारा हा कर जमीनीचे मापन करून जमीनीचा कस, पाण्याची व्यवस्था हे लक्षात घेऊन ठरविला जात असे. उत्पन्नाच्या 50% भाग सरकारकडे भरणा करावा लागे. वेळोवेळी परिस्थितीनुसार महसूल दर ठरविला जात असे. निर्दिष्ट केलेला हा भूमी कर विपरीतपणे वाढविला जात असे. दुष्काळ अथवा पाण्याच्या पुरामुळे पीक पूर्णपणे नष्ट झाले तरी न चुकता कर भरावाच लागे. ही पद्धत मद्रास प्रातांतील थॉमस मन्रो याने 1820 मध्ये लागू केली.

### 3. महलवारी पद्धत (सा.श. 1833)

महल म्हणजे ग्राम अथवा महल असा अर्थ आहे. महलाचा भू महसूल निर्दिष्ट केलेला असे. या पद्धतीप्रमाने एखाद्या भागातल्या  एखाद्या शेतकऱ्याला अथवा अनेक शेतकऱ्यांना करवसुलीसाठी जामीन रहावे लागे. 19 व्या शतकात अंमलात आलेली ही पद्धत उत्तर प्रदेश, मध्यप्रदेशाचा काही भाग व पंजाब येथे लागू केली होती.

## भू महसूल पद्धतीचे परिणाम

* जमीनीच्या खरेदी विक्रीचा पायंडा ब्रिटिशानी पाडला.
* जमीनीचा लिलाव आणि विक्रीची प्रकरणे वाढली.
* भू महसूल रोख रूपात दिले गेल्यामुळे पैशाचे महत्व वाढले.
* उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक जमीनदारांनी आहार धान्याच्या ऐवजी कापूस, ताग, भूईमूग, ऊस अशाप्रकारची व्यापारी पिके पिकविण्यासाठी शेतकऱ्यावर बळजबरी केली. व्यापारी पिकांच्यामुळे ब्रिटिशाना लाभदायक परिस्थिती निर्माण झाली. याचा परिणाम असा झाला की आहार पदार्थांची कमतरता भासू लागली.
* जमीनदारी पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे अनेक वर्ग निर्माण झाले.

## इंग्लिश शिक्षण

शिक्षण हे व्यक्ती विकासाचे साधन आहे. शिक्षणामुळे उत्तम ज्ञान मिळून सुखाचे जीवन साध्य होते. इंग्रज सरकार आणि ख्रिस्ती मिशनऱ्यानी तसेच अनेक भारतीयानी इग्लिश शिक्षणाचा प्रसार केला. इंग्रज सरकार व ख्रिस्ती मिशनऱ्यानी शासन चालविण्यास आणि धर्म प्रचारासाठी इंग्लिश शिक्षण अंमलात आणले. इंग्रजानी इंग्लिश शिक्षणाचे सार्वत्रीकरण केल्यामुळे भारतीयानी त्याचा लाभ घेतला. सर्व स्तरातील वर्गांना शिक्षण मिळू लागले.

1813 मध्ये चार्टर ॲक्ट लागू केला. त्यानुसार भारतीयांच्या शिक्षणासाठी एक लाख रुपये मंजूर झाले. परंतू सरकारने 1823 पर्यंत या पैशापैकी एक रुपयासुद्धा खर्च केला नाही. भारतीय हितचिंतक आणि ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी आधुनिक शिक्षणासाठी चळवळ केली. पण या संदर्भात कंपनीचा विचार वेगळा होता. आपल्या राजकारभारात कनिष्ठ दर्जाचे सरकारी नोकर तयार करण्यासाठी इंग्लिश शिकलेले भारतीय लोक कमी पगारावर काम करण्यासाठी इंग्रजाना पाहिजे होते. इंग्रजांचा हेतू असा होता की, भारतीय विद्वान आपल्याशी एकनिष्ट राहावेत. त्यांचा असा वर्ग निर्माण करावा की जो आपल्या इंग्रज सरकारला पाठींबा देत राहील. नवीन शिक्षण नीती अंमलात आणण्याचे श्रेय लॉर्ड मेकाले आणि चार्ल्स वूड याना दिले पाहिजे.



लॉर्ड मेकाले



चार्लस वूड

## शिक्षण माध्यमाबाबत विवाद

शिक्षण माध्यमाविषयी संबंधीत काही इंग्रजी विद्वानांनी भारतीय भाषेद्वारे भारतीय विषयांचे शिक्षण द्यावे हा वाद मांडला. आणखी काहीनी पाश्चात्य विद्वान आणि साहित्य इंग्लिश भाषेतून द्यावे असे सुचविले. हा विवाद अखेर मिटला (1835). गव्हर्नर जनरल विल्यम बेंटींगने पाश्चात्य विज्ञानाचे शिक्षण इंग्लिश माध्यमातून द्यावे ही शिक्षण नीती जाहिर केली. यासाठी इंग्लिश भाषेच्या शिक्षणाचाही त्याने पुरस्कार केला.

काही युरोपियन विद्वानांनी प्राचीन भारताच्या समृद्ध संस्कृतीची ओळख पश्चिमेच्या जगाला करून दिली. 1784 मध्ये सुप्रिम कोर्टाचे न्यायाधीश म्हणून आलेल्या सर विल्यम जॉन्सनने कलकत्ता येथे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' ची स्थापना केली. त्याने संस्कृत भाषेचे श्रेष्ठत्व जाणले. सर चार्ल्स विल्कीसनने 1785 मध्ये भगवतगीतेचे इंग्लिशमध्ये भाषांतर केले. मॅक्समुलरने ऋग्वेद आणि इतर श्रेष्ठ साहित्याचे भाषांतर केले.

बेंटिंगने जाहिर केलेल्या शिक्षण नीतीचा त्याच्या कार्यकारी समितीचा सदस्य असलेल्या मेकाले याचा अहवाल आधारभूत ठरला. मेकाले हा एक कट्टर आंग्लवादी होता. भारतीय ज्ञान हे कनिष्ठ दर्जाचे आहे अशी त्याची धारणा होती.

संस्कृत व्याकरण त्याला हास्यास्पद वाटे. भारतीय संस्कृती मूळासकट निपटून काढणे हे त्याचे ध्येय होते. त्याचे म्हणणे असे होते की, युरोपियन ग्रंथालयातील एका कपाटातील पुस्तकांच्या एक रांगेत असणारे ज्ञान, पूर्वेच्या सर्व ज्ञानापेक्षा जास्त आहे. यावरून त्याच्या हीन भावनेची कल्पना येते.

1854 मध्ये ब्रिटिशानी भारतात नवीन शिक्षण नीती आणली. ही नीती चार्ल्स वूड याच्या अहवालावर आधारित होती. अल्पकाळातच कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथे विश्वविद्यालयांची स्थापना (1857) करण्यात आली. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कॉलेज, विश्वविद्यालय अशी रचना असलेली शिक्षण व्यवस्था कालानुक्रमे अंमलात आली. शिक्षण क्षेत्राच्या देखरेखीसाठी प्रत्येक प्रांतात शिक्षण खाते निर्माण केले गेले. 1844 मध्ये इंग्लिश भाषा ही अधिकृत शासकिय भाषा झाली.



**मुंबई विश्वविद्यालय**



**मद्रास विश्वविद्यालय**

## पाश्चात्य शिक्षणाचा परिणाम

परंपरागत चालत आलेली शिक्षण पद्धती क्रमाक्रमाने ऱ्हास होत गेली. नवीन शिक्षणक्रमानुसार विविध भाषिक भारतीय इंग्लिश भाषेमध्ये परस्पर संवाद साधू लागले. त्यामूळे राष्ट्रीय भावना लोकामध्ये रुजू लागली, वाढू लागली. बौद्धिक विचार हळूहळू भारतीय समाजात आल्यामुळे दूरगामी परिणाम होण्यास मदत झाली. भारतीय साहित्यावर गंभीर परिणाम होऊन नवसाहित्याच्या चळवळीवर या शिक्षण पद्धतीचा प्रभाव पडला. अनेक भारतीय वर्गानी नवे सामाजिक विचार मिळविले.

## आर्थिक प्रभाव

18 आणि 19 व्या शतकात इंग्लंडमधील उद्योग क्रांतीचा भारताच्या व्यापार आणि उद्योगावर गंभीर परिणाम झाला. 1600 पासून 1757 पर्यंत कंपनी केवळ एक व्यापारी कंपनी होती. प्लासीच्या लढाईपर्यंत भारताच्या व्यापार आणि उत्पादनावर एकाधिकार साधण्यासाठी बंगालमध्ये आपला राजकीय अधिकार इंग्रजानी उत्तमपणे वापरला. त्याचवेळी कच्चा कापूस विक्रीवर त्यानी एकाधिकार स्थापन केला. त्याचा परिणाम असा झाला की,विणकराना कच्चा कापूस दुप्पट किंमतीने घ्यावा लागला. एकंदरीत ब्रिटिश उद्योग नीतीचे ध्येय हे ब्रिटिश उद्योगाना आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यास

समर्थ ठरले. भारत हा ब्रिटन मधून यंत्रनिर्मित येणाऱ्या वस्तूचा आयातदार आणि भारतातून ब्रिटिशाना आवश्यक कच्चामाल पाठविणारा निर्यातदार बनावा. हे ब्रिटिशांचे ध्येय होते. मुक्त व्यापाराच्या धोरणामुळे भारतातील मुख्य आधार असलेल्या कुटिरोद्योगाना उतरती कळा लागली.



दादाभाई नवरोजी

ब्रिटिश कारभाराच्या काळात भारत गरीब देश बनला याला कारण म्हणजे भारतीय संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वाहू (Drain of Wealth) लागला. भारतात ब्रिटिशानी विविध क्षेत्रात भांडवलातून मिळविलेला लाभ हेच संपत्तीच्या ओघाचे मुख कारण होय.

संपत्तीच्या ओघाचा मुख्य परिणाम म्हणजे भारत गरीब देश झाला. देशात भांडवलाची कमतरता भासू लागली. त्यामुळे येथील उद्योगांच्या विकासाला खीळ बसली. अर्थशास्त्राचे पितामह ॲडम स्मिथनी असे म्हटले आहे की भारतात राज्यकारभार करणारे ब्रिटिश हे 'लुबाडणी करणारे' आहेत.

## सामाजिक सुधारणा

### रेग्युलेटिंग ॲक्ट (सा.श. 1773)



वॉरन हेस्टींग्ज

भारताच्या संविधानाच्या सुधारणा ब्रिटिशांच्या राज्यकारभाराच्या काळापासून आरंभ झाल्या असे म्हणू शकतो. या देशाच्या संविधान इतिहासात रेग्यूलेटींग ॲक्ट हा एक प्रमुख काल घटना होय. भारतातील गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टींग्ज याने 1773 मध्ये अंमलात आणला. भारतातील ब्रिटिशांच्या कारकीर्दीचा पाया यामुळे घातला. यामुळे ईस्ट इंडिया कंपनीला संविधान सोपविले.

## पिटस् इंडीया कायदा (सा.श. 1784)

भारताच्या राज्यकारभाराबाबत इंग्लंडमधील सरकारला समाधान नव्हते. त्याने येथे आणखी जास्त लक्ष देण्याचे ठरविले. तेव्हा प्रधानमंत्री पिट याने एक कायदा आणला. या कायद्यान्वये ईस्ट इंडिया कंपनी ब्रिटिश राजवटीच्या अधिन करण्यात आली. तो एक विभाग मानण्यात आला. नंतर अनेक कायदे ब्रिटिशानी केले.

## मार्लेमिंटो सुधारणा (सा.श. 1909)

लॉर्ड मिंटो भारताचे व्हाईसराय झाले. त्याच काळात लॉर्ड मार्ले सेक्रेटरी ऑफ स्टेट झाला. लॉर्ड कर्जनचा कारभार, भारतीय क्रांतीकारकानी चालविलेली जहाल चळवळ इत्यादी अनेक कारणाने मार्ले मिंटो सुधारणा जारी करण्यात आली. या कायद्याप्रमाणे सरकारी कार्यक्रमामध्ये निवडलेल्या योग्य भारतीयाना सहभाग घेण्याची संधी देण्यात आली. केंद्र शासन सभेत सदस्यांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रांत शासन व्यवस्था विस्तारण्यात आली.

मार्ले मिंटो सुधारणानी भारतातील राज्य घटनेत कोणताही क्रांतीकारी बदल घडवून आणला नाही. लोक प्रतिनिधीना कोणतीही जबाबदारी दिली नाही.

## मांटेग्यू चेल्सफर्ड सुधारणा (सा.श. 1919)

मार्ले मिंटो सुधारणानी भारतीयाना समाधान झाले नाही. 1917 मध्ये सेक्रेटरी ऑफ स्टेट असलेले मांटेग्यू यानी एक घोषणा केली. भारतीयांना राज्यकारभारात जादा भूमिका देऊन स्वयं अधिकार संस्था वाढविण्याच्या दृष्टिने ब्रिटिश सरकारची नीती आहे

अशी घोषणा केली. तेव्हा भारताचे व्हाईसराय असलेले लॉर्ड मिंटो याने हा कायदा भारतात लागू केला. सेक्रेटरी ऑफ स्टेट च्या इंडिया काऊन्सीलमध्ये सदस्यांची संख्या वाढविली. यांचा अधिकारावधी 5 वर्षे निर्धारित करण्यात आला. भारताच्या एका हाय कमिशरनरची लंडनला नेमणूक करण्यात आली.

## 1935चा कायदा

मार्ले मिंटो सुधारणामुळे भारतीयांचे समाधान झाले नाही. लोकांचे समाधान करण्यासाठी 1935 च्या भारत सरकार कायद्याने महत्वाचे बदल घडवून आणले. प्रांत व राज्यांच्या एकत्रीकरणामुळे एकसंघ भारताची रचना झाली. केंद्र सरकारामध्ये दुहेरी राज्य शासन व्यवस्था लागू करण्यात आली. प्रांतीय सरकारामध्ये जबाबदार सरकार अस्तित्वात आले. हा कायदा भारतीय घटना इतिहासामध्ये एक मैलाचा दगड ठरला.

## अभ्यास

### I खालील प्रश्नांची एक वाक्यात उत्तरे लिहा.

1) कायम जमीनदारी पद्धत कोणी अंमलात आणली?

2) रयतवारी पद्धत म्हणजे काय?

3) 1813 च्या चार्टर कायद्यान्वये भारतीय शिक्षणासाठी किती रक्कम राखीव ठेवण्यात आली?

4) भारतात रेग्यूलेटींग कायदा कोणी व केव्हा अंमलात आणला?

5) 1857 मध्ये स्थापन झालेली विश्वविद्यालये कोणती?

## II खालील प्रश्नांची गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

1) कायम जमीनदारी पद्धतीचा शेतकऱ्यावर काय परिणाम झाला?

2) पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा परिणाम लिहा.

3) भारतातील प्रमुख शासन सुधारणा लिहा.

## III अ यादीतील संबंधीत ब यादीतील विषय जोडून लिहा.

| अ | ब |
|---|---|
| वॉरन हेस्टींग्ज | कायम जमीनदारी पद्धत |
| कॉर्न वॉलीस | इंग्लिश शिक्षण नीती |
| थॉमस मन्रो | महसूस वसुली लिलाव पद्धत |
| विलीएम बेंटींग | संपती विक्री पद्धत |
| दादाभाई नवरोजी | रयतवारी पद्धत |

## IV चर्चा करा.

1. ब्रिटिश काळातील महसूल पद्धती आणि प्रचलित महसूल पद्धत.

☆ ☆ ☆

| पाठ 4 | सामाजिक आणि धार्मिक सुधारणा |
| --- | --- |

## पाठाचा परिचय

पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीच्या अनुकरणाने भारतीयांच्यात नवी जागृती निर्माण झाली. तसेच त्याकाळी भारतीय समाजामध्ये असलेल्या वाईट चालीरिती आणि प्रथा कमी झाल्या. त्यामुळे भारतीयाना आपल्या समाजातील उणीवांची जाणीव झाली. त्या निवारण्यासाठी काही उपाय शोधण्यात आले. त्या दृष्टीने काही संघ संस्थांची स्थापना करून भारतीय समाज सुधारण्यासाठी 19 व्या शतकातील समाजसुधारकांचे कार्य आपण अभ्यासूया.

## सामर्थ्ये

1) 19 व्या शतकातील भारतीय समाजाच्या जागृतीला कारणीभूत अंश व चिंतनशील प्रयत्नाबाबत जाणून घेणे.

2) समाजातील जागृतीसाठी संघ संस्था व सुधारकानी दिलेल्या योगदानाचे स्मरण करणे.

3) सामाजिक सुधारणा चळवळीमुळे झालेले परिणाम समजून घेणे.

आधुनिक पाश्चिमात्य विचारसरणीमुळे भारतात एक नवी जागृती निर्माण झाली. पाश्चिमात्य संस्कृती, वेषभूषा, चालीरिती, समाज, धार्मिक विचार, श्रद्धा आणि इंग्रजांचा सामाजिक आदर्श यांचा भारतीयांवर गाढा प्रभाव पडला. विशेषता भारतीय पाश्चिमात्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि कार्यकारणभाव यामुळे प्रभावित झाले. या चळवळीमुळे वसाहत काळातील भारतात नवीन विचार सरणीची नांदी झाली. या चळवळीमुळे दलित आणि महिला वर्गाच्या सबलीकरणाला बळ मिळाले. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांची विचारधारा बदलली. वसाहत सिद्धांतामुळे भारतीयावर प्रभाव पडला. आपल्या देशाची संमृद्ध परंपरा आहे. पण या परंपरेचे योग्य अनुकरण झाले नाही. त्यामधील अंधश्रद्धा काढून टाकण्याची गरज आहे.

## राजा राममोहन राय (ब्राह्मोसमाज सा.श. 1828)

आधुनिक काळातील भारतात सामाजिक जागृती करणाऱ्यामध्ये राजा राममोहन राय अग्रेसर होते. याना रविंद्रनाथ टागोर यानी 'आधुनिक भारताचे पितामह' असे म्हटले.



**राजा राममोहन राय**

भारतीय समाजात चेतना निर्माण करण्यासाठी राजा राम मोहन राय यानी 'आत्मीय सभेची' स्थापना केली. नंतर 1828 मध्ये 'ब्राह्मो सभेची' स्थापना केली. तीन वर्षानंतर त्याचे 'ब्राह्मो समाज' असे नामकरण करण्यात आले. राजा राममोहन राय पूर्व व पश्चिम संस्कृतीचे चिंतन समन्वयक होते. सतीची चाल, जातीयता, मूर्तीपूजा, बहुपत्नीत्व, बालविवाह, तसेच इतर अनिष्ठ रूढीबद्धल कडाडून टिका व विरोध केला. राजा राममोहन राय आणि त्यांच्या सहकाऱ्यानी अर्थहीन सती चालीचे निर्मूलन करण्यासाठी ब्रिटिश सरकारला विनंती केली.



**विधवांची दयनीय अवस्था**

यामुळे गव्हर्नर जनरल विल्यम बेंटींगने सतीच्या पद्धतीच्या आचरणाला कायदाबाहय घोषित केले. (सा.श. 1829) राजा राममोहन राय यानी पाश्चिमात्य पद्धतीचा स्वीकार करताना त्याद्वारे अमानवीय पद्धती नाहीशा करण्यासाठी जोरदार प्रतिपादन केले. विधवा पूनर्विवाह आणि एक देवता आराधनेसाठी राजा राममोहन रायनी आपल्या 'संवाद कौमुदी' पत्रकाद्वारे सामाजिक सुधारणा चळवळ चालू ठेवली.

वैचारिकतेच्या आधारे हिंदू धर्माला परिशुद्ध करण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यानी इंग्लिश शिक्षणाचे प्रतिपादन केले. त्यानी वेदांत कॉलेजची स्थापना केली. राजा राममोहन

राय हे आद्य पत्रकारापैकी एक होते. काही दैनंदिन पत्रके त्यानी प्रकाशित केली. त्यानी आपल्या जीवन कार्यात सामाजिक अन्यायाविरुद्ध लढा दिला. त्यांचे समाजाभिवृद्धी कार्य देवेंद्रनाथ टागोर व केशवचंद्र सेन यानी पुढे चालू ठेवले.

**तुम्हाला माहित असू दे.** 'राजा' ही राममोहन राय याना मोगल बादशहा कडून 1829 मध्ये दिलेली बिरूदावली होय.

## आत्माराम पांडुरंग (प्रार्थना समाज सा.श. 1867)


महादेव गोविंद रानडे

प्रार्थना समाजाची स्थापना आत्माराम पांडुरंग यानी केली. ब्राह्मो समाजानंतर झालेली ही प्रमुख सामाजिक चळवळ होय. याची सुरूवात मुंबई प्रदेशात झाली. बाळ वागले, एन. जी. चंदावरकर, महादेव गोविंद रानडे असे काही समाज सुधारक या संस्थेचे प्रमुख होते. विधवा पूनर्विवाह, आंतरजाती विवाह, समाजात महिलांचे स्थानमान उंचावण्यासाठी आणि शोषित वर्गाची अभिवृद्धी या समस्याकडे विशेष लक्ष दिले. एवढेच नाही तर अनाथासाठी आश्रम स्थापन केले. विधवांच्या उद्धारासाठी शिक्षण संस्था सुरू केल्या.

## महात्मा ज्योतीबा फुले (सत्यशोधक समाज सा.श. 1873)


महात्मा ज्योतिबा फुले

महात्मा ज्योतिबा फुले यानी महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ सुरू केली. महाराष्ट्रात समाजातील मागास वर्गात जागृती निर्माण करण्यासाठी त्यानी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. अस्पृश्य, अनाथ आणि विधवांसाठी शाळा सुरू केल्या. ब्राह्मण पुरोहितांचे वर्चस्व खंडित करण्यासाठी त्यानी 'गुलामगिरी' नावाच्या साहित्याची रचना केली व स्वतःचे चिंतनशील विचार मांडले. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुलेनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. 1863 मध्ये बाल विधवांच्या पुनर्वसनासाठी वसती केंद्र सुरू करून त्याद्वारे बालहत्या रोखण्यासाठी प्रयत्न केले. विधवा पूनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. वास्तववादी महात्मा फुले याना डॉ.बी.आर. आंबेडकर आपले तात्विक मार्गदर्शक मानत.

### तरुण बंगाल चळवळ

राजा राममोहन राय यांच्या सुधारणा चळवळीमुळे बंगालमधील अनेक युवक प्रेरित झाले. यामुळे तरुण बंगाल चळवळ उदयास आली. अँग्लो इंडियन युवक हेनरी विवियन याने नेतृत्व केले. स्वतःचे अनुभव आणि विवेचनावरून चिंतन करण्याचे युवकाना आवाहन केले. परंतु भारतीयावर त्या काळात त्यांच्या आवाहनाचा प्रभाव पडला नाही.

### स्वामी दयानंद सरस्वती (आर्य समाज सा.श. 1875)



**स्वामी दयानंद सरस्वती**

स्वामी दयानंद सरस्वती यानी आर्य समाजाची स्थापना केली. त्याचे मूळ नाव मूलशंकर असे होते. प्राचीन वेदकालीन भारतात आदर्श समाज आस्तित्वात होता. तशा प्रकारचा समाज आतासुद्धा स्थापन झाला पाहिजे. असे त्यांचे मत होते. त्यादृष्टीने वाटचाल करण्यासाठी त्यानी 'वेदाकडे परत चला' असे आवाहन केले. मूर्तीपूजा, अस्पृश्यता, बालविवाह आणि जाती व्यवस्थेला विरोध केला. दयानंद सरस्वती यानी आंतरजातीय व विधवा पूनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. एवढेच नाही तर एक देवराधनेचे प्रतिपादन केले.

दयानंद सरस्वती यानी आपली तत्वे प्रसिद्ध साहित्यकृती 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथात अभिव्यक्त केली आहेत. आर्य समाजाने भारतीय शिक्षणाच्या विकासासाठी प्रयत्न केले. राष्ट्रीय चळवळीला स्फूर्ती दिली. आर्य समाजाचे नेते लाला हंसराज यानी लाहोरमध्ये 'दयानंद अँग्लो वेदिक शाळा' सुरू केली. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय यासारखे राष्ट्रीय नेते आर्य समाजाच्या तत्वानी प्रभावित झाले. धर्मांतर करून पून्हा हिंदू धर्मात येणाऱ्यांसाठी दयानंदांचे शिष्य श्रद्धानंद यानी 'शुद्धी चळवळ' सुरू केली.

दयानंदानी केवळ धर्माच्या आधारे ब्राह्मणाना अधिकार देण्यास विरोध केला. स्त्रियांसहीत सर्वाना वेदांचा अभ्यास करण्याचा अधिकार आहे असे घोषित केले. गोपूजेचे प्रतिपादन केले. थोडक्यात सांगायचे तर आर्य समाजाने स्वराज्य आणि स्वदेशी विचारांचे प्रतिपादन करण्याचे आंदोलन होते.



## स्वामी विवेकानंद (रामकृष्ण मिशन सा.श.1897)

'उठा, उभे रहा, ध्येय गाठेपर्यंत थांबू नका.' असे आवाहन स्वामी विवेकानंदानी भारतीय युवकाना केले. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त असे होते. त्यांचा जन्म 12 जानेवारी 1863 रोजी कलकत्ता येथे झाला. त्यानी रामकृष्ण परमहंस यांचे शिष्यत्व स्वीकारले व नंतर सन्यासी बनले. रामकृष्णांच्या निधनानंतर त्यांच्या शिष्याना संघटित करून मार्गदर्शन करण्याची जबाबदारी नरेंद्रनाथांच्यावर पडली. 1893 साली अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्म परिषदेत विवेकानंदानी हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व केले. तेथे त्यानी वेदांच्या तत्वज्ञानाबाबत दिलेल्या व्याख्यानाने त्याना जगप्रसिद्ध बनविले. पाश्चिमात्य संस्कृतीच्या काही साधना, महिला समानता यामुळे ते प्रभावित झाले.

स्वामी विवेकानंदानी भारतात पायी भ्रमण करताना भारतातील त्या काळातील सामाजिक स्थितीबदल जाणून घेतले. जोपर्यंत लोक गरीबी, भूक व अज्ञानात असतील तोपर्यंत मी पून्हा जन्म घेऊन ती नाहिशी करण्यासाठी प्रयत्न करीन असे ते म्हणत होते.



**श्री रामकृष्ण परमहंस**



**स्वामी विवेकानंद**

पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यानी ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांसाठी संस्कृत कॉलेजची स्थापना केली. सर्वप्रथम 1856 मध्ये उच्च वर्गामध्ये कायदेशीर पूनर्विवाह कलकत्तामध्ये विद्यासागर यांच्या नेतृत्वाखाली झाला.

मानवहीत व समाजाच्या सेवेसाठी त्यानी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. स्त्रियांबद्धल काळजी व श्रद्धा असलेल्या विवेकानंदानी 'स्त्रियांचा उद्धार आपल्या राष्ट्राचा उद्धार' असे ठासून सांगितले. दूर्बल लोकांच्या सेवेसाठी आग्रह धरला. एकूण भारताच्या विकासाचे स्वप्न पाहिले.

स्वामी विवेकानंदाना बाळ गंगाधर टिळक यानी 'भारतीय राष्ट्रीयतेचे खरे पितामह' असे म्हटले आहे. सुभाषचंद्र बोस सारखे अनेक नेते स्वामी विवेकानंदांच्या विचारानी प्रेरित झाले.

स्वामी विवेकानंद जागतिक धर्म परिषदेला जाण्यापूर्वी मैसूरु संस्थानला भेट दिली. विवेकानंदाना आपल्या राजवाड्यात आमंत्रित केलेल्या 10 व्या चामराज वडेयर यानी संमेलनाना जाण्यासाठी धनसहाय्य केले. विवेकानंदांच्या सल्लयानुसार दलितांसाठी तीन शाळा मैसूरुच्या वडेयरनी सुरू केल्या.

**कृती :** विवेकानंदानी शिकागो धर्म परिषदेत केलेल्या व्याख्याना बाबत आणखी माहिती संग्रह करा.

## मॅडम एच.पी. ब्लॅव्हटस्की आणि कर्नल एच.एस. अल्कॉट (थियॉसॉफिकल सोसायटी सा.श. 1875)



एच.पी. ब्लॅव्हटस्की



डॉ. ॲनि बेझंट

थियॉसॉफिकल सोसायटीची (ब्रह्मविद्या समाज) स्थापना रशियन महिला मॅडम एच.पी. ब्लॅव्हटस्की आणि अमेरिकन कर्नल एच.एस. ऑलकॉट यानी केली. भारतात आल्यानंतर चेन्नई जवळील अडीयार येथे मुख्य कार्यालयाची सुरूवात केली. नंतर डॉ. ॲनि बेंझट या अध्यक्षा झाल्या. एच.पी. ब्लॅव्हटस्की या लेखिका होत्या. त्यानी काही प्रमुख कृतींची रचना केली. या कृतीमुळे मानवतेचा, बंधुभाव, तत्वशास्त्र, तुलनात्मक धर्म आणि निसर्गाचे सत्य जाणून घेऊ शकतो असा अभिप्राय व्यक्त होतो.

डॉ. ॲनिबेझंट भारतीय संस्कृतीने प्रभावित होऊन भगवदगीतेचा इंग्लिश भाषेत अनुवाद केला. 'न्यू इंडिया' हे पत्रक काढले. भारतात थियॉसॉफिकल चळवळीचे केंद्र प्रभावीपणे चालू ठेवले.

## थियॉसॉफिकल सोसायटीचे उद्देश

1) भेदरहीत विश्वबंधुत्व वाढविणे.

2) धर्म, तत्वज्ञान आणि विज्ञान यांच्या तुलनात्मक अभ्यासास प्रोत्साहन देणे.

3) निसर्ग आणि मानवात असलेले अंतर्गत रहस्य व सुप्तशक्ती जाणून घेणे.

ॲनि बेझंट यानी बनारसमध्ये सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली. याचे नंतर बनारस हिंदू विश्वविद्यालय असे नामकरण करण्यात आले. बालविवाह रोखण्यासाठी आणि अंधश्रद्धेविरुद्ध प्रचार करण्यासाठी 'मुंदाळूगळू' या संस्थेची स्थापना केली. त्यानी पुढे होमरुल चळवळ सुद्धा चालू केली. त्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या प्रथम महिला अध्यक्षा झाल्या.

## सर सय्यद अहमद खान (अलिफर चळवळ)



सर सय्यद अहमद खान

बहुतेक मुस्लीम पाश्चात्य शिक्षणाकडे संशयाच्या नजरेने पाहात आणि आपल्या धर्माच्या आचरणावर भरवसा होता. प्रारंभी नवाज अब्दूल लतिफने 1863 मध्ये 'महमडन मिलेटरी सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेद्वारे मुस्लिमामध्ये इंग्लिश शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर हिंदू-मुस्लिमांच्यात सामंजस्य आणण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाना सर सय्यद अहमद खानने चळवळीचे रूप दिले. यांचा जन्म 1817 मध्ये दिल्लीमध्ये झाला. त्यांची ईस्ट इंडिया कंपनीचा न्याय अधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्याना आपला समुदाय इंग्लिश शिक्षणापासून वंचित राहील्यामुळे आर्थिक व सामाजिक संधीपासून दूर आहेत असे वाटे. शिक्षण घेऊन सरकारमध्ये आपल्या समाजाला प्रतिनिधित्व मिळवून देण्याची महत्वाकांक्षा होती.

तसेच एका समाजातील पडदापद्धत, बहुपत्नीत्व आणि तलाख यांचा विरोध केला. इंग्लिश वैज्ञानिक आणि साहित्याचे उर्दू भाषेत भाषांतर केले. यासाठी ट्रान्सलेशन सोसायटीची स्थापना केली. नंतर या सोसायटीचे 'सायंटीफिक सोसायटी' असे नामकरण करण्यात आले. मुस्लिमांच्यात वैज्ञानिक विचारांचा प्रचार करण्यासाठी 'अलिफर इनस्टीट्यूट गॅजेट' नावाने पत्रक सुरू केले. हे पत्रक इंग्लिश व उर्दू भाषेत प्रकाशित होत होते. 1875 मध्ये महमडन अँग्लो ओरियंटल कॉलेज सुरू केले. याचे 1920 मध्ये अलिफर मुस्लीम विश्व विद्यालयात रूपांतर झाले.

## श्री नारायण गुरु


श्री नारायण गुरु

श्री नारायण गुरु हे संत व समाज सुधारक म्हणून प्रसिद्ध होते. यांचा जन्म 1854 साली तिरुवाकूरीच्या एका समुदायातील कुटूंबात झाला. 1903 साली श्री नारायण यानी 'धर्म परिपालना यौगम' या संघटनेची स्थापना केली. याद्वारे त्यानी केरळमधील एळवरु जातीमधील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी प्रयत्न केले. जातीभेद, प्राणी हत्या यांचा विरोध केला. संस्कृत शाळांची सुरूवात करून त्यामध्ये जातीभेद न मानता सर्वांना प्रवेश दिला. त्यानी सुमारे तीस देवालयांची निर्मिती केली. केरळमधील अस्पृश्यासह सर्वांना प्रवेश मिळवून दिला. देवालयामध्ये सर्व जातीधर्मांचे ग्रंथ असलेले ग्रंथालय असले पाहिजे असा आग्रह धरला.

श्री नारायण गुरु यांच्या एक देव, एक धर्म, एक जात या विचारात त्यांचा आशय दडलेला आहे. (One God, One Religion and One Caste) यांचा प्रभाव कर्नाटकात पडल्याचे दिसून येते. नारायण गुरुचे 1928 साली निधन झाले.

कृती: श्री नारायण गुरु आणि तामिळनाडूमधील 1920 दशका मध्ये आत्मगौरव चळवळ प्रारंभ केलेल्या पेरियार यांच्याबाबत अधिक माहिती संग्रह करा.

## महिला समाज सुधारक

मॅडम एच.पी. ब्लॅव्हटस्की, ॲनि बेझंट, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडित रमाबाई या भारतातील काही प्रमुख समाज सुधारक होत्या.

## सावित्रीबाई फुले



सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले या भारतातील प्रसिद्ध समाज सुधारक होय. शैक्षणिक सुधारक व कवयित्री असलेल्या सावित्रीबाई फुलेनी पती ज्योतीबा फुले यांच्या साथीने पूण्यात मुलींच्यासाठी शाळा सुरू केली. इतकेच नाहीतर त्यानी स्वतः शिक्षिका म्हणून काम केले. बालविवाह झालेल्या विधवांच्या पूनर्वसनासाठी वसती केंद्र सुरू करून शिशुहत्या प्रकरणे थांबविण्याचा प्रयत्न केला. जाती पद्धत आणि लिंग असमानता या विरुद्ध चळवळ केली. यासाठी त्यानी समाजाचा विरोध सहन केला.

पती ज्योतीबा फुलेंच्या सामाजिक कार्यात खांद्याला खांदा लावून कार्य केले. त्यांच्या निधनानंतर 'सत्य शोधक समाज' पुढे चालू ठेवला. प्लेगच्या साथीत रोग्यांची सेवा करताना त्यानाच प्लेगची लागण झाली व त्यातच त्यांचा अंत झाला.

## ताराबाई शिंदे



ताराबाई शिंदे

ताराबाई शिंदे या महाराष्ट्रातील प्रथम महिला चळवळकार होत. ज्योतीबा फुलेंच्या सत्य शोधक समाजात सक्रिय सदस्य म्हणून सामाजिक चळवळीत आपल्याला गुंतवून घेतले. बाल विधवांचे रक्षण आणि विधवा पुनर्विवाहाला पाठींबा दिला. त्यानी लिहिलेल्या 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकात महिलांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठविला.

## पंडित रमाबाई

पंडित रमाबाई या भारतातील ख्रिश्चन धर्मातील समाज सुधारक होत. अनंतशास्त्री डोग्री आणि लक्ष्मीबाई यांच्या पोटी जन्मलेल्या रमाबाईचा जन्म पश्चिम किनारपट्टीवरील गंगामूल येथे झाला. तेव्हाच्या सामाजिक पद्धतीच्या विरुद्ध जाऊन शिक्षण घेतले. इंग्लंडमध्ये शिकताना ख्रिश्चन धर्म स्वीकारला. भारतीय महिलांच्या उद्धारासाठी जीवन घालविले. 1889 साली 'मुक्ती मिशन' संस्थेची स्थापना केली. या संस्थेत आजतागायत विधवा, अनाथ व मद्यपीना जीवनोपाय मिळवून देण्यासाठी कार्य केले जाते.



**पंडित रमाबाई**

### अभ्यास

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

1) संवाद कौमुदी हे पत्रक ............ यानी सुरू केले.
2) गुलामगिरी पुस्तक ................. यानी लिहिले.
3) लाहोरमध्ये 'दयानंद अँग्लो वेदिक शाळेची' स्थापना................ यानी केली.
4) स्त्रीयांच्या उद्धारासाठी 'मुक्ती मिशन' संस्था ........... यानी स्थापन केली.

**II खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) भारताचे 'नवोदय पितामह' असे कोणाला म्हणतात?
2) महादेव गोविंद रानडे कोण होते?
3) सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली?
4) 'उठा, उभे राहा, ध्येय गोठेपर्यंत थांबू नका' असे आवाहन कोणी केले?
5) डॉ. ॲनि बेझंट कोण होत्या?
6) अलिफर चळवळ कोणी सुरू केली?
7) श्री नारायण गुरु यानी कोणती संस्था स्थापन केली?
8) 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकाची लेखिका कोण?
9) भारतातील प्रसिद्ध ख्रिश्चन समाज सुधारक कोण?

## III. खालील प्रश्नांची उत्तरे गटात चर्चा करून लिहा.

1) राममोहन रायनी केलेल्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा क्रम सांगा.

2) ज्योतीबा फुलेंची सामाजिक सुधारणेतील भूमिका काय ?

3) थियॉसॉफिकल सोसायटीचे उद्देश कोणते ?

4) मुस्लीम समाजाला सुधारण्यासाठी सय्यद अहमद खानने काय केले ?

5) मागास वर्गाच्या सुधारणेसाठी नारायण गुरु यानी काय केले ?

6) स्त्रीयांच्या कल्याणासाठी पंडित रमाबाई यानी काय केले ?

## IV अ गटातील यादीतील ब गटातील विषयाशी संबंध जोडून लिहा.

| अ | ब |
|---|---|
| स्वामी विवेकानंद | अलिफर चळवळ |
| स्वामी दयानंद सरस्वती | सत्यशोधक समाज |
| सय्यद अहमद खान | थियॉसॉफिकल सोसायटी |
| ज्योतीबा फुले | रामकृष्ण मिशन |
| ॲनि बेझंट | आर्य समाज |

## V. चर्चा करा

'स्त्रीयांचा उद्धार आपल्या राष्ट्राचा उद्धार' स्वामी विवेकानंदाचे मत सद्यस्थितीला प्रस्तूत आहे का ? गटात चर्चा करा.

**उपक्रम:** महादेव गोविंद रानडे, ज्योतिबा फुले, राजा राममोहन राय, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती, सर सय्यद अहमद खान आणि श्री नारायण गुरु यांची जीवन चरित्रे वाचा.

☆ ☆ ☆

| पाठ 5 | स्वातंत्र्य चळवळ |
|---|---|

## पाठाचा परिचय

भारतीयानी आपल्या स्वातंत्र्यासाठी अनेकवेळा संघर्ष केला. हा भारतीय इतिहासात एक महत्वाचा टप्पा होय. भारतात पोर्तूगीज, डच, फ्रेंच आणि ब्रिटिशानी आपल्या व्यापारी वखारी स्थापन केल्या. भारतीयांचे निरंतर शोषण केले. त्यांची आक्रमणकारी नीती, अन्याय, आर्थिक शोषण याविरुद्ध भारतीयानी विरोध केला. ब्रिटिशाना भारतातून हाकलून लावले पाहिजे असा संकल्प केला. संघर्षाला कारणीभूत विविध घटनांचा परिचय या पाठात दिलेला आहे.

## सामर्थ्ये

1) ब्रिटिशाविरुद्ध झालेल्या प्रारंभिच्या काळातील घटना जाणून घेणे.
2) 1857 च्या भारतीय पहिल्या स्वातंत्र युद्धात कारणीभूत अंश समजून घेणे.
3) प्रथम स्वातंत्र युद्धात संघर्ष केलेल्या प्रमुख नेत्यांचा संघर्ष जाणून घेणे.
4) 19 व्या शतकात राष्ट्रीयतेच्या वाढीला कारणीभूत झालेले प्रमुख अंश जाणून घेणे.
5) मवाळ, जहाल क्रांतीकारकांची तत्वे व नीती समजून घेणे.
6) ब्रिटिशांच्या विरुद्ध गांधीजीनी अनुसरलेली अहिंसा व सत्याग्रह नीतीचा प्रशंसापूर्वक गौरव करणे.
7) गांधीजीचे नेतृत्वगूण, धैर्य, सत्य, साधेपणा, मानवियता आणि वियनशीलता गौरविणे.

## 1. ब्रिटिशाविरुद्ध झालेला आरंभीक संघर्ष

ब्रिटिशांच्या प्राबल्याच्या विरुद्ध भारतीयानी संघर्ष केला. बंगालचा नवाब मीर जाफरला ब्रिटिशाच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यास असमर्थ झाल्यावर त्यानी अधिकारावर असलेल्या मीरखानाला तात्कालीक अधिकार देऊन आशा दाखवून फसविले. इतकेच नाही तर सा. श. 1767 पासून 1799 पर्यंत अँग्लो मैसूरु युद्ध, सा.श. 1775 पासून 1818 पर्यंत अँग्लो मराठा युद्ध केले. ब्रिटिशानी शीख, अफगानी, नेपाळी, बर्मा या बरोबर युद्ध केले. भारतीय उपखंडात आपले प्रभुत्व स्थापन केले. कर्नाटकात असे अनेक दंगे झाले.

सा.श. 1800 मध्ये अनेकानी ब्रिटिशाविरुद्ध उठाव केला. परंतू ब्रिटिशानी मराठे व निजामाच्या सहाय्याने त्याना बंदिस्त करून वेलस्लीने कोनगलमध्ये ठार मारले. सा.श. 1819 मध्ये कोप्पळमध्ये बिरप्पा नावाच्या जमीनदाराने निजामाविरुद्ध बंड पुकारले परंतू ब्रिटिशानी त्यालाही चिरडले.

सा.श. 1824 मध्ये विजापूर जिल्हयातील सिंदगी येथे दिवाकर दिक्षीत आणि बाळाजी देशपांडे यानी ब्रिटिशांच्या विरुद्ध बंड पुकारले व तेथे स्वतःकडे महसूल गोळा केला. परंतू ब्रिटिशानी याना अटक करून तुरूंगात पाठविले. सा.श. 1824 पासून 1830 पर्यंत बेळगावी जिल्हयातील कित्तूर येथे ब्रिटिशाविरुद्ध राणी चन्नम्मा आणि त्यांचा निष्ठावंत सेवक संगोळ्ळी रायण्णा शूरपणे लढले व वीरगतीला प्राप्त झाले.

याबरोबरच बदामी, बिदनूर आणि कोडगू येथे प्रामुख्याने बंड केले. परंतू ब्रिटिशानी सहजपणे भारतीयांचे बंड नियंत्रीत करून आपले स्थान मजबूत केले. येथे झालेला भारताच्या स्वातंत्र्याचा सशस्त्र संघर्ष म्हणून ओळखला जातो. असे अनेक संघर्ष भारताच्या प्रथम स्वातंत्र्य युद्धाची नांदी ठरले.

## 2. भारताचे प्रथम स्वातंत्र्य युद्ध (सा.श. 1857–1858)

आधुनिक भारताच्या इतिहासात सा.श. 1857 वर्ष एक प्रमुख ऐतिहासिक मैलाचा दगड ठरले आहे. ब्रिटिशानी सा.श. 1857 च्या घटनेला केवळ 'शिपायांचे बंड' असे संबोधले. भारतातील विद्वानानी याला 'भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध' मानले. हा ब्रिटिश साम्राज्याच्या विरुद्ध झालेला मोठा संघर्ष होता. शिपायानी आणि लोकानी साम्राज्यशाहीच्या धोरणांचा विरोध केला.

### कारणे

ब्रिटिशांच्या दीर्घावधी राज्यकारभारामुळे भारताची आर्थिक व्यवस्था दूर्बल झाली. जनतेला अनेक संकटांचा सामना करावा लागला. शेतकऱ्यावर कराचा भार वाढला. हस्तव्यवसाय नाश पावू लागले. पारंपारिक चालत आलेल्या व्यवसायाची शक्ती कमी होऊ लागली. लोक निर्धन बनू लागले. यामुळे ब्रिटिशांच्या विरुद्ध आक्रोश वाढला. या संघर्षाला प्रेरणा ठरलेले अंश राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक राजकारभार आणि सैनिक कारणामध्ये वर्गिकरण करू शकतो.

### 1. राजकीय कारण

लॉर्ड वेलस्लीची तैनाती फौज आणि लॉर्ड डलहौसीच्या दत्तक वारसा नामंजूर नीतीमुळे अनेक राजे व नवाब पदच्यूत झाले. सातारा, जयपूर, संबलपूर, उदयपूर, झाशी, अवध या प्रदेशावर डलहौसीने आक्रमण करून ताबा मिळविला. इतकेच नाही तर काही राजाना फक्त विश्रांती वेतन देण्यात आले. राजाची पदवी रद्द करण्यात आली. यामुळे स्वाभाविकपणे भारतीय कारभारी वर्ग आणि जनतेच्या जनतेच्या भावनाना आघात झाला.

### 2. कारभारविषयी कारण

ब्रिटिशानी सर्व अधिकाराच्या व सैन्य सेवेतील उच्च पदासाठी युरोपियनांची राखीवता ठेवण्याच्या उद्देशाने कारभार विषयक धोरण अवलंबिले. या व्यवस्थेमुळे जनसामान्यामध्ये विश्वास निर्माण करण्यास विफल झाले. राज्यकारभारात मध्यस्थांची भूमिका महत्वाची

होती. तयार केलेल्या कायद्यामुळे सामाजिक वर्ग व्यवस्था बिघडली. न्यायालयीन कामकाजाची भाषा पर्शियन ऐवजी इंग्लिश करण्यात आली. त्यामुळे जनता व भारतीय दूर्बल घटकांना योग्य वाटले नाही.

### 3. आर्थिक कारण



बहाद्दूर शाह

ब्रिटिशानी आपल्या फायद्यासाठी भारतातील आर्थिक संपन्नमूल व संपती बळकावण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर केला. ब्रिटिशानी भारतीय व्यवसाय बंद पाडले. भू कर व्यवस्था अत्यंत जाचक व शोषणात्मक होती. अनेक तालुकादार व जमीनदारांचे हक्क व स्थानमान काढून घेण्यात आले. मोठ्या प्रमाणात संपत्ती इंग्लंडला पाठवण्यात येऊ लागली. शेतीच्या व्यापारीकरणामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली. भयंकर दुष्काळामुळे लाखो लोक मरण पावले. या सर्व कारणामुळे आर्थिक स्थिती बिघडली.





पारंपारिक हातमाग

### 4. सामाजिक आणि धार्मिक कारण

अनेक सामाजिक आणि धार्मिक अंशसुद्धा या दंग्याला कारणीभूत ठरले. ब्रिटिशानी आपल्या धर्माचे प्रस्थ वाढविण्यास सुरूवात केली. त्यानी गोऱ्या लोकांची जबाबदारी

सिद्धांत अवलंबिला. त्यानी भारतीयांना संस्कृती आणि नागरिकतेचा गंधही नसलेले अनागरिक असे म्हटले. भारतीयाना त्यानी 'डूक्कर', 'काळे लोक' अशा शब्दानी संबोधण्यास सुरुवात केली. युरोपियनानी चालविलेल्या हॉटेल व क्लबमध्ये भारतीयाना प्रवेश नव्हता. 'कुत्र्याना व भारतीयाना प्रवेश निषिद्ध' असे नामफलक लावले होते. सती पद्धती बंदी, बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन या सर्वामुळे हिंदूना आपल्या सामाजिक व्यवस्थेत ब्रिटिशांचा हस्तक्षेप असे वाटू लागले. रेल्वे मार्ग व टेलिग्राफ तार निर्माण कार्याकडे संशयाने पाहू लागले. सर्व वर्गाच्या लोकाना एकाच डब्यातून प्रवास करावा लागत असल्यामुळे उच्च वर्गातील लोकाना राग आला.

### 5. लष्करी कारण

भारतीय सैन्यात अनेक असंतुष्ट होते. सैनिकानी धार्मिक चिन्ह व फेटे वापरू नयेत असा निर्बंध होता. भारतीय सैनिकाना कमी वेतन होते. तसेच बढतीची संधी नव्हती. ब्रिटिश सैनिकाना मात्र जादा वेतन व इतर सोयी सवलती होत्या. भारतीयाना पार दूरच्या प्रदेशात कामासाठी जादा वेतन न देता पाठवण्यात येत होते. लॉर्ड कॉनिंगच्या 'सामान्य सेनासेवा कायद्या' नुसार सर्व सैनिकाना ब्रिटिशांच्या आदेशानुसार कोठेही काम करावे लागे. या सर्वामुळे भारतीय सैनिकामध्ये असमाधनता निर्माण झाली.

### 6. तत्कालीन कारण

जनसमुहाच्या दंग्यांचा काळ सहन होणारा नव्हता. त्याचा स्फोट होण्यासाठी एकच कारण पुरेसे झाले. 1857 मध्ये नवीन प्रकारची बंदूक (एनफिल्ड रायफल) सैन्यातील शिपायांच्या दंग्याला कारणीभूत झाली. त्याचा वापर करताना त्या काडतूसाचे आवरण दातानी तोडून टाकावे लागे. या काडतूसांना गाईची व डूकराची चरबी फासलेली होती. अशी बातमी सैनिकाना समजली. त्यामुळे हिंदू व मुसलमान शिपायांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्यामुळे त्यांच्यात असंतोषाची ठिणगी पडली. या काडतूसांचा वापर करण्यास विरोध करणाऱ्या शिपायाना शिक्षा दिली जाऊ लागली.

## दंग्याचा प्रसार

10 मे 1857 रोजी मीरतमध्ये दंग्याला प्रारंभ झाला. नंतर उत्तर भारतातील प्रांतांमध्ये व्यापकपणे जास्त प्रमाणात पसरला. बंगालमधील बराकपूर येथे भारतीय शिपाई मंगल पांडे याने या बंदूकांचा वापर करण्यास नकार देऊन इंग्रज अधिकाऱ्याचा गोळी झाडून खून केला. ताबडतोब त्याला अटक करून फाशी देण्यात आली. तेव्हा मीरतमध्ये असलेल्या सर्व युरोपियन सैनिकाना ठार मारले. मारो फिरंगींको (युरोपियनाना मारा) अशी घोषणा देत दिल्लीकडे कूच केली. दिल्लीत शिपायानी वृद्ध व शक्तीहीन मोगल राजा दुसरा बहादूर शहा याला भारताचा चक्रवर्ती अशी घोषणा केली.



**मंगल पांडे**

**फिरंगी:** फिरंगी हा पर्शियन भाषेतील शब्द आहे. उर्दू व हिंदी भाषेत विदेशीना नीच माणूस सूचविण्यासाठी वापरतात.

अल्पकाळात दंगा सर्वत्र पसरला. दिल्ली, कानपूर, लखनौ, बरेली, झाशी आणि बिहारचे आरा ही दंगलीची प्रमुख केंद्रे होती.

दिल्लीमध्ये सेनापती बख्त खान, कानपूरमध्ये नानासाहेब व तात्या टोपे, लखनौमध्ये बेगम हजरत महल, झाशीमध्ये राणी लक्ष्मीबाई आणि बिहारमध्ये कुंवर सिंग यांच्या नेतृत्वाखाली चळवळ केली. ब्रिटिशानी ही चळवळ दडपून टाकली. ही चळवळ उत्तर भारतात मर्यादीत न राहता महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ, गोवा आणि पाँडीचेरीपर्यंत पसरली. कर्नाटकात मुंडरगी भिमराव, हलगली जेड जातीच्या लोकानी, सूरपूरचे व्यंकटराय आणि नरगुंदचे बाबासाहेब मुख्य



**लक्ष्मीबाई**

नेते होते. उत्तर व दक्षिण भारतात सर्वत्र चळवळ पसरली तरी सुद्धा अल्पकाळात ब्रिटिशानी चळवळ दडपून टाकली.




**महा दंग्यांचा प्रदेश**

**कृती:** : झाशीची राणी लक्ष्मीबाईनी ब्रिटिशांच्या विरुद्ध कसा लढा दिला. याची माहिती मिळवा.



कुंवर सिंग



नाना साहेब

## परिणाम

ही चळवळ अपयशी ठरली तरीसुद्धा दीर्घकालीन परिणाम झाले. भारताच्या राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रावर गंभीर परिणाम झाले. या स्वातंत्र युद्धामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सता संपुष्ठात आली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती असलेली भारतीय सत्ता ब्रिटिश राणीने आपल्या ताब्यात घेतली. सा.श. 1858 मध्ये राणी व्हिक्टोरीयाने एक घोषणा केली. या घोषणेव्दारे भारतीयांच्या धार्मिक स्वातंत्र्यात हस्तक्षेप न करण्याचे स्पष्ट करण्यात आले.

सा.श. 1857-58 ची ही चळवळ पुढे आधुनिक राष्ट्रीय चळवळीला मार्गदर्शक ठरली. यामुळे पुढील स्वातंत्र्य युद्धाला सतत प्रेरणा मिळत राहिली.

## 1857 च्या क्रांतीचे स्वरूप

ब्रिटिश इतिहासकारानी 1857 च्या भारतीय चळवळीला केवळ 'शिपायांचे बंड' असे संबोधले. परंतु भारतीय विद्वानानी याला लोकांचे महान बंड न समजता 'भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध' असे मानले.

या चळवळीला देशाचे स्वातंत्र्यासाठी केलेले पहिले युद्ध असे प्रथम विनायक दामोदर सावरकर यानी म्हटले. पट्टाभी सीताराम यानी सुद्धा याला भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध असे म्हटले. ही देशाच्या बहुतेक जन समुदायाना एकत्र आणण्यासाठी चाललेली चळवळ होय.

1857 च्या चळवळीने भारताच्या इतिहासात नवीन राजकीय जागृती निर्माण केली. याचा परिणाम म्हणजे साम्राज्यशाही विरोधी संघर्ष विविध रूपात उदयास आला. या चळवळीत भाग घेतलेल्या अनेकानी हौतात्म्य पत्करले. त्या सर्वांच्या त्याग बलीदानाचे आपण नेहमी स्मरण केले पाहिजे.

## I. खालिल प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) पहिल्या स्वातंत्र्य युद्धाचे तात्कालीक कारण कोणते?

2) मंगल पांडे कोण होता?

3) पहिल्या स्वातंत्र्य युद्धाचा कोणताही एक परिणाम लिहा.

4) 1857 च्या उठावाला भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध असे सर्वप्रथम कोणी म्हटले?

5) पहिल्या स्वातंत्र्य युद्धात भाग घेतलेला मोगल राजा कोण?

6) पहिल्या स्वातंत्र्य युद्धात भाग घेतलेल्या महिलांची नावे लिहा.

## II. गटात चर्चा करुन उत्तरे लिहा.

1) भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धातील कारणाची यादी करा.

2) भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धात भाग घेतलेल्या कर्नाटकातील नेत्यांची नावे लिहा.

**उपक्रम** मंगलपांडे, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नाना साहेब, बेगम हजरत महल, कुंवर सिंग, मुंडरगी भिमराव यांच्या क्रांतीकारी जीवन कथा वाचा.

## स्वातंत्र्य चळवळ (1885-1919)

ब्रिटिशांच्या शोषणात्मक नीतीमुळे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीयतेचा उदय झाला. इंग्लिश शिक्षण घेतलेल्या उच्चशिक्षित वर्गाने ब्रिटिश सत्तेचा खरा उद्देश समजून घेतला. शेतकरी, आदिवासी व इतर वर्गाच्या लोकांनासुद्धा ब्रिटिशांच्या गुलामगिरीचा फार त्रास झाला. त्यानी ब्रिटिशाविरुद्ध तीव्र लढा दिला.

### राष्ट्रीयतेची चळवळ

भारतात अनेक संस्कृतींचा मिलाप दिसून येतो. आपल्याला सांस्कृतिक आणि चारित्रिक परंपरा आहे. यामुळे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीयतेच्या वाढीसाठी तात्वीक पाया घातला. राष्ट्रीयता म्हणजे एका ठराविक भौगोलिक प्रदेशातील जनतेच्या मनात असलेली 'आपण सारे एक आहोत' अशी एकतेची भावना होय.

1857 च्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धात भारतीयांच्या चळवळीला ठिकठिकाणी वेगळा संघर्ष करण्यात आला. त्यामुळे त्यांच्यात योग्य सामजस्य न राहिल्यामुळे अपयश आले. परंतु जागृतीने भारतीयांच्यात संघटनेची महत्वाची जाणीव निर्माण झाली. त्याने एक राष्ट्रीय चळवळीचे रूप घेतले. राष्ट्रीयतेच्या वाढीसाठी काही अंश प्रेरणादायी ठरले. ते खालीलप्रमाणे.

### पाश्चिमात्य शिक्षण आणि आधुनिक ज्ञानविज्ञानाचा परिचय

इंग्लिश शिक्षण घेतलेल्या भारतीयांवर युरोपियन वैचारिक ग्रंथ वाचून राष्ट्रीय राजकीय मनोभावनांचा ठसा उमटला. युरोपियनामध्ये उदयास आलेली स्वातंत्र्य, समानता आणि

बंधुत्वाची परिकल्पना राजकीय प्रेरणा ठरली. त्यामुळे त्याना स्वातंत्र्याच्या ईच्छेसाठी स्फूर्तीदायक ठरली. ‘इंग्लिश शिक्षण घेतलेल्या भारतीयानी आपला पाठींबा आहे’ असे लेखी दिले.

## एकरूप कारभाराची पद्धत

ब्रिटिशानी भारतात एकरूप कारभार व्यवस्था अंमलात आणली. त्यामुळे एकच नियम सर्वासाठी असल्यामुळे भारतीयांच्यात समानतेची भावना निर्माण झाली. अशा प्रकारे ब्रिटिशानी लागू केलेल्या जनविरोधी कायद्याना सर्वानी संघटीतपणे विरोध केला. यामुळे भारतीयांच्यात आपण सर्व एक आहोत ही राष्ट्रीय एकात्मतेची जागृती होण्यास मदत झाली.

## आर्थिक शोषण

ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे भारतीयांच्या व्यापार, शेती, उद्योगधंदे, हस्त व्यवसाय यावर विपरीत परिणाम झाला. जमिनीत व्यापारी पिके जादा पिकविली जाऊ लागली. दादाभाई नवरोजीनी भारताच्या संपत्तीची केलेली लूट आपल्या ‘संपत्तीचा द्रवण सिद्धांत’ या द्वारे प्रतिपादीत केला आहे.

## परंपरेचा परिचय

सर विलियम जोन्स, एच.टी. कोलब्रुक, मैक्स मुल्लर, कनिंग हॅम इत्यादी विदेशी विद्वानानी भारताच्या चारित्रिक परंपरेचा परिचय भारतीयांना करुन दिला. यामुळे भारतीय परंपरा ग्रीक, रोमच्या तुलनेत कमी नाही हे सिद्ध झाले. यामुळे राष्ट्रीयतेची मुळे स्वातंत्र्याच्या रूपात रुजली.

## सामाजिक धार्मिक चळवळी

19 व्या शतकात भारतीय समाज सुधारक राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्या सागर, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद अशा अनेकानी भारतातील दूर्लक्षित व शोषित

समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले. दयानंदानी स्वराज्य व स्वदेशी विचारधारेचा आग्रह धरला तर विवेकानंदानी मागास समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले. यामुळे राष्ट्रीयतेच्या वाढीस चालना मिळाली. विद्यावंत भारतीय क्रियाशील बनले.

### भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धाची स्फूर्ती

या घटनेमुळे भारतीयाना राजकीयपणे संघठीत होण्याची गरज लक्षात आली. एवढेच नाही तर या युद्धात हौताम्य पत्करलेले मंगल पांडे, राणी लक्ष्मीबाई, हजरत महल इत्यादी नायक पुढील नेत्याना स्फूर्तीस्थान ठरले.

### समाजातील तारतम्य

ब्रिटिशानी स्वतःला श्रेष्ठ समजून भारतीयाना अनागरिक म्हणून हीणवले. राज्यकारभारातील उच्च पदे फक्त ब्रिटिशानाच राखीव ठेवली. यामुळे एकाच पद्धतीच्या कायद्या अंतर्गत भारतीयांच्यात सहजपणे आपण सर्व एक आहोत ही भावना निर्माण झाली. ब्रिटिशानी लागू केलेले जनविरोधी कायदे, नियम याना सर्वांनी संघटीतपणे विरोध केला. यामुळे भारतीयामध्ये आम्ही सर्व एक आहोत ही राष्ट्रीय जागृती निर्माण झाली.

### भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (1885)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापन्यात निवृत्त ब्रिटिश अधिकारी ॲलन ऑक्टेवियन ह्यूम याचा महत्वाचा वाटा होता. याची स्थापना 1885 मध्ये मुंबई येथे झाली. उमेशचंद्र बॅनर्जी हे राष्ट्रीय काँग्रेसचे प्रथम अध्यक्ष होते. मुंबईमध्ये झालेल्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात 72 प्रतिनिधीनी भाग घेतला. यापैकी जास्तीत जास्त वकील, पत्रकार आणि समाजातील प्रतिष्ठीत वर्गातील होते. वास्तविक काँग्रेस ही राष्ट्रीय चळवळीला चालना देणारे प्रथम राजकीय व्यासपीठ होते.



ए.पी. ह्यूम काँग्रेसचे संस्थापक



उमेशचंद्र बॅनर्जी प्रथम अधिवेशन अध्यक्ष

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे काही अध्यक्ष



सय्यद बद्रुद्दीन तय्यवजी



फिरोजशहा मेहता

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उद्देश

- देशातील विविध भागातील राजकीय कार्यकर्त्यामधील स्नेहसंबंध वाढविणे.
- राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे.
- जनतेच्या मागण्या सरकारपुढे मांडून त्या मान्य करून घेणे.
- प्रांत रचनेला विरोध करून राष्ट्रीयता वाढीस लावणे.

## मवाळांचा कालखंड (1885-1905)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रारंभीचे नेते मवाळ होते असे म्हटले जाते. सा.श. 1885 ते 1905 मधील काळाला 'मवाळांचा काळ' असे म्हणतात. त्यानी संविधानाच्या नीतीवर विश्वास ठेवला. ब्रिटिशांच्या कारभारात निष्ठावंत राहून प्रार्थना, निषेध व उपोषण या नीतीचा वापर केला. त्याचबरोबर राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटिशांचे मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. प्रमुख मवाळ नेत्यापैकी दादाभाई नवरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोपाळकृष्ण गोखले, महादेव गोविंद रानडे हे होत.

मवाळांच्या चळवळीमुळे भारतीयाना शासन दरबारी प्रवेश करणे शक्य झाले. परंतु मवाळांच्या प्रयत्नामुळे भारतातील गरिबी निर्माण झाली असे समजले जाते. त्याचबरोबर भारतीय राजकीय संघर्षासाठी आवश्यक प्रशिक्षण घेण्याबरोबरच ब्रिटिश विरोधी चळवळीची व्याप्ती वाढली.



**दादाभाई नवरोजी**



**सुरेंद्रनाथ बॅनर्जी**



**गोपाळकृष्ण गोखले**

**प्रमुख मवाळ नेते**

## मवाळांच्या मागण्या

भाषण व मुद्रण स्वातंत्र्य, सरकारी यंत्रणा व न्याय व्यवस्था वेगळी करणे, लष्करी खर्चात कमी करणे, प्राथमिक, माध्यमिक व तांत्रिक शिक्षणात सुधारणा, शस्त्रास्त्र निषेध कायद्याची अमंलबजावणी, बँक व्यवस्था, पाण्याची सुविधा, वैद्यकीय व आरोग्य विषयक सोयी सवलती, मिठावरील कर रद्द करणे, इंग्लंड व भारतात एकाच वेळी आय पी. एस. परीक्षा घेणे. केंद्र व प्रांतीय सरकारमध्ये भारतीयाना प्रतिनिधीत्व देणे. उच्च नोकऱ्या भारतीयाना देणे. इत्यादी.

## जहालांचा कालखंड ( 1905–1919)



**लाला लजपतराय (लाला)**



**बाळ गंगाधर टिळक (बाल)**



**बिपीन चंद्रपाल (पाल)**

मवाळ सामान्य जनतेपासून दूर राहिले. त्यानी अनुसरलेल्या प्रार्थना व विनवणी नीतीला 'याचक नीती' (पॉलीसी ऑफ मेंडीकेन्सी) अशी टिका केली. युवावर्ग त्यांच्या नीतीमुळे आकर्षित झाला नाही. त्यांच्या वाट बघण्याच्या पद्धतीला विरोध करून नव नायकांचा एक गट काँग्रेसमध्ये उदयाला आला. त्याना जहाल असे म्हणतात. लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक व बिपीन चंद्रपाल हे जहालांचे नेते होते. लाल–बाल–पाल या नावाने प्रसिद्ध होते. सा.श. 1905–1919 या काळाला जहालांचा काळ असे म्हणतात.

### जहालाच्या चळवळीची कारणे

- भारतीयाना उच्च पदे मिळवून देणे.
- 1905 साली लॉर्ड कर्जनने बंगालची फाळणी करून जातीय राजकारण करण्याचा प्रयत्न केला.
- 1905 साली रशियाने लहान देश जपानचा पराभव केल्यामुळे रशिया आशियावर ताबा मिळवू शकतो असा आत्मविश्वास निर्माण केला.
- आयर्लंड, रशिया, चीन, टर्की, इजिप्त राष्ट्रामध्ये चाललेल्या क्रांतीकारी आंदोलनामुळे भारतीयाना प्रेरणा मिळाली.

बाळगंगाधर टिळक हे एक अप्रतिम देशभक्त होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' या त्यांच्या घोषणेत स्वातंत्र्याची उत्कटता होती. भारतीयाना एकत्रित करण्यासाठी टिळकानी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव सुरू केले. 'मराठा' (इंग्लिश) व 'केशरी' (मराठी) वृतपत्रे सुरू केली. बिपीन चंद्र पालनी 'न्यू इंडिया' आणि अरविंद घोषनी 'वंदे मातरम्' ही वृतपत्रे सुरू केली. लाला लजपतराय हे पंजाबचे सिंह म्हणून लोकप्रिय झाले. त्यानी 'आम्हाला स्वराज्य हक्काने पाहिजे भिक्षा म्हणून नको' असे म्हटले. बिपीन चंद्र पालनी 'सामुहिक चळवळ' सुरू केली. अरविंद घोष हे आणखी एक जहाल नेते होते. विदेशी वस्तूवर बहिष्कार, स्वदेशी वस्तूंचाच वापर, राष्ट्रीय शाळा सुरू करणे ही अरविंद घोषांची कार्यपद्धती होती.

### बंगालची फाळणी (1905)

1905 साली झालेल्या बंगालच्या फाळणीमुळे जहाल नेत्यांच्या राष्ट्रीय चळवळीला प्रेरणा मिळाली.बंगालमध्ये राष्ट्रीयतेच्या वाढीमुळे ब्रिटिश भयभीत झाले. त्यामुळे

बंगालमधील हिंदू व मुस्लीम यांच्यात जातीय तेढ निर्माण करून फाळणीद्वारे राष्ट्रीयतेची तीव्रता कमी करण्यासाठी वाईसराय लॉर्ड कर्जनने प्रयत्न केला. या फाळणीला विरोध करण्यासाठी 16 ऑक्टोंबर 1905 रोजी संपूर्ण बंगालमध्ये 'राष्ट्रीय शोकदिन' आचरण्यात आला. रविंद्रनाथ टागोरांचे 'अमर सोनार बांग्ला' हे राष्ट्रीय गीत म्हणून गाईले गेले. 'वंदे मातरम्' ही घोषणा सर्वांची झाली. बंगालमध्ये एकात्मता दर्शविण्यासाठी हिंदू-मुस्लिमानी रक्षाबंधन आयोजित केले. जनतेचा तीव्र विरोध लक्षात घेऊन 1911 साली फाळणी रद्द करण्यात आली.



**बंकिम चंद्र चटर्जी**



**लॉर्ड कर्जन**

## मुस्लीम लीगची स्थापना (1906)

ब्रिटिशानी जातीय तेढ निर्माण करून कारभार करण्याची नीती मुस्लिमाना दूर करण्याचा प्रयत्न केला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून मुस्लिमांची स्वहिताची एक स्वतंत्र संघटना स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. 1906 साली मुस्लीम नियोग नवाब सलीम अली व इतरांनी मिळून 1906 साली भारतीय मुस्लीम लीगची स्थापना ढाका येथे केली. (सद्याचे बांग्लादेश)

## सूरत दूफळी (1907)

बंगाल विभाजनाच्या विवादामुळे जहालानी देशात सर्वत्र स्वदेशी व बहिष्कार चळवळ मोठ्या प्रमाणात चालू केली. परंतू मवाळानी त्याची व्याप्ती फक्त बंगाल पुरतीच मर्यादीत ठेवली. एवढेच नाही तर मवाळ सरकारबरोबर थेट संघर्ष करण्यास तयार नव्हते. जहाल व मवाळांच्या या भिन्न मतभेदामुळे काँग्रेसमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. 1907 मध्ये सूरतमध्ये झालेल्या काँग्रेस अधिवेशनात मवाळ व जहालामध्ये काँग्रेस विभागली गेली.

काँग्रेसमधील दूफळीनंतर जहालाविरूद्ध दबावतंत्र अवलंबिले. त्यापैकी काही जणांना तुरूंगात डांबले, काहीना हद्दपार केले. टिळकाना काळया पाण्याची शिक्षा देऊन मंडालेच्या (बर्मा) तुरूंगात पाठविले.

जहालांचा प्रभाव कमी करण्यासाठी ब्रिटिशांनी मवाळांना व मुस्लिमाना सरकारमध्ये जादा प्रतिनिधित्व देऊन शांत करण्याचा प्रयत्न केला. या दृष्टिने मिंटो-मार्ले सुधारणा 1909 मध्ये लागू करण्यात आल्या. त्यामुळे कायद्यान्वये मुस्लिमांना स्वतंत्र निवडणूक संघ देण्यात आले. पहिल्या स्वातंत्र्य युद्धाला सुरूवात झाली (1914). त्यामुळे राष्ट्रीय चळवळीला प्रेरणा मिळाली. 1916 साली टिळकांनी व ॲनी बेझंट यांनी होमरूल (अंतर्गत शासन) चळवळ सुरू केली.

### होमरूल चळवळ

ही चळवळ आयरीश होमरूल चळवळीपासून प्रेरीत झाली होती. याचा मुख्य उद्देश म्हणजे भारताला स्वतःचे सरकार आणणे हा होता. टिळक व ॲनी बेझंट यांनी 1916 मध्ये स्वतंत्र्यपणे होमरूल चळवळ महाराष्ट्र व तामिळनाडू प्रांतात सुरू केली.

## रौलेट कायदा (1919)

1917 डिसेंबरमध्ये न्यायमूर्ती रौलेट यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती स्थापन करण्यात आली. याचा उद्देश भारतीय क्रांतिकारी चळवळ संपविण्याचा होता. 1919 च्या फेब्रुवारीमध्ये रौलेट कायदा लागू करण्यात आला. या कायद्यानुसार संशयित व्यक्तीला कोणत्याही कारणाशिवाय सरकार कैद करू शकत होते. पूर्व सुचना न देता कोणत्याही भागात शोध मोहिम हाती घेण्यात येत होती. बंदी केलेल्या व्यक्तीना वकील नेमण्याचा हक्क नव्हता. भारतीयांनी याचा तीव्र विरोध केला.

## जालियनवाला बाग हत्याकांड (1919)

रौलेट ॲक्टच्या (रेग्यूलेटींग ॲक्टच्या) कायद्याविरोधात गांधीजीनी सत्याग्रहाचा लढा हाती घेतल्याने बहुतेक भागामध्ये चळवळी सुरू झाल्या. 13 एप्रिल 1919 मध्ये (वैशाखसणादिवशी) अमृतसरयेथील सुवर्ण मंदिराच्या थोडयाशा अंतरावर असलेल्या जालियनवाला बागेत सभेचे आयोजन केले. सभेचे नायक डॉ. किच लू आणि डॉ. सत्यपाल यांच्या बंधनाविरुद्ध चळवळ पुकारणार होते.

अमृतसरचे रक्षणाध्यक्ष असलेले जनरल डायर यानी चळवळ करणाऱ्याना धडा शिकविण्यासाठी बागेला असलेला एकच एक दरवाजा बंद केला व सर्वांवर गोळ्या झाडण्याचा हुकूम सोडला. निशस्त्र असलेली जनता भांबावून गेली. गोळीबारात सरकारच्या सांगण्याप्रमाणे फक्त 379 लोक मरण पावले. पण वास्तवात त्यापेक्षाजास्त लोक मरण पावले होते.



**जालियनवाला बाग हत्याकांड**

## क्रांतीकारी राष्ट्रीयता

शस्त्र हाती घेऊन काही लोकांनी स्वतःला झोकून दिले. त्याना 'क्रांतीकारी राष्ट्रीयतावादी' असे म्हणू लागले. भारताला पूर्णपणे स्वातंत्र्य मिळवून देण्याचे धैर्य यांच्यात होते. गाढ देशभक्ती आणि त्याग हे क्रांतीकारी राष्ट्रीयवादयांचे मूलभूत तत्व होते.

वासुदेव बळवंत फडके हे गुप्त संघटना स्थापन करणारे पहिले क्रांतीकारी होते. दामोदर व बाळकृष्ण चाफेकर बंधू हे गुप्त संघटनेचे मुख्य होते. त्या दोघांनाही बंदी करून फाशी देण्यात आली.आपल्या देशातील इतर क्रांतीकारी म्हणजे विनायक दामोदर सावरकर, खुदीराम बोस, चंद्रशेखर आझाद आणि भगतसिंग इत्यादी होत. स्वातंत्र्यासाठी फासावर चढलेले खुदीराम बोस हे पहिले हुतात्मा (1908) होय. तेव्हा त्यांचे वय 19 वर्षे होते.

देशाच्या प्रमुख क्रांतीकारांमध्ये विनायक दामोदर सावरकर हे एक होते. 1899 मध्ये यांनी 'मित्रमेळा' नावाची पहिली गुप्त संघटना तयार केली. ब्रिटिशानी त्याना 50 वर्षाचा तुरूंगवास देऊन अंदमान जेलमध्ये त्यांची रवानगी केली. कारागृहात त्यांना खूप शारिरीक त्रास सोसावा लागला. त्यांच्या पश्चात भारत सरकारने अंदमान जेलमध्ये त्यांचे स्मारक उभे केले.



**खुदीराम बोस**



**विनायक दामोदर सावरकर**



**चंद्रशेखर आझाद**



**भगत सिंग**

चंद्रशेखर आझाद हे 'हिंदूस्थान सोशियॅलिस्ट रिपब्लीकन असोशियेशन' मध्ये मिसळून 'कोकरी फितूर' शासनाच्या सभेत बॉम्ब ब्लास्ट तसेच लाहोर मध्ये ब्रिटिश अधिकारी सँन्डर्सन यांच्यावर गोळीबार अशा घटनांमध्ये सहभागी होते.

ब्रिटिश सैन्यामध्ये लपून एक लहान पिस्तूल सोबत घेऊन एकटेच लढणारे चंद्रशेखर आझाद होय. एकच गोळी शिल्लक असताना स्वतःच्या कपाळावर गोळी झाडून आपण बंदिस्त होणार नाही ही प्रतिज्ञा त्यानी पाळली. भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, भगवती चरण तसेच गयाप्रसाद अशा अनेक हुतात्म्यांचे नेतृत्व आझाद यांनी केले.

भगतसिंग यांनी भारतीय समाजवादी रिपब्लिकन संघाचे प्रमुख कार्यदर्शी म्हणून कार्य केले. 1929 मध्ये भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी दिल्लीत केंद्रीय शासन सभेमध्ये बॉम्ब टाकले. याकारणामुळे लाहोर सेंट्रल जेलमध्ये त्या तिघाना फाशी देण्यात आली. 'इंकीलाब जिंदाबाद' अशी घोषणा देणारे प्रथम भारतीय होते.

## मुख्य इसवीसन

| | |
|---|---|
| भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना | : 1885 |
| मवाळांचा काळ | : 1885-1905 |
| जहालांचा काळ | : 1905-1919 |
| बंगालची फाळणी | : 1905 |
| मुस्लीम लिगची स्थापना | : 1906 |
| सूरत दुफळी | : 1907 |
| जालीयनवाला बाग हत्याकांड | : 1919 |

## I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

1) राष्ट्रीयता म्हणजे काय?

2) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केव्हा व कोणी केली?

3) बंगालची फाळणी केव्हा झाली?

4) बाळ गंगाधर टिळकानी कोणती प्रसिद्ध घोषणा केली?

5) भारतीय मुस्लीम लिगची स्थापना केव्हा झाली?

6) लाल, बाल आणि पाल या नावाने लोकप्रिय राष्ट्रीय नेते कोण?

7) होमरूल चळवळ कोणी सुरू केली?

8) जालीयनवाला बाग हत्याकांड केव्हा घडले? या घटनेला जबाबदार ब्रिटिश पोलीस अधिकारी कोण?

9) कोणत्याही एक गुप्त क्रांतीकारी संघटनेचे नाव लिहा.

10) 'इन्कीलाब जिंदाबाद' ही घोषणा कोणी दिली?

## II. गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) भारतात राष्ट्रीयतेच्या उदयास कारणाभूत अंश लिहा.

2) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उद्देशाची यादी करा.

3) भारतीय स्वातंत्र्य युद्धात क्रांतीकारकांचे योगदान लिहा.

### उपक्रम

1) दादाभाई नवरोजी व बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र वाचा.

2) क्रांतीकारकांच्या चित्रांचा माहितीसह अल्बम तयार करा.

3) खालील क्रांतीकारकांचे जीवन चरित्र वाचा. संक्षिप्त माहिती लिहून शाळेच्या बोर्डावर लावा.

वासुदेव बळवंत फडके, खुदीराम बोस, चंद्रशेखर आझाद, भगत सिंग, मॅडम कामा.

## 3.गांधी युग (1919–1947)

महात्मा गांधीजीना आम्ही प्रेमाने 'बापू' म्हणतो. भारताच्या राष्ट्रीय चळवळीत ते एक महानायक होते. त्यानी शोषणाविरुद्ध तसेच अस्पृश्यता निवारण करण्यासाठी आणि हिंदू-मुस्लिमामध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. त्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या राजकीय आंदोलनाला 'गांधी युग' (सा.श. 1919-1947) असे म्हणतात.

### 1.महात्मा गांधी

अहिंसा आणि सत्याग्रह ही गांधीजीची दोन अस्त्रे होती. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीला जनआंदोलनाचे स्वरूप दिले. सरळ स्वभावाचा, सज्जन, सत्यवादी हे यशाचे सूत्र बनवले.

### आरंभीचे जीवन

गांधीजीचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरात राज्यातील पोरबंदर येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव करमचंद व आईचे नाव पूतळीबाई असे होते.

गांधीजीच्या जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या प्रमुख साहित्य कृती म्हणजे भगवद गीता, जॉन रस्कीनचे 'शेवट पर्यंत' (Unto this last), टॉलस्टायचे 'तुझे अंतरंग म्हणजे देवाचे राज्य' (The kingdom of God is within you) आणि 'सत्य हरिश्चंद्र' नाटक होय.

### दक्षिण आफ्रिकेमध्ये गांधीजी

गांधीजींचे प्रारंभिक शिक्षण पोरबंदर येथे झाले. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडना गेले. त्यानी ब्रिटनमध्ये कायद्याची पदवी मिळविली. 1891 मध्ये ते भारतात परतले. राजकोट व मुंबई येथे वकीली करण्यात गुंतले. काही काळानंतर दादा अब्दूल्ला नावाच्या कंपनीने कायदा सल्लागार म्हणून त्याना दक्षिण आफ्रिकेत बोलावून घेतले.

दक्षिण आफ्रिकेमध्ये असताना भारतीय तेथे हीन दर्जाचे जीवन कंठत असलेले गांधीजीनी पाहिले. गोऱ्या सरकारची जातीयतेची नीती पाहून त्यानी त्याचा विरोध केला.

सत्याग्रह व अहिंसा मार्गाचा अवलंब करून सरकारची जातीयतेची नीती व पूर्वग्रह बदलविण्यात गांधीजीना पुरेशे यश दिसून आले.

सत्याग्रह सिद्धांत हा दोन संस्कृत शब्दानी बनला आहे. ‘सत्य’ म्हणजे वास्तविक संगत व आग्रह म्हणजे हट्ट याचाच अर्थ सत्यासाठी दृढपणे उभे राहा’

**कृती :** गांधीजीनी दक्षिण आफ्रिकेमध्ये चालविलेल्या सत्याग्रह आणि अहिंसात्मक चळवळीबाबत अधिक माहिती मिळवून संग्रहीत करा.

**आरंभीचे राजकीय जीवन** 1915 साली गांधीजी भारतात परतले व त्यानी अहमदाबाद येथे साबरमती आश्रमाची स्थापना केली (1916). त्यानी त्यांचे राजकीय गुरु गोपाळकृष्ण यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण भारतात प्रवास करून जनतेची शोचनीय स्थिती पाहिली. चंपारण्य व खेडामध्ये शेतकऱ्यांच्या वतीने चळवळ केली.

**चंपारण्य** चंपारण्य (बिहार) येथील शेतकऱ्यांचे व मळेवाले यांच्या असमाधान, विरोध आणि दंगलीना दीर्घ इतिहास आहे. मळेवाले सक्तीने नीळ पिकविण्यासाठी बळजबरी करत असत. गांधीजीनी त्यांच्या विरुद्ध 1917 मध्ये चंपारण्य सत्याग्रह सुरू केला. अखेर शेतकऱ्यांची समस्या निवारण झाल्याचे दिसून आले. या चळवळीद्वारे बाबू राजेंद्र प्रसाद प्रमुख नेते म्हणून उदयास आले

**खेडा येथील शेतकरी आंदोलन** खेडा हा गुजरात राज्यातील प्रमुख जिल्हा होता. सा.श. 1918 मध्ये पिकांचे नुकसान होऊन शेतकरी आर्थिक दृष्ट्या संकटात सापडले. या संदर्भात त्यानी महसूल भरणे रद्द करावे यासाठी सरकारला विनंती केली. सरकारने ही मागणी फेटाळली. शिवाय महसूल भरणा करण्यासाठी दबाव आणला. याचा परिणाम असा झाला की, खेडा येथे शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू झाले. गांधीजीनी या आंदोलनास संपूर्ण पाठींबा दिला आणि शेतकऱ्यानी महसूल भरू नये असे सांगितले. शेवटी सरकारने

आपला निर्णय बदलला व ज्याना महसूल भरणे साध्य होते त्यानी महसूल भरावा असे जाहीर केले. हे गांधीजीनी मान्य केले आणि चळवळ मागे घेतली. या आंदोलनाच्या सहाय्याने सरदार वल्लभभाई पटेल राजकीय नेत्यांमध्ये सामील झाले.

### स्वातंत्र चळवळीत गांधीजी

स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सा.श. 1919 हे वर्ष महत्वाचा टप्पा ठरले. हे वर्ष गांधीजीचे भारताच्या राजकीय जीवनात प्रवेश करण्यासाठीचे पहिले पाऊल ठरले. ब्रिटिशाना शारीरिक बळाचा वापर करून हाकलून लावणे शक्य नाही हे गांधीजीनी मनोमनी ओळखले. सा.श. 1919 मध्ये गांधीजीनी रौलेट ॲक्ट आणि जालीयनवाला बागेतील घोर हिंसात्मक कृत्याविरुद्ध चळवळ सुरू केली. त्याशिवाय खिलाफत चळवळीचे नायकत्व स्वीकारले. या चळवळीच्या माध्यमातून हिंदू आणि मुस्लीम यांच्यात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

#### खिलाफत चळवळ म्हणजे काय?

तुर्कीचे साम्राज्य खलिफांच्या अंमलाखाली होते. खलिफा हा सर्व मुस्लिमांचा धर्मगुरु आहे यावर अनेक मुस्लिमांचा विश्वास होता. पहिल्या महायुद्धाच्या प्रसंगी तुर्क ब्रिटिशांच्या विरुद्ध उभे राहिले आणि युद्धात त्यांचा पराभव झाला. तुर्कस्तानचे भाग पडले व अरेबिया, जॉर्डन, इराक इत्यादी स्वतंत्र राज्ये निर्माण झाली.

1919 मध्ये कमाल पाशा नावाच्या नेत्याने तुर्की खलिफाच्या राजांची संघटना करून अधिकारावर आला. याला पाठींबा देऊन भारतीय मुस्लिमानी खलिफाला सहकार्य करून ब्रिटिशांच्या विरुद्ध आंदोलन सुरू केले. यालाच खिलाफत चळवळ असे म्हणतात. गांधीजीनी चळवळीचे नेतृत्व केले. महमद अली व शौकत अली (अली बंधू) या चळवळीत प्रमुख होते.

## असहकार चळवळ (1920-1922)

गांधीजीच्या नेतृत्वाखाली असहकाराची चळवळ सा.श. 1920 मध्ये सुरू झाली. त्यानी सरकारला असहकार करण्याच्या चळवळीबरोबर स्वराज्याची मागणी करण्यासाठी दबावही सुरू ठेवला. या कार्यक्रमाच्या अनुसंगाने न्यायालये, शैक्षणिक संस्था, कायदे मंडळाच्या निवडणूका आणि ब्रिटिशांच्या वस्तूवर बहीष्कार घातला. सरकारने दिलेल्या पदव्या व बहुमान सरकारला परत केल्या.

याच काळात प्रमुख नेते चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरु, वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस यानी या चळवळीत प्रवेश केला. गांधीजीच्या अहिंसात्मक व सत्याग्रहासारख्या धोरणामुळे समाजातील सर्व स्तरातील वर्ग त्यांच्याकडे आकर्षित होऊन चळवळीत सहभागी झाले. या चळवळीत विद्यार्थी, शेतकरी आणि महिलाही सहभागी होत्या. हा एक भारतीयाना मिळालेला नवा अनुभव होता. रविंद्रनाथ टागोर यानी आपली ‘नाईटहूड’, गांधीजीनी आपली ‘कैसर-ए-हिंद’ पदव्या सरकारला परत केल्या. याचवेळी सरकारने चळवळ दाबून टाकण्यासाठी दबावाचे तंत्र अनुसरले. उत्तर प्रदेशातील चौरिचौरामध्ये सत्याग्रही व पोलीसांच्यात चकमक झाली. 22 पोलीसांना जमावाने जीवंत जाळले (1922). गांधीजीना या घटनेमुळे अत्यंत दुःख झाले.

गांधीजीनी 1924 पासून 1929 पर्यंत रचनात्मक कार्यक्रम आरंभून खादीचे कपडे लोकप्रिय करण्यासाठी आणि हरिजनांच्या उद्धारासाठी स्वतःला समर्पित केले. स्वातंत्र्यवादी सी.आर. दास आणि मोतीलाल नेहरु यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आंदोलन पुढे चालू ठेवले.

### गांधीजीच्या प्रमुख साहित्य कृती

‘सत्यासाठी माझे प्रयोग’ ‘हिंद स्वराज्य’ ‘दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह’ या साहित्य कृती गांधीजीनी लिहिल्या. ‘हरिजन’ आणि ‘यंग इंडिया’ ही वृतपत्रे संपादीत केली.

## नेहरु अहवाल (सा.श. 1927)

ब्रिटिश सरकारने भारतीयांना सर्व पक्षाना मान्य होईल असे संविधान तयार करू असे आश्वासन दिले. भारतात सर्वपक्षांच्या बैठकीत मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन्यात आली. समितीने ब्रिटीशाना आश्चर्य वाटेल अशा संविधानाची रचना केली. परंतू ब्रिटिशानी या संविधानाचा अहवाल फेटाळून लावला. त्यामुळे समितीने आपले अंतिम ध्येय म्हणून संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्याचा ठराव केला.

## सायमन कमिशन आयोग ( सा.श. 1928)

ब्रिटिश सरकारने 1919 च्या सुधारणांचा भारताच्या प्रांतात कसा अंमल करता येईल याचा अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी सायमन आयोगाला भारतात पाठवले (1928). या आयोगात फक्त इंग्लीश सदस्य होते. भारतीयाना आयोगात सदस्यत्व नव्हते.




**सायमन परत जा**

भारतीयांनी 'सायमन परत जा' अशी घोषणा देत आयोगावर बहिष्कार टाकला. लाहोरमध्ये चाललेल्या जन आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. या संदर्भात झालेल्या पोलिसांच्या हल्यात लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला (1928).

## संपूर्ण स्वराज्य (सा.श. 1929)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये युवापिढीचे प्रतिनीधित्व करणारे जवाहरलाल नेहरु व सुभाषचंद्र बोस यांनी नेहरु अहवालात (नेहरु रिपोर्ट) नमुद केल्या गेलेल्या अटी ब्रिटिशांनी मान्य केल्या नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की 1929 मध्ये लाहोरमध्ये झालेल्या अधिवेशनात 'संपूर्ण स्वराज्याची' घोषणा करण्यात आली. 26 जानेवारी 1930 रोजी संपूर्ण स्वराज्यदिन म्हणून साजरा करण्याचा ठराव अधिवेशनात संमत झाला. हा ऐतिहासीक प्रसंग व या दिनाची आठवण रहावी म्हणून स्वतंत्र भारताचे संविधान याच दिवशी म्हणजे 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आणले. तेव्हापासून प्रत्येकवर्षी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.

## नागरी कायदेभंगाची चळवळ



**दांडी यात्रा**

कायदे भंगाची चळवळ 12 मार्च 1930 रोजी गांधीजींनी प्रसिद्ध दांडी यात्रेपासून सुरू केली. आपल्या 78 अनुयायासह गांधीजींनी साबरमती आश्रमापासून पदयात्रा आरंभिली. ती गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावरील दांडी या गावापर्यंत सुमारे 375 कि.मी. दूरवर असलेल्या या ठिकाणी लोकांकाडून मीठ तयार करून मीठाचा कायदा मोडण्याचा उद्देश होता.

कायदेभंग चळवळीची वार्ता अत्यंत वेगाने भारतभर पसरली. सर्वत्र लोकानी हरताळ, विदेशी मालावर बहिष्कार, खादी कपडयांचा प्रचार, दारूच्या (मद्य) दुकानासमोर तीव्र विरोध, अरण्य सत्याग्रह, कर भरण्यास विरोध इत्यादिमध्ये लोकांनी भाग घेतला. अंकोल्यातील मीठाच्या सत्याग्रहाचा दाखला भारतात प्रसिद्ध आहे. याच वेळेला वायव्य भारतातील 'सरहद्ध गांधी' खान अब्दुल गफार खान यांनी 'खूदायी खितमदगार' (देवाचे सेवक) ही संघटना स्थापन केली.

नागालँड मध्ये 13 वर्षाच्या मुलीने राणी 'गायदिल्यू' हिने ब्रिटिशाविरुद्ध बंड पुकारले. अशातऱ्हेने भारतीयाना काही राजकीय सवलती मिळवून देण्यासाठी हे सर्व नेते पुढे आले.

## गोलमेज परिषद (1930–1932)

दांडीयात्रेच्या नंतर ब्रिटिश सरकारने तीन गोलमेज परिषदा लंडन येथे आयोजित केल्या. गांधीजींनी दुसऱ्या गोलमेज परिषदेत भाग घेतला. या परिषदा भारतीयांच्या राजकीय समस्यांचे निवारण करण्यासाठी विफल ठरल्या. परंतु ब्रिटन प्रधान मंत्री रामसे मॅकडोनाल्ड याने गोलमेज परिषदेनंतर धर्माचा निर्णय (कम्यूनल वकार्ड) (1932) घोषणा केली. या घोषणे प्रमाणे दलित वर्गासाठी स्वतंत्र निवडणुक क्षेत्रांची रचना केली. या निर्णयामुळे भारतीयांची एकता तोडण्याचा प्रयत्न करण्याच्या तंत्राला गांधीजींनी विरोध केला. पुण्याच्या येरवडा जेलमध्ये आमरण उपोषण सुरु केले. गांधीजी आणि आंबेडकर यांच्यामध्ये 'पुणे करार' (1932) झाला. यामुळे समस्येचे निवारण झाले.

बिटिश सरकारने 1935 मध्ये भारतीयांना सरकारमध्ये जास्त प्रमाणात सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने 'भारत सरकार कायदा' अंमलात आणला.

## छोडो भारत (चलेजाव) चळचळ (1942)

क्रिप्स आयोगाच्या विफलतेनंतर भारतीयांना चीड आली. गांधीजीनी 8 ऑगस्ट 1942 रोजी मुंबई येथे काँग्रेसचे अधिवेशन घेतले. या अधिवेशनात 'ब्रिटिशांनो भारत सोडून जा' (छोडो भारत) असा ठराव संमत करण्यात आला. गांधीजीनी 'करा किंवा मरा' असे आव्हान भारतीयाना दिले.



**छोडो भारत चळवळ**

राष्ट्रीय नेत्यांच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी देशभरात पसरली. शाळा, कॉलेज व कारखान्यात संप पाळण्यात आला. विरोधात्मक घटना चालू झाल्या. पोलीस ठाण्यावर, टपाल कचेऱ्यावर, रेल्वे स्थानकावर विविध ठिकाणी आक्रमणे सुरू झाली. विद्यार्थ्यांनी, कामगारानी आणि शेतकऱ्यांनी बंडाळी माजवली.

छोडो भारत ही चळवळ लागलीच राजकीय उद्देश साध्य करू शकली नाही. परंतु भारतातील जनतेने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी दृढ निर्धार स्पष्ट दिसून आला हे गांधीयुगातील फार मोठे आंदोलन झाले.

## सुभाषचंद्र बोस आणि भारतीय राष्ट्रीय सेना



**सुभाषचंद्र बोस**

स्वातंत्र्याच्या चळवळीत सुभाषचंद्र बोस यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. ते कलकत्ता विश्वविद्यालयातील प्रतिभावंत विद्यार्थी होते. लंडनमध्ये झालेल्या आय.सी.एस. परिक्षेत ते चौथ्या क्रमांकात होते. 'देशबंधू' चित्तरंजन दासाच्या प्रभावामुळे चाललेल्या चळवळीमध्ये आकर्षित होऊन सुभाषबाबू राजकीय क्षेत्रात समाविष्ट झाले. खास करुन स्वामी विवेकानंदांचे जीवन आणि लेखनामुळे त्यानी स्फूर्ती घेतली.

सुभाषचंद्रांना गांधीजीचा अपार आदर होता परंतु त्यांच्या राजनितीस त्यांचा विरोध होता. शेवटी गांधीजी बरोबर सुभाषचंद्राचा तीव्र मदभेद झाला. 1939 मध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन ते पक्षातून बाहेर पडले. त्यानंतर त्यानी 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचा नवीन पक्ष संघटीत केला.

याच सुमारास दुसरे महायुद्ध जोमाने सुरू होते (1939). ब्रिटिशानी सुभाषचंद्रांची क्रांतीकारी घोडदौड पाहिली. ते एक धोकादायक नेते आहेत असे समजुन त्याना त्यांच्याच घरी नजर कैद करण्यात आले. सुभाषचंद्रांनी तेथून रहस्यमय सुटका करून घेतली आणि पेशावर आणि काबूल (अफगानिस्तान) या मार्गाने मास्को येथे जाण्याचा धाडसी निर्णय घेतला.

मास्कोहून विमानाने ते जर्मनीच्या बर्लिन शहरात पोहचले. जर्मनीचा सर्वेसर्वा हिटलरची भेट घेऊन त्याच्या बरोबर एक करार केला. ब्रिटिशाना भारतातून हाकलून देण्याची त्यांची महान महत्वकांक्षा होती.

या काळात जपानने ब्रिटिशांच्या विरुद्ध दुसऱ्या महायुद्धात प्रवेश केला. युद्धात ब्रिटिशांच्या सेवेत असलेले सुमारे 40,000 भारतीय सैनिक जपानचे युद्धकैदी झाले होते. त्याना मोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय सेना (इंडियन नॅशनल आर्मी) (आय.एन.ए.) अथवा 'आझाद हिंद सेना' या नावाने संघटित करण्यात आले. 1943 मध्ये सुभाषचंद्रांनी सिंगापुरला येऊन आय.एन.ए. चे नेतृत्व स्वीकारले. त्याना 'नेताजी' या नावाने ओळखले जाऊ लागले. लागलीच त्यानी सिंगापूर येथे 'स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार' स्थापन केले. जर्मनी, जपान आणि इटली या देशांनी त्याला मान्यता दिली. चलो दिल्ली अशी घोषणा देत नेताजींच्या नेतृत्वाखाली आय.एन.ए. ब्रह्मदेशाच्या बाजूने भारतात प्रवेश (आताचे मणीपूर) केला. त्यांनी सुमारे 150 मैलाचा पल्ला गाठला. तेथे त्यांनी भारताच्या भूमीवर तिरंगा झेंडा फडकविला. परंतु ब्रिटिश सेनेने ब्रह्मदेशाची

राजधानी रंगुन जिंकून ताब्यात घेतली. त्यामुळे आय.एन.एला. माघार घ्यावी लागली. यावेळी अणूबाँम्बने उध्वस्त झालेले जपान ऑगस्ट 1945 मध्ये शरण आले. 1945 मध्ये 18 ऑगस्ट रोजी विमानाला अपघात झाला व त्यातच त्यांचा मृत्य झाला असे सांगण्यात आले.

आय.एन.ए. त्या क्षणाला ध्येय साधण्यासाठी विफल झाली असली तरी स्वातंत्र्याच्या संग्रामात तिचे एक महत्वपूर्ण स्थान आहे. 'तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो' या त्यांच्या धीरगंभीर घोषणेमुळे सुभाषचंद्रांचे धैर्य दिसून येते. त्यांची ही घोषणा भारतीयांना सतत स्फूर्तीदायी ठरली.

नेताजींच्या अप्रतिम नेतृत्वाची साक्ष म्हणजे (आय.एस.ए.) 'आझाद हिंद सेना' होय. कलकत्ता ते मास्को आणि जर्मनी ते जपान हा प्रवास त्यांनी बिकट काळात केला. याची नोंद भारतीय इतिहासात एक साहस म्हणून चिरकाल राहील. ब्रिटनचे शत्रू असलेल्यांकडून सहाय्य घेऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे हे सुभाषचंद्रांचे एकमेव ध्येय होते. नेताजी सुभाषचंद्र बोस भारतीय जनतेला धैर्य, साहस आणि उदात देश प्रेमाची उज्वल परंपरा देऊन गेले यात शंका नाही.

## आंबेडकर आणि त्यांच्या चळवळी


डॉ. बी.आर. आंबेडकर

भारताला ब्रिटिशापासून राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या संदर्भात सामाजिक स्वातंत्र्याच्या प्रश्न पुढे आणलेल्या 'संविधान शिल्पकार' डॉ.बी.आर. आंबेडकर याने बालपणी अस्पृश्यतेच्या कटू अनुभव अनुभवलेल्या आंबेडकरानी अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशातील 'महू' येथे 14 एप्रिल 1891 रोजी झाला. वडीलांचे नाव रामजी सकपाळ व आईचे नाव भिमाबाई होते. आंबेडकरांचे लहानपणीचे नाव भिमराव होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत झाले. नंतर बाँम्बेच्या इल्फीनस्टन विद्यालयात शिकले. उच्च शिक्षणासाठी लंडन स्कूल ऑफ इकनॉमिक्स,

कोलंबिया विश्वविद्यालयातून (अमेरिका) पी.एच.डी. एल.एल.डी. बार अॅटलॉ पदव्या संपादन केल्या. शिक्षण घेत असताना स्वतःचे व्यक्तीत्व विकसीत केले.

'महार' या अस्पृश्य जातीत जन्मलेल्या आंबेडकर यानी लहानपणी कटू अनुभव अनुभवले. सामाजिक असमानता दूर करण्यासाठी संविधानात्मक मार्गावर विश्वास ठेवला. एवढेच नाही तर दलीत आणि शोषिताना राजकीय प्रतिनिधित्व मिळाल्यासच त्यांचा विकास साध्य असा त्याना विश्वास होता.

यासाठी अस्पृश्यतेच्या विरुद्ध चळवळ हाती घेतली. त्यामध्ये महाडचा सत्याग्रह, नाशिकचे कलाराम देवालयातील प्रवेश अशा यशस्वी चळवळी हाती घेतल्या. दलीतामध्ये जागृती आणि स्वाभिमान निर्माण केला. 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या पत्रकांचे संपादक पद भूषवून दलित, शोषित आणि अस्पृश्यांचा आवाज बनले. बहिष्कृत हीत रक्षण सभा नावाची संघटना स्थापन केली.

डॉ. आंबेडकर दलितांचे प्रतिनिधी म्हणून लंडन येथे चाललेल्या तिसऱ्या गोलमेज परिषदेत भाग घेतला. ब्रिटिशानी घोषित केलेल्या 'धर्माचा निर्णय' (कम्यूनल अवार्ड) (1932) दलित वर्गाला स्वतंत्र निवडणूक क्षेत्र निर्माण करणे हा उद्देश होता. हा निर्णय गांधीजीना पसंत न पडल्यामुळे येरवडा तुरूंगात आमरण उपोषण सुरू केले. अखेरीस गांधीजी आणि आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार (1932) होऊन ही समस्या सुटली. पुढे स्वतंत्र भारताच्या संविधान रचना समितीचे अध्यक्ष बनून संविधान तयार करण्याची जबाबदारी निभावली. तेव्हापासून त्याना 'संविधान शिल्पकार' म्हणून प्रसिद्ध झाले.

नंतर स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाले. त्यांचे 6 डीसेंबर 1956 रोजी निधन झाले. त्यानी काही महिने अगोदर बौद्ध धर्माचा स्वीकार केला. 1990 मध्ये त्याना मरणोत्तर 'भारत रत्न' प्रदान करण्यात आले. शिक्षण, संघटना आणि चळवळ हे आंबेडकरांचे प्रसिद्ध घोषवाक्य होते.

## समाजवादी

सा.श. 1930 व्या दशकात काँग्रेसमध्ये समाजवादी विचारांचा प्रसार झाला. सा.श. 1934 च्या काँग्रेस अधिवेशनात समाजवादी गट काँग्रेसमध्ये स्पष्टपणे दिसून आला. त्यानी अल्पकाळात 'काँग्रेस सोशालिस्ट पक्षाची' स्थापना केली. त्याचे महाकार्यदर्शी जयप्रकाश नारायण होते. आचार्य नरेंद्र हे आणखी एक प्रमुख नेते होते. काँग्रेसमध्ये असलेल्या समाजवादीमध्ये प्रसिद्ध नेते जवाहरलाल नेहरु आणि सुभाषचंद्र बोस हे होते. नेहरु स्वतः एक समाजवादी होते. ते तात्वीकपणे गांधीजींच्या बरोबर होते.



**जवाहरलाल नेहरु** **जयप्रकाश नारायण** **आचार्य नरेंद्र देव**

समाजवाद्यानी अनेक शेतकरी आणि कामगार संघटना तयार करून भारतीय समाजातील दूर्बल वर्गाच्या अभिवृद्धीसाठी प्रयत्न केले. जयप्रकाश नारायण, राममोहन लोहिया, अरुणा असफ अली इत्यादी समाजवादी नेत्यानी 'भारत छोडो' आंदोलनात महत्वाची भूमिका निभावली व जनप्रिय नायक म्हणून पुढे आले.

## जयप्रकाश नारायण (जे.पी.)

जयप्रकाश नारायण यांचा जन्म 1902 मध्ये बिहार राज्यात झाला. उच्चशिक्षणासाठी त्यानी अमेरिकेत विविध विश्वविद्यालयामध्ये सात वर्षे घालविली. तेथे अध्ययन करत असताना त्याना समाजवादाचा परिचय झाला. भारतात परत आल्यानंतर जवाहरलाल

नेहरु यांच्या मार्गदर्शनाखाली त्यानी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. 1934 मध्ये त्यानी 'काँग्रेस समाजवादी पक्ष' स्थापन केला. 1941 मध्ये त्यांना अटक करण्यात आली. पण हजारीबाग कारागृहातून फरार होऊन ते भूमिगत झाले. दृष्टीआड राहून त्यांनी 'छोडो भारत' या चळवळीला पाठींबा दिला. त्यानंतर वेषपालटून भारतभर प्रवास केला. त्यांना 1944 मध्ये पुन्हा अटक करून सरकारने लाहोरला बंदिस्त ठेवले. नंतर तेथून त्यांची सुटका झाली.

स्वातंत्र्यानंतर त्यांनी विनोबा भावे त्यांच्या भूदान चळवळीत भाग घेतला. 1974 मध्ये सक्रिय राजकारणात प्रवेश केलेल्या जयप्रकाश नारायण यांचे संपूर्ण क्रांती हे आंदोलन जन्माला आले. त्यांच्या चळवळीचा परिणाम म्हणून 1977 मध्ये जनता पक्ष अधिकारावर आला. आंतरिक संघर्षामुळे जनता पक्षात फूट पडून जनतेचा भ्रमनिरास झाला. जयप्रकाश यांचे 1979 मध्ये निधन झाले. लोक त्याना प्रेमाने 'लोकनायक' असे म्हणतात.

## स्वातंत्र्याकडे वाटचाल

राष्ट्रवादींचा प्रबळ दबाव आणि दूसऱ्या महायूद्धाचा प्रसंग यामुळे ब्रिटिशांनी भारताच्या समस्येचे लवकरात लवकर निवारण करण्याच्या दृष्टीने विचार केला. याच सुमारास महायुद्धाचा परिणाम होऊन ब्रिटिशांचे आर्थिक आणि लष्करी बळ कमी झाले.

महायुद्धाच्या अखेरीस (1945) इंग्लंडमध्ये मजूर पक्ष अधिकारावर आला. त्यापक्षाने भारताबरोबर राजकीय करार करण्याचे ठरविले. या अंतिम टप्प्यात भारताच्या भविष्याचा विचार करून निर्णायक निर्धार मौलाना अबूल कलाम आझाद, जवाहरलाल नेहरु, आणि वल्लभभाई पटेल यांनी केला.

भारताकडे अधिकार हस्तांतर करण्यासाठी अनुसरावयाचे मार्ग शोधून काढण्यासाठी ब्रिटिश सरकारने 1946 मध्ये कॅबिनेट आयोगाला भारतात पाठविले. परंतू जीनांच्या नेतृत्वात मुस्लीम लिगने पाकिस्तानची निर्मिती झालीच पाहिजे असा अट्टाहास मांडला.

अशाप्रकारे भारताची फाळणी करणे अनिवार्य ठरले. 3 जून 1947 रोजी भारताचे 34 वे आणि शेवटचे गव्हर्नर जनरल व व्हाईसराय असलेले लॉर्ड माऊंटबॅटन यानी भारताची फाळणी करून भारताकडे अधिकार हस्तांतरीत करण्यात येईल अशी घोषणा केली.



**मौलाना अबूल कलाम आझाद**



**वल्लभ भाई पटेल**



**लॉर्ड माऊंट बॅटन**

14 ऑगस्ट 1947 रोजी पाकिस्तान भारतापासून वेगळा झाला. भारत 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. जवाहरलाल नेहरु हे स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री झाले. प्रारंभी व्यापाराच्या निमिताने भारतात आलेल्या ब्रिटिशानी सुमारे दोन शतके राज्य करून भारताला आर्थिक व राजकीय बाबतीत दूर्बळ करून ठेवले. भारतीयांनी चालविलेल्या आंदोलनांचा परिणाम अखेर असा झाला की साम्राज्यवाद्यांनी भारतातून माधार घेण्याची तयारी केली. दीर्घकाळ चाललेल्या चळवळीची इतिहासात एक अविस्मरणीय दिवस म्हणून नोंद झाली.

## मुख्य इसवीसन

| | |
|---|---|
| गांधीजींचा जन्म | : 2 ऑक्टोबर 1869 |
| असहकार चळवळ | : 1920-1922 |
| चौरीचौरा हत्याकांड | : 1922 |
| संपूर्ण स्वराज्याची घोषणा | : 1929 |
| संपूर्ण स्वराज्य दिनाचरन | : 26 जानेवारी 1930 |
| मिठाचा सत्याग्रह | : एप्रिल 1930 |
| पूणे करार | : 1932 |
| दुसरे महायुद्ध | : 1939-1945 |
| भारत छोडो आंदोलन | : 1942 |
| भारत स्वातंत्र्य दिन | : 15 ऑगस्ट 1947 |

### अभ्यास

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

1) ............ हे गांधीजीचे राजकीय गुरु होते.

2) गांधीजीनी अहमदाबाद जवळ स्थापन केलेला आश्रम ............ होय.

3) चौरिचौरा हत्याकांड .................. साली घडले.

4) संपुर्ण स्वराज्य निर्णय .................. साली स्वीकारण्यात आला.

5) काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचे महाकार्यदर्शी ................ हे होते.

6) संपूर्ण क्रांती आंदोलन .............. ला सुरू झाले.

7) स्वतंत्र भारताचे प्रथम प्रधान मंत्री ............... होते.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) गांधीजीचा जन्म केव्हा व कोठे झाला?
2) गांधीजीचे राजकीय गुरु कोण?
3) पूणे करार कोणामध्ये झाला?
4) फॉरवर्ड ब्लॉक ची सुरूवात कोणी केली?
5) आय.एन.ए. चा विस्तार करा.
6) 'भारत छोडो' आंदोलनात गांधीजीनी कोणती घोषणा केली?
7) 'तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो'. अशी घोषणा कोणी केली?
8) आंबेडकरांचा जन्म केव्हा झाला?
9) भारताच्या संविधानाचे शिल्पकार असे कोणाला म्हणतात?
10) 'लोक नायक' असे कोणाला म्हणतात?

## III. गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) गांधीजीच्या कायदेभंग चळवळीबाबत लिहा.
2) भारत छोडो आंदोलनाबाबत लिहा.
3) सुभाषचंद्र बोसांचा स्वातंत्र्य लढा संक्षिप्तपणे विवरण करा.
4) आंबेडकरानी सामाजिक स्वातंत्र्यासाठी हाती घेतलेल्या लढयाची माहिती लिहा.

## उपक्रम

दांडी यात्रा आणि भारत छोडो आंदोलन चळवळीबाबत अधिक माहिती संग्रह करा.

☆ ☆ ☆

| पाठ 6 | कर्नाटक – समाजाभिमुख चळवळी |
|---|---|

**पाठाचा परिचय**

सत्ताधाऱ्यांनी जनहिताविरोधी घेतलेले निर्णय, कार्यक्रम आणि योजना यांची अंलबजावणी करताना त्यांना विरोध करण्याचा हक्क (अधिकार) जनतेला आहे. कर्नाटकामध्ये ज्यावेळी असे प्रसंग दिसून आले त्यावेळी प्रज्ञावंत नागरिक रागाने पेटून उठले व आंदोलने केली. अशा अनेकवेळा दुर्बल, शोषित आणि मागासवर्गातील लोकांनी आपल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक श्रेयाभिवृद्धिसाठी आंदोलने केली आहेत. या पाठामध्ये कर्नाटकातील पर्यावरणवादी, महिला, शेतकरी, दलित, आणि कन्नडवादी संघटकांनी केलेल्या चळवळींची माहिती देण्यात आली असून अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अंमलात आणलेल्या महत्वाच्या पंचायत राज्य व्यवस्थेचा परिचय येथे करून दिला आहे.

**सामर्थ्ये**

1 काही निदर्शनावरून परिसर चळवळीचा अर्थ समजून घेणे.

2 महिलांच्या सबलिकरणासाठी सरकारने हाती घेतलेल्या कार्यक्रमांची प्रशंसा करणे.

3 शेतकऱ्यांनी आपल्या हितरक्षणासाठी चालविलेल्या आंदोलनांची माहिती समजून घेणे.

4 दलितांचे आंदोलन समजून घेणे.

5 'कन्नड रक्षणा' चळवळीची वास्तविकता समजून घेऊन त्याची आवड निर्माण करणे.

6 पंचायत राज्य व्यवस्थेची आवश्यकता समजून घेणे.

## 1 परिसर चळवळ

आपल्या पृथ्वीवरील दगड-माती, हवा, पाणी, प्रकाश या घटकांवर अवलंबून असणारे पशुपक्षी, झाडे-जुडपे आणि मानवासह इतर सर्व सजीव जगले पाहिजेत.पृथ्वीवर

नैसर्गिक समतोल आहे. येथे मानवाची नागरिक म्हणून वाढ होत असली तरी माणूस आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी परिसराचा नाश करत आहे.

पृथ्वीवर असणारे सजीव आणि निर्जीव घटक म्हणजेच परिसर होय.

औद्योगिक क्रांती, वाणिज्य व्यापारातील क्रांतीमुळे परिसर झपाट्याने नाश होत आहे. मोठमोठे उद्योजक परिसरातील संपत्तीवर आपला विकास साधण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे अनेक नवीन समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे समाज आरोग्य विषयक गंभीर समस्यांच्या आहारी जात आहे. एकूणच नैसर्गिक संपत्तीच्या नाशामुळे बहुसंख्य नागरिकांना तीव्र संकटाना सामोरे जावे लागत आहे. 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात माणसांच्यात नवी जागृती निर्माण करण्यासाठी परिसर जागृती चळवळींना प्रारंभ झाला. 1970 च्या दशकामध्ये या परिसर चळवळीची सुरुवात जागतिक पातळीवर होऊन कर्नाटकात येऊन पोहोचली.

गांधीजीनी सांगितल्याप्रमाणे 'पृथ्वी ही सर्वांच्या आवश्यकता पुरविते परंतु दुराशा नाही.'

पश्चिम घाटातील प्रदेशामध्ये खाण व्यवसायास सुरुवात झाली. त्यामुळे परिसर संरक्षण चळवळ करणे अनिवार्य ठरले. ''सह्याद्री खान विरोधी मंच'' सुरुवात होऊन कुदुरेमुख आणि इतर प्रदेशातील खान व्यवसायाना विरोध केला. केंद्र सरकारनेच लोखंडासाठी खाणव्यवसाय करणारी कंपनी स्थापन केली. या खाण व्यवसायामुळे भद्रा नदीचे उगम स्थानच प्रदुषित झाले. या आंदोलनामुळे सरकारवर मोठे दडपण येऊन टप्प्या टप्प्याने सरकारने परिसर संरक्षणाचे उपाय हाती घेतले.

**सालुमरदची तिम्मक्का:** 85 वर्षाच्या असून आजही त्या आंदोलने उभी करतात. त्या 284 झाडांच्या आई आहेत. निरक्षर असूनही समाजासमोर परिसर संरक्षणाचा धडा त्यांनी घातला आहे. त्यांचे निस्वार्थ जीवन समाजाला प्रेरणा देत राहील.



सह्याद्री पर्वतातील तुंगा ही प्रमुख नदी प्रदूषित होत असलेली पाहून 'तुंगा बचाव' आंदोलन सुरु झाले. सह्याद्री पर्वत रांगामधील अरण्ये झाडे वाढवण्याच्या उद्देशाने त्यांचा

होणारा नाश थांबविण्यासाठी भारतातील विविध प्रदेशामध्ये 'चिपको' अथवा 'अप्पीको' चळवळ सुरु झाली. चिपको चळवळीमध्ये आपले संपूर्ण जीवनच खर्ची घातलेले सुंदर लाल बहुगुणा याचे कार्य आम्ही कदापी विसरणार नाही.

**कृती :** चिपको चळवळीचे ध्येय व उद्देश यांची यादी करा.

वनविभागाच्यावतीने निलगिरी, आकेशीसारख्या किंमती झाडांची लागवड करण्यास सुरुवात केली. या योजनेला 'सामाजिक अरण्य' असे म्हणतात. निलगिरीची झाडे भूगर्भजलाची पातळी कमी करतात म्हणून त्यांच्या लागवडीला पर्यावरणवाद्यानी विरोध केला.

दावणगिरी जिल्ह्यातील हरिहर पॉलिफायबर कारखान्यातून टाकाऊ पदार्थ तुंगभद्रा नदीत सोडून नदीचे पाणी प्रदूषित करणाऱ्या विरुध्द आंदोलन केले. कारवारचा सी बर्ड बंदर विरोधी आंदोलन, किनारपट्टीवरील कोजेंट्रीकस नागार्जुन विद्युत प्रकल्प विरोधी आंदोलन, कब्बन पार्क बचाव, कार्गील सीड्स संस्थेविरोधी आंदोलन, औद्योगिक नगरांच्या विरोधी आंदोलन इत्यादी या इतर चळवळी होत.

सीमेपलिकडे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्यांची चर्चा झाली, ती कर्नाटकातील खाण व्यवसायाविरोधी आंदोलने होत. बळ्ळारी, तुमकूरु, चित्रदुर्ग, चिक्कमंगळूरु, उत्तर कन्नड, दावणगिरी, रामनगर इत्यादी जिल्ह्यातील खनिज (खाण) संपत्ती लूट करणाऱ्या विरोधी या चळवळीना प्रारंभ झाला.

कर्नाटक लोकायुक्त संस्थेने सार्वजनिक जनहित याचिका दाखल करून आक्रमक खाण व्यवसाय विरोधी चालविलेली सविस्तर चर्चा आणि त्याचा अहवाल उल्लेखनीय आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून पृथ्वीचे शोषण कमी झाले. आजही अनेक आंदोलने सुरु आहेत. कृत्रिम रासायनिक वापरामुळे जमिनी खराब करणाऱ्या पध्दतींना पर्याय म्हणून नैसर्गिक शेती पध्दतीचा अवलंब करावा यासाठी जाणीवपूर्वक केलेली आंदोलने क्रांतीचे रूप धारण करत आहेत. ही समाधानाची गोष्ट आहे. कर्नाटकामध्ये 'सेंद्रिय कृषी मिशन' ची स्थापना होऊन सेंद्रीय कृषीला अधिक प्रोत्साहन मिळत आहे. शेकडो शेतकरी या शेतीचा लाभ घेत आहेत. या दृष्टीने कर्नाटक राज्य भारतात प्रगतीपथावर आहे.

## 2 महिला चळवळ

महिला चळवळीने मुख्यतः स्त्रीशिक्षणाला अधिक महत्व दिले. कर्नाटकामध्ये श्रीरंगम्मा आणि रुक्मिणेम्मा यानी बी.ए. ऑनर्स ही पदवी सर्व प्रथम मिळविली. इंदिरम्मा नावाच्या महिलेने बेंगळूरुचे प्रथम महिला महापौर (मेयर) पद भूषविले होते. इतके असूनसुध्दा महिलांच्या सबलीकरणाची बाब दृष्टीआड राहिली होती. महिलांना संपत्तीमध्ये वाटा मिळत नव्हता. विविध धर्मातील महिला वेगवेगळ्या प्रकारे शोषणाला बळी पडल्या आहेत.

**कृती :** विविध क्षेत्रामध्ये उत्तम साधना केलेल्या महिलांची यादी करा.


अरुणा असफ आली

अनेक महिलांनी आपल्या कुटुंबाच्या चाकोरी बाहेर येऊन स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. देशसेवा करण्यास पुढे सरसावल्या. कमलादेवी चटोपाध्याय, सरोजिनी नायडू, अरुणा असफ अली, डॉं मुत्तूलक्ष्मी रेड्डी इत्यादी महिलांचे स्मरण आम्ही केले पाहिजे.

1975 मध्ये 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' आचरणाला सुरुवात झाली. कर्नाटक सरकारने महिला अभिवृध्दी कार्यक्रम आखले. त्यामुळे क्रमाक्रमाने महिला संघटना सक्रीय झाल्या. डाव्या पक्षातील संघटनांनी कामगार महिलांना संघटित करण्याचे कार्य केले. महिला संघटनांनी हुंडा (वरदक्षिणा), अत्याचार, कौटुंबिक हिंसा यांना विरोध केला. त्याचप्रमाणे महिलांच्या हक्कांच्या प्रतिपादनाचा कायदेशीर मार्ग बळकट करण्यासाठी दबाव आणला. निवडणुकामध्ये महिलांना शे.33% जागा आरक्षण देऊन प्रशासनामध्ये त्याचे पात्र निर्णायक राहण्यासाठी या संघटना आंदोलन करत आहेत.

सरकारने अनेक सुधारणा अंमलात आणल्या आहेत. हे या चळवळींचे फळ म्हणायला हरकत नाही. स्थानिक संस्थांमध्ये शे. 50% जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचे आदेश दिलेले कर्नाटक हे पहिले राज्य आहे. सरकारी सेवा मध्ये नियुक्ती

वेळी महिलांना शे. 33% राखीवता देऊन थोडया प्रमाणात न्याय मिळवून दिला आहे. महिला आणि मुलींच्या हितरक्षणासाठी सरकारने महिला आयोग स्थापन केला आहे. हा आयोग स्त्रियांच्या शोषणाविरुध्द आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतो.

## 3 शेतकरी चळवळ

शेतकऱ्याला आपल्या देशाच्या पाठीचा कणा असे म्हणतात खरे परंतु हा पाठीचा कणा घट्ट राहण्यासाठी त्याला लागणाऱ्या आवश्यकता पुरविल्या नाहीत. आज सुध्दा आमचे शेतकरी सरकारी मदतीशिवाय जगण्याच्या स्थितीत नाहीत. कारखानदारानी तयार केलेल्या मालाची किंमत ते स्वतः ठरवितात. परंतु शेतकरी अजूनही आपण केलेल्या उत्पादनाची किंमत तो ठरवू शकत नाही. ते नेहमी पावसाच्या कृपा किंवा अवकृपेला सामोरे जात असतात. आमचे रक्षण करणारे सरकार आमच्या संकट काळी मदतीला येत नाही. अशा वेळी शेतकरी आंदोलनाचा मार्ग स्वीकारतात. अनेक शेतकरी या आंदोलनात हुतात्मा झाले आहेत. शेकडो वर्षापासून शेतकरी आंदोलने करत असले तरीही त्यांच्या सुखी-समाधानी जीवनाचे स्वप्न अजून दूर आहे.

शेतकऱ्यांची आंदोलने प्रामुख्याने जमीनदार (जमीनीचे मालक) यांच्या विरोधात झाली. स्वातंत्र्योत्तर कर्नाटकात आम्ही पाहिलेले पहिले शेतकरी आंदोलन हे 1951 मध्ये शिवमोग्गा जिल्ह्यातील 'कागोंडी' येथे झाले. खंडणी वसूल करणाऱ्या सावकाराविरोधी आंदोलन केले. पुढील काळात कर्जाची वसुली, कामासाठी दिली जाणारी चिरीमिरी इत्यादी शेतकऱ्यांच्या प्रमुख शोषणा संबंधित विषया विरुध्द आंदोलने केली. समाजवादी पक्षाचे शांतदेवी गोपाल गौडर यांनी या आंदोलनांसाठी पुढाकार घेतला. डॉ. राममनोहर लोहिया यानी आंदोलनाला भेट देऊन आपला पाठींबा व्यक्त केला.

**कृती :** ना. डिसोजा यांची 'कोळग' कादंबरी वाचून शेतकऱ्यांची स्थिती गती या संबंधी निबंध लिहा.

1950 च्या दशकामध्ये उत्तर कन्नड जिल्ह्यात समाजवादीनी शेतकरी आंदोलन केले. 1972 मध्ये कोलार मध्ये भू-आक्रमण चळवळ झाली. 1980 मध्ये मलप्रभा नदी प्रदेशातील शेतकऱ्यानी कापसाच्या पिकासाठी आंदोलन केले. काहीजण पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडले. शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात असहकार चळवळ पुढे सुरु ठेवली. या संघर्षात नवलगुंद, नरगुंद आणि सौंदत्ती येथील सुमारे वीसपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आपली स्वतंत्र एक संघटना तयार केली. कर्नाटक राज्य रयत संघाची शिवमोग्गा जिल्ह्यात सुरुवात झाली. तेथील स्थानिक समस्या वाढत चालल्या होत्या. त्या हाती घेऊन निवारण्याचा प्रयत्न केला. येथील शेतकऱ्यांवर दूरगामी परिणाम करू पाहणाऱ्या विदेशी कंपन्यांच्या आगमनाला त्यांनी विरोध केला. कर्नाटक प्रांत रयत संघ, किसान सभा, दलित संघर्ष समिती, शेतकरी मजदूर कामगार संघ इत्यादी संघटनांनी शेतकऱ्यांच्या समस्येवरील आंदोलनात आवाज उठविला.

**कृती :** 'भागूरु नविले' चळवळी सबंधी अधिक माहिती संग्रह करा.



एम्.डी. नंजुंडस्वमी

शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये एम.डी. नंजुंडस्वामी, सुंदरेश, पुट्टणय्या कडीदाळू शामण्णा इत्यादींनी प्रमुख भूमिका बजावली.

## 4 दलित चळवळ

प्रसिध्द मनःशास्त्रज्ञ आर.डी लियाँग यानी अद्भूत मत व्यक्त केले आहे 'इतरांचे अनुभव तुम्ही समजून घेणे शक्य आहे. परंतु ते अनुभव तुम्ही अनुभवने शक्य नाही. दलित आणि महिलांच्या संदर्भात त्याचे हे मत तंतोतंत लागू पडते. वर्णव्यवस्थेत दलितांना स्थान नव्हते. ते शूद्रात शूद्र झाले होते. सामाजिक दृष्ट्या कोणतेच स्थान नसलेल्या अस्पृश्य जातीमध्ये जन्म

झाला. फक्त या एकाच कारणामुळे हा समुदाय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून बाहेर राहिला. या विरुध्द चाललेली अनेक आंदोलने आपण आतापर्यंत पाहिली आहेत. परंतु वसाहतवादाच्या काळात दलितांसंबंधिचे विषय राष्ट्रीय पातळीवरील संवादाचे विषय बनले. 1930 च्या दशकामध्ये महात्मा गांधी व आंबेडकर यांच्या मध्ये झालेल्या चर्चा याला साक्षी आहेत. दोघांचेही ध्येय एकच असले तरी त्या दोघांचे मार्ग वेगळे होते.

स्वामी विवेकानंदानी मैसूरू भेटी नंतर त्यावेळच्या मैसूरूचा महाराजा दहावा चामराज वडेयर यांनी दलीत वर्गाच्या प्रमुख समस्यांची गंभीरता लक्षात घेऊन दलितांसाठी वेगळ्या स्वतंत्र शाळा सुरु केल्या.

1936 मध्ये दक्षिण भारतातील प्रमुख दलित नेता एम्.सी. राजा यांच्या उपस्थितीत मैसूरु राजवाडयात दलितांचा प्रवेश झाला.

पूर्वी दलितांच्यासाठी दलितेतर व्यक्तिंनी आंदोलने केली. आता दलित लोकच आपल्या समस्या आपणच मांडत आहेत. यांच्या मागे आंबेडकरांच्या सैध्दांतिक तत्वांची स्फूर्ती आहे. शिक्षण, संघटना आणि आंदोलने ही दलित चळवळीची बीजमंत्रे झाली आहेत. दलितांच्या समस्या निवारण्यासाठी राजकीय साधना हे आपले ध्येय असे समजून त्यांनी संघटनात्मक जागृती करण्यात गुंतले आहेत.

दलित वर्गाध्ये आंबेडकर हा त्यांचा स्वाभिमानाचा संकेत असून तोच ‘दलितांचा सूर्य’ या किर्तीला पात्र ठरला आहे. या सर्व विकासाच्या प्रतिध्वनीचे पडसाद कर्नाटकामध्ये उमटले आहेत.

20व्या शतकात स्थापन होऊन वाढलेल्या ब्राह्मणेतर चळवळींनी दलितांना सामावून घेतले नव्हते. याचा जाब विचारत 1970 च्या दशकामध्ये ‘दलित चळवळीने’ आकार धारण केला आणि एक निर्णायक शक्तीत त्याचे रूपांतर झाले. हैद्राबाद कर्नाटक प्रदेशात बी. शामसुंदर यांनी 1970 मध्ये भीम सेना संघटनेची स्थापना केली. बसवलिंगप्पा भूसा प्रकरणाने (1973) दलित चळचळीला एक नवीन वळण दिले.

मंत्री बसवलिंगप्पा यानी मैसूरुच्या कार्यक्रमामध्ये कन्नड साहित्य टाकाऊ आहे असा अभिप्राय व्यक्त केला. याच्या विरोधात संपूर्ण कर्नाटकात आंदोलन झाले. शेवटी बसवलिंगप्पाने मंत्रीपदाचा राजीनामा दिला. या मुळे दलितामध्ये तीव्र जागृती निर्माण झाली.

त्यानंतर 1976 ला भद्रावतीमध्ये ‘दलित लेखक कलाकार संघाची स्थापना झाली. कर्नाटकातील दलित चळवळीची दमदार वाटचाल सुरुवातीला या संघटनेत पाहावयास मिळते. पुढे यांच्या आश्रयाखाली दलित संघर्ष समितीची स्थापना झाली. पो.बी. कृष्णप्पा हे या समितीचे राज्य संचालक होते. अशा प्रकारे डी.एस.एस. ने एक संस्थेचे रूप धारण केले.

टप्प्याटप्प्याने दलित संघर्ष समितीने आपली व्याप्ती वाढविली. नोकरदार, महिला कामगार, प्रजा, विद्यार्थी आणि लेखक तसेच कलाकार हे संघ या समितीच्या शाखांची सुरुवात झाली. सुरवातीला जमीन नसलेल्या दलितांनी जमीन प्राप्त करण्यासाठी आंदोलनाची सुरुवात केली. शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी अधिकारी पदांवर प्रवेश मिळविणे हा दलित चळवळीचा आणखी एक महत्वाचा कार्यक्रम होता. कालांतराने दलित संघर्ष चळवळीत मतभेद दिसायला लागले. त्यामुळे वेगवेगळ्या नावाने वेगवेगळ्या संघांची स्थापना झाली.

**कृती:** देवनूर महादेव आणि सिध्दलिंगय्या यांच्या कृतीची अधिक माहिती संग्रह करा.

देवनूर महादेव आणि सिध्दलिंगय्या या साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून दलितांचे अंतरंग इतर लोकांच्या समोर उघडले आहेत. इतर दलित लेखकांनी या समाजातील सर्व समस्याची जाणीव करून देत आहेत या घडामोडीमध्ये दलित साहित्यिकांचे पात्र निर्णायक ठरेल इतके सामर्थ्य ते दाखवत आहेत. परंतु पुढील वाटचाल अजून भरपूर आहे.

## 5 कन्नड वाचवा चळवळ अथवा कन्नड रक्षण चळवळ

एकीकरण चळवळीमुळे कन्नडीगांध्ये आत्मविश्वास आणि अभिमान निर्माण झाला. साहित्य सृष्टीच्या रूपाने कन्नड लेखकांनी लोकांचे कानडीपण जीवंत ठेवले. या संदर्भात सांस्कृतिक तसेच कन्नडवादी संघटनांची भुमिका मोठी आहे.

1960 च्या दशकानंतर बेंगळूरु मध्ये इतर भाषांचा वापर अधिक झाला. त्यावेळी अ. न. कृ, चिदानंदमूर्ती, म. न राममूर्ती, वाटाळ नागराज आणि असे अनेक लोक तसेच कर्नाटक युवजन सभा, कन्नड जागृती परिषद, कन्नड शक्तीकेंद्र इत्यादी संघटनानी कन्नड, कन्नडीग आणि कर्नाटकाचे श्रेष्ठत्व साधण्यामध्ये सफल झाले. या व्यतिरिक्त इतर अनेक कन्नड संघटना आज कन्नड भाषा, जमीन, पाणी आणि भाषा संरक्षणा संदर्भात अधिक क्रियाशील बनल्या आहेत.

## 6 गोकाक चळवळ

1980 च्या दशकाचा कालावधी म्हणजे कन्नड भाषेच्या अस्तीत्वासाठी चाललेल्या आंदोलनाचा काळ होय. 1982 मध्ये गोकाक यांच्या अहवालाच्या अंलबजावणीसाठी एक निर्णायक चारित्रिक आंदोलनाला सुरुवात झाली. सर्व कन्नड समाजाने अभूतपूर्व रितीने आंदोलन केले. कर्नाटकातील भाषिक अल्पसंख्याकांनी कन्नड सक्तीने शिकण्यास नाकारले. आपल्या मातृभाषेतूनच शिक्षण घेणार असा हट्ट धरला. त्यावेळचे राज्याचे मुख्यमंत्री आर. गुंडूराव हे उडूपीला गेले असताना तेथील मठाधिशांनी संस्कृतला अधिक महत्व द्यावे यासाठी आग्रह धरला. याचा परिणाम म्हणून शिक्षण हे कोणत्या भाषेध्ये असावे असा प्रश्न सोडून शिक्षणात भाषांचे स्थान कसे असावे याचा निर्णय घेण्यासाठी एक समिती रचना करण्यात आली. डॉ. विनायक कृष्णा गोकाक यांच्या अध्यक्षतेखाली भाषा समितीची रचना झाली. या समितीने कन्नड भाषेला प्रथम स्थान आणि सक्ती करण्याची शिफारस केली. या समितीने त्रिभाषा सूत्राला 350 गुण देण्याचे ठरविले. त्रिभाषा परीक्षेध्ये कन्नडला 150 गुणांची प्रथम भाषा असावी असे समितीने आपल्या अहवालात शिफारस केली.

गोकाक समितीच्या शिफारसी तत्कालीन सरकारने मान्य केल्या नाहीत. डॉ. राजकुमार यांच्या नेतृत्वा खाली संपूर्ण कर्नाटकात मोठे आंदोलन झाले. कुवेंपु, पाटील पुट्टप्पा इत्यादी ज्येष्ठ साहित्यिकांनी या आंदोलनाला पाठींबा दिला.



6.4 विनायक कृष्ण गोकाक




6.5 डॉ. राजकुमार

गोकाक चळवळीतील प्रमुख घोषणा म्हणजे 'नाव झाले कर्नाटक, श्वास होऊदे कन्नड'', ''काही येवो कन्नड राहो'', ''गोकाक शिफारशीची अमलबजावणी झालीच पाहिजे', 'कर्नाटकात कन्नड श्वास भरू दे ' इत्यादी.

**कृती :** गोकाक समितीच्या अहवालातील शिफारशी संदर्भात अधिक माहिती संग्रह करा.

## 7 पंचायत राज्य व्यवस्था

पंचायत राज्य व्यवस्था म्हणजे शासनाच्या प्रशासकीय व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण होय. स्थानिक लोकांनी सरकारी व्यवस्थेत सहभागी होऊन निर्णय घेण्याचा अधिकार प्रदान करणे हाच या व्यवस्थेचा मुख्य उद्देश आहे. भारताला स्थानिक स्वयंव्यवस्थापक व्यवस्थेचा परिचय आहे. परंतु स्वातंत्र्यानंतर त्याला संविधानात्मक रूप देण्याचे कार्य सुरु झाले. केंद्र सरकारने 1955 मध्ये बळवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची रचना केली. या समितीने तीन पातळीवर स्थानिक व्यवस्थापक, व्यवस्थेची शिफारस केली होती.

या व्यवस्थेच्या विकासाची पार्श्वभूमी तत्कालीन राज्य सरकारने प्रजासत्तात्मक विकेंद्रीकरणाच्या आशयानुसार 1959 मध्ये मैसूरु ग्राम पंचायतीसाठी अधिनियम जारी केले. त्यानुसार कर्नाटकामध्ये प्रजासत्तात्मक संस्थांचा पाया घातला गेला. नवीन कायद्याप्रमाणे कारभाराची व्यवस्था तीन टप्प्यात केली गेली.

ती पुढील प्रमाणे

- ग्राम पंचायत
- तालुका पंचायत
- जिल्हा पंचायत

कर्नाटकात 1983 मध्ये अस्तित्वात आलेल्या जनता सरकारने पंचायत राज्य व्यवस्थेत क्रांतिकारक बदल केले. याचे श्रेय तत्कालीन पंचायत राज्य खात्याचे मंत्री श्री नजीर साब याना जाते. दलित, मागासवर्ग आणि महिला यांना स्वयं व्यवस्थापनात सहभागी होण्यासाठी अधिकाधिक संधी पंचायत राज्य व्यवस्थेने उपलब्ध करून दिल्या.


नजीर साब

**कृती :** तुमच्या गावाच्या ग्राम पंचायतीची रचना आणि कार्यव्याप्ती बद्दल माहिती संग्रह करा.

## अभ्यास

### I एका वाक्यात उत्तरे लिहा.

1 ‘तुंगा बचाव’ आंदोलन का सुरू झाले?

2 ‘चिपको अथवा अप्पीको चळवळ’ म्हणजे काय?

3 ‘सामाजिक अरण्य’ म्हणजे काय?

4 कर्नाटकाची पहिली बी.ए ऑनर्स महिला पदवीधर कोण?

## II दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1 प्राचीन तलावाना आम्ही का वाचविले पाहिजेत?

2 प्रमुख परिसर चळवळींची नावे लिहा.

3 दलित चळवळींची सुरुवात का झाली ?

4 दलित चळवळीचे बिज मंत्र कोणते ?

5 पंचायत राज्य व्यवस्था का महत्वाची आहे?

## III चर्चा करा.

1 तुमच्या प्रदेशात पंचायत राज्य व्यवस्थेमुळे झालेला सामाजिक आर्थिक बदल

2 दलित चळवळीची साधना.

## कृती

1. शाळेमध्ये ग्राम पंचायतीच्या मॉडेल सभेचे आयोजन करा (शिक्षकांची मदत घ्या.)

☆ ☆ ☆

| पाठ 7 | कर्नाटक-आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठामध्ये कर्नाटकातील स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या सामाजिक आणि आर्थिक अभिवृध्दीच्या मूळ अंशाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

काही सामाजिक वर्गांनी अभिवृध्दीतील अधिकाधिक वाटा मिळविला आहे. इतर वर्ग वेगवेगळ्या कारणामुळे विकासापासून दूर राहिले आहेत. यामुळे सामाजिक असमतोल आहे. तो दूर करण्यासाठी संविधानात्मक आशयांच्या चौकटीत राहून सरकार भूसुधारणा, मागास वर्गीयांच्या आयोगाची नेणूक इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

## सामर्थ्ये

1 स्वातंत्र्यानंतर कर्नाटकामध्ये झालेली सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील साधना समजून घेणे.

2 भूसुधारणा कायद्याचे उद्देश तसेच परिणाम समजून घेणे.

3 मागास वर्गीयांच्या आयोगाने केलेल्या कार्याची प्रशंसा करणे.

## 1 भूसुधारणा

जमिनीच्या वाटणीत असणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी अंमलात आणलेल्या उपायांनाच भूसुधारणा असे म्हणतात. जमीन ही माणसाच्या जीवनाचा अविभाज्य अंग आहे. आपल्या जीवनाला आकार देण्यासाठी जीवन जगण्यासाठी जमिनीवर अवलंबून आहे. परंतु जमिनीचे वाटप समाजातील सर्व घटकांना समान झालेले नाही. या जमिनीच्या मालकी हक्कातील असमानता दूर करण्यासाठी भूसुधारणा हाती घेण्यात आली आहे.

पूर्वी जमिनीवर जमीनदारांचा हक्क होता. पण प्रत्यक्षात जमीनी जे कसत त्यांचे हक्क नव्हते. त्यामुळे संपतीचे एकत्रीकरण आणि वाटणी यामध्ये मोठा असमतोल निर्माण झाला. भूसुधारणा कायद्यान्वये समान विभागणी करण्याचा प्रयत्न 1970 या दशकामध्ये केला गेला. शेतकरी आणि दलित चळवळींच्या परिणामाने जमिनीच्या वाटणीचा प्रश्न उद्भवला. भूहीन कनिष्ट समाजातील लोकांना जमीन देण्यासाठी अनेक आंदोलने झाली. याच्या परिणामाने भूसुधारणेधील प्रमुख अंश असे आहेत.

## 1. जमीनदारी पध्दतीचे निर्मूलन

जमिनीवरील हक्क कमी करणे हा याचा उद्देश आहे. हाच भूसुधारणेमध्ये प्रमुख उद्देश झाला पाहिजे. 1955 मध्ये भारताचे माजी उपराष्ट्रपती बी.डी. जत्ती यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन झाली होती. त्या समितीने भूसुधारणा हाती घेण्याच्या पार्श्वभूमीवर काही शिफारशी केल्या होत्या. या समितीने प्रत्येक कुटुंबासाठी जास्तीत जास्त म्हणजे 116 एकर गायरान, 27 एकर बागायत जमीन असली पाहिजे. अशी शिफारस केली होती. ही शिफारस जमीनदारांना पोषक होती. ही शिफारस 1957 मध्ये अंमलात आलेली असली तरी पूर्वी असलेली व्यवस्था बदलणे त्याना साध्य झाले नाही. 1974 च्या भू सुधारणा कायद्याने ही पध्दत घालविण्यासाठी शक्य झाले.

एक एकर म्हणजे 100 सेंट्स किंवा 40 गुंठे

## 2. महसूल पध्दतील सुधारणा

भारतातील महसूलदाराना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्या म्हणजे अधिक प्रमाणातील महसूल, जमिनीच्या मालकी हक्कांची असुरक्षितता आणि मालक नसलेले भूहीन मजूर या समस्या घालविण्यासाठी 1974 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री डी. देवराज अरस यानी 'कसेल त्याची जमीन' असा क्रांतिकारक कायदा कर्नाटकात अंमलात आणला. अनेक वर्षापासून महसूल करणारे अनेक भूहीन लोक जमिनीचे मालक बनले.

1974 च्या भूसुधारणा कायदा दुरुस्तीतील प्रमुख अंश

1 या कायद्यान्वये सर्व प्रकारचा महसूल रद्द करण्यात आला.

2 आपण कसत असलेल्या शेतीचा मालकी हक्क स्थापन करण्याची संधी देण्यात झाली.

3 महसूलीसाठी उपलब्ध सर्व जमीन सरकारच्या स्वाधीन करण्यात आली. संबंधित जमिनीवर मालकी हक्क घेऊ इच्छिणाऱ्यांना आणि त्यावर अवलंबून असलेल्यानी ट्रिब्यूनल मार्फत अर्ज करावयाचा होता.

4 ट्रिब्यूनलचा निर्णय हा अंतिम निर्णय होता. त्यांना निर्णयाच्या विरुध्द उच्च न्यायालयातच दाद मागता येत होती.

### 3. शेती वाटपाची मर्यादा

1957 नंतर झालेल्या प्रमुख प्रयत्नामुळे 1970 च्या दशकात एका कुटुंबासाठी जास्तीत जास्त किती जमीन असली पाहिजे याची मर्यादा तत्कालिन सरकारने ठरविली आहे.

1974 मध्ये शेतीची अधिकाधिक मर्यादा खालील प्रमाणे ठरविण्यात आली होती. पाण्याची सोय नसलेली (खुश्की) गायरान ओसाड जमीन असल्यास त्याची मर्यादा एका कुटुंबाला 54 एकर असली पाहिजे. पाणी पुरवठण्याची सोय असून त्यामध्ये दोन किवा त्यापेक्षा अधिक पिके घेत असतील तर प्रत्येक कुटुंबासाठी 10 ते 18 एकर जमीन असावी. एक पीक बागायती जमीन असेल तर एका कुटुंबासाठी 27 एकर जमीन असावी असे ठरविण्यात आले होते. 1977 मध्ये इनाम पध्दती रद्द करण्यासंबंधी कायदा अंमलात आला.

कृती : इनाम पध्दत कायद्याविषयी अधिक माहिती मिळवा.

### 4. आर्थिक उत्पादनाची रचना

शेतकरी कोणत्या उत्पादनातूत शेतीसाठी लागणारा खर्च वजा करून आपले कुटुंब सुखी होण्यासाठी आवश्यक उत्पन्न मिळवू शकतो. अशा जीवनाधार उत्पादनांना आर्थिक उत्पादने म्हणतात. उत्पादनांचे एकीकरण आणि जास्तीत जास्त प्रमाणात मर्यादेमुळे अनेक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे.

### 5. सहकार शेतीचा विकास

शेतकऱ्यांनी स्वयंप्रेरणेने सहकार संघांची स्थापना करून आपले सर्व मालकी हक्क संघाच्या व्यवस्थापनाकडे सोपवून सर्वांनी मिळून शेती करणे. उत्पन्न हाती आल्यानंतर जमिनीच्या शास्वत विकासासाठी आवश्यक भांडवल काढून राहिलेल्या उत्पन्नाचा भाग सर्व मिळून वाटून घेणे. याला **सहकारी शेती पध्दती** म्हणतात.

भूसुधारणा कायद्यामुळे भूहीन लोकांना काही प्रमाणात जमिनीचा मालकी हक्क मिळाला. शेती कसणाऱ्याचा हक्क अबाधित ठेवला. सहकारी शेती पध्दतीमुळे

शेतकऱ्यांना काही प्रमाणात लाभ मिळणे शक्य झाले. परंतु सहकार शेती पध्दत ही अपेक्षित प्रमाणात लोकांना मान्य शेती व्यवसाय होऊ शकला नाही.

## 2. मागास वर्ग आयोग

भारताच्या सामाजिक व्यवस्थेत असमानता आढळते. श्रेणीकृत जाती व्यवस्थेमुळे अनेक जाती मागासलेल्याच आहेत. ब्रिटिशांनी भारतात आल्यानंतर नवीन सामाजिक चालीरिती सुरुवात केल्या.

ब्रिटिशांच्या कारकीर्दीत कोणत्याही जाती पातीचा विचार न करता सर्वंजण इंग्रजी शिकण्यास पात्र ठरले. इंग्लिश भाषा शिकलेल्यांना ब्रिटिश सरकारमध्ये नोकरीच्या संधी मिळू लागल्या. ब्राह्मणेतर लोकांना शिक्षण खुले झाल्या नंतर त्यांच्यासमोर नवीन जाणीवांची सुरुवात झाली. बहुसंख्यांक असुन सुध्दा आपल्या वर्गातील लोकांना सहकारी उद्योगामध्ये योग्य प्रतिनिधित्व राहिले नव्हते. याचाच परिणाम म्हणून मैसूरु संस्थानामध्ये ब्राह्मणेतर लोकांनी सावकार चेन्नय्या, एम. बसवय्या इत्यादिंच्या नेतृत्वाखाली ब्राह्मणेतर चळवळ सुरु केली.

नाल्वडी कृष्णराज वडेयर यांच्या काळात संपूर्ण भारतात सर्वप्रथम न्यायमूर्ती लेस्ले सी. मिल्लर यांच्या अध्यक्षतेखाली 1918 मध्ये मागास वर्ग आयोग नेमण्यात आला. एका जातीत शेकडा 5 किंवा त्यापेक्षा जास्त इंग्लिश जाणणारे असतील तर ती जात विकसित असा अभिप्राय व्यक्त केला. 1921 मध्ये सर्व प्रथम मागास वर्गांसाठी राखीवतेचा आदेश देण्यात आला.

मुख्यमंत्री डी. देवराज अरस यांनी 1975 मध्ये एल.जी. हावनूर यांच्या नेतृत्वाखाली प्रथम मागास वर्ग आयोगाची नेमणूक केली. मागासवर्ग ठरविण्यासाठी इ.स. 1975 मध्ये एस.एस. एल.सी. परीक्षेमध्ये विविध जातीतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण हे मागास वर्गातील जाती ठरविण्यासाठी एक निकष म्हणून मानण्यात आले. हावनूर अहवालाच्या आधारे 1977 मध्ये सरकारी आदेश जारी करण्यात आला. हा एक क्रांतिकारक आदेश ठरला. मागास वर्गातील लोकांना आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या सबल करण्यासाठी हा



एल.झी. हावनूर

आदेश अधिक कारणीभूत ठरला. याला सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. या अहवालातील कमतरतांची पूर्तता करण्याचे आश्वासन कर्नाटक सरकारने न्यायालयाला दिले. याचाच परिणाम म्हणून 1983 मध्ये टी. व्यंकटस्वामी आयोग नेमण्यात आला. राजकीय दबावामुळे व्यंकटस्वामी आयोगाच्या अहवालाला सरकारने मान्यता दिली नाही. मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांच्या कारकीर्दीत न्यायमूर्ती ओ. चिन्नप्पा रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली एक समिती रचना करण्यात आली. या अहवालाच्या शिफारसी सुध्दा राजकीय दबावामुळे अंमलात येऊ शकल्या नाहीत.

आतापर्यंत अंमलात आलेले सर्व मागास वर्गीयासबंधीचे राखीवतेचे आदेश हे राजपत्रित आदेश असून हे कोणत्याच प्रकारच्या वैज्ञानिक अहवालाच्या शिफारशी वरून दिले गेले नाहीत.

**नवीन शब्द :** महसूल – जमीन मालक आणि जमीन कसणारे याच्यातील कराराप्रमाणे एकूण उत्पन्नातील द्यावयाचा भाग.

## अभ्यास

### I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1) बी.डी. जत्ती भारताचे ............ होते.

2) .........हे 1974 मध्ये कर्नाटकाचे मुख्यमंत्री होते.

3) 1975 मध्ये नेमलेल्या प्रथम मागास वर्ग आयोगाचे अध्यक्ष ........ होते.

### II. दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) भू-सुधारणा म्हणजे काय?

2) प्रमुख भूसुधारणा कोणत्या?

3) आर्थिक उत्पादन म्हणजे काय?

4) कर्नाटक सरकारने शेतीच्या मालकी हक्काची जास्तीत जास्त मर्यादा का ठरविली?

5) सहकारी शेती पध्दत म्हणजे काय?

6) एल.जी. हावनूर आयोगाने मागासवर्गातील जाती कोणत्या निकषावर ठरविल्या?

☆ ☆ ☆

| पाठ 8 | महिला स्वातंत्र्य सेनानी |
|---|---|

## पाठाचा परिचय

आपल्या पुरुष प्रधान समाजाने स्त्रियाना कुटुंबाच्या चौकटीमध्ये मर्यादित ठेवले आहे. वारंवार सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश करून महत्वाची भूमिका निभावलेल्या महिला कमी पहायला मिळतात. उदा. राणी अब्बक्कादेवी एक उत्तम राजकर्ती होती. आधुनिक काळात पश्चिम देशांच्या प्रभावाने समानता, स्वातंत्र्य आणि विश्व बंधुत्व भारतीय समाजाला भारतातील इंग्लिश शिक्षण घेतलेल्या विद्वान वर्गाने समजावून दिले. यामुळे नवीन सामाजिक बदल घडून आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यांच्या संदर्भात गांधीजीच्या नेतृत्वाखाली आतापर्यंत अनेक सामाजिक वर्गानी स्वातंत्र्य लढ्यात विशेष योगदान दिले. शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि महिलांनी अधिक क्रियाशीलपणे स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला स्वातंत्र्य चळवळीत आपला सहभाग महत्वाचा होता हे दाखवून दिले. या पार्श्वभूमीवर कर्नाटकातील महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. आपले संपूर्ण जीवन राष्ट्राच्या स्वातंत्र्य आणि प्रगतीसाठी समर्पित केले. यापैकी काहींचा अभ्यास करून महिला स्वातंत्र्य चळवळीतील चारित्रिक घटनाक्रम समजून घेऊ. राणी अब्बक्कादेवी, कमलादेवी चट्टोपाध्याय, बळ्ळारी सिद्दम्मा, उमाबाई कुंदापूर, कृष्णाबाई पणबेकर, जी.आर. भागिरथम्मा, सिद्दम्मा जोयीस आणि यशोधरम्मा दासप्पा इत्यादी प्रमुख होत. याशिवाय अनेक महिलांनी भाग घेतलेला आहे.

## सामर्थ्ये

1) स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी दिलेले योगदान जाणून घेणे.

2) गांधीपूर्व स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या महिलाबाबत जाणून घेणे.

3) स्वातंत्र्य चळवळीत मुख्य भूमिका निभावलेल्या महिलांचे स्मरण करणे.

4) स्वातंत्र्यानंतर कर्नाटकाच्या विकासासाठी महिलांचे योगदान जाणून घेणे.

**या पाठात खालील महिलांचा परिचय दिलेला आहे**

- राणी अब्बक्कादेवी.
- बळ्ळारी सिद्दम्मा
- कमलादेवी चट्टोपाध्याय
- यशोधरम्मा दासप्पा
- उमाबाई कुंदापूर

## राणी अब्बक्कदेवी


राणी अब्बक्कादेवी

गांधीपूर्व स्वातंत्र्य चळवळीत कित्तूर राणी चन्नम्मा, केळदी चन्नमांच्या पक्तीत असणारी आणखी एक महिला म्हणजे राणी अब्बक्कदेवी होय. या चौट वंशातील होत्या. त्याचे लहान काका **तिरुमलराय** यानी अब्बक्कदेवीना युद्ध कौशल्याचे प्रशिक्षण देऊन उल्लाळची राणी म्हणून अधिकारावर आणले. अब्बकांचा विवाह मंगलूरुमधील **भंग** प्रांताच्या लक्ष्मण राजाबरोबर झाला. परंतु त्यांचे वैवाहिक जीवन फार काळ चालले नाही. त्या उल्लाळला परत आल्या. पोर्तुगीजानी अब्बक्काला राज्य देण्यासाठी दबाव आणला पण त्यानी त्याला विरोध केला. याचा परिणाम म्हणजे 1555 मध्ये पोर्तुगीजानी **राणी** बरोबर युद्ध पुकारले. या युद्धात अब्बक्का विजयी झाल्या. नंतर 1568 मध्ये पोर्तुगीजांचे व्हासईराय अंटोनी योमोरह यांच्या नेतृत्वाखाली उल्लाळमध्ये प्रवेश केला. राणी तेथून निसटून 200 सैनिकांच्या सहाय्याने पोर्तुगीज सैन्यावर आक्रमण केले. जनरल पेस्केटो या युद्धात मारला गेला. पोर्तुगीज सैनिकाना बंदी बनवण्यात आले. पुढे झालेल्या आणखी एका युद्धात पोर्तुगीज ॲडमिरल **मास्कारेन्स** उल्लाळच्या सैन्याकडून मारला गेला. राणी अब्बकाने पोर्तुगीजाना मंगळूरु किल्ला सोडून जाण्यासाठी दबाब आणला. परंतु पोर्तुगीजानी पुनःपुन्हा उल्लाळच्या संपत्तीच्या लालसेपोटी युद्ध करतच राहिले. 1570 मध्ये विजापूरचा सुलतान आणि कल्लीकोटचा झामोरीयन यांच्यात मैत्रीचा करार झाला. झामोरीयन राजाचा सेनापती **कुल्पीपुकर मार्ककर** याने अब्बक्का यांच्या वतीने युद्ध केले व मंगळूरु किल्ला जिंकून घेऊन परत जात असताना पोर्तुगीजानी

ठार केले. अब्बक्का यांचे पती लक्ष्मण यांच्या सहाय्याने पोर्तुगीजानी अब्बक्कादेवीचा पराभव केला व कारागृहात पाठविले. या कारागृहातच मरण पावल्या.

राणी अब्बक्का यांच्या स्मरणार्थ मंगलूरु जवळ उल्लाळ येथे 'वीरराणी अब्बक्का उत्सव' साजरा करतात. साहसी कार्य केलेल्या महीलांना वीरराणी अब्बक्का पुरस्कार देतात. तसेच 15-1-2003 रोजी राणी अब्बक्काचे चित्र असलेले टपाल तिकिट भारत डाक विभागामार्फत जारी करण्यात आले.

## बळ्ळारी सिद्दम्मा (1903-1981)

यांचा जन्म आताच्या हावेरी जिल्हयातील दुंडसी गावातील संप्रदायस्य याच्या कुटुंबात 1903 मध्ये झाला. त्यांच्या वडीलांचे नाव **कोट्टेगे बसटप्प** होते. ते व्यापारी होते. त्याना स्वातंत्र्य चळवळीबद्धल अपार उत्साह होता. त्यांचे वडील त्या काळातील दैनंदिन व नियतकालीके घेत. त्यामधील लेख वाचून त्यांच्यात राष्ट्रीयतेची विचारधारा निर्माण झाली. स्वातंत्र्य चळवळीकार बळ्ळारी मुरुगप्पाशी विवाह झाल्यामुळे त्यानी स्वातंत्र्य चळवळीत पूर्णपणे भाग घेतला. 1930 व्या दशकात जुन्या मैसुरू संस्थानामध्ये स्वातंत्र्य चळवळ प्रखरपणे चालू होती. तेव्हा एस. निजलिंगप्पा, टी. सिद्दलिंगय्या, सरदार विरण्ण गौडा इत्यादी स्वातंत्र्य चळवळीकार अग्रभागी होते. बळ्ळारी सिद्दम्माने 1938 मध्ये भरलेल्या शिपूर काँग्रेस अधिवेशनात भाग घेतला. दिनांक 13-4-1938 रोजी ध्वजारोहन करुन एक महिना कालावधी कारागृह शिक्षा भोगली. संस्थानाच्या ध्वजारोहन कार्यक्रमात भाग घेतलेल्या प्रथम महिला अशी किर्ती मिळविली. संस्थानाच्या पत्रिकांमध्ये सिद्दम्माना स्वातंत्र्य चळवळीतील बंदीवासाची प्रशंसा केली. कारागृहातून मुक्त झाल्या नंतर सिद्दम्मा पूर्णपणे स्वातंत्र्य चळवळीत क्रियाशील राहिली. नंतर 1939 मध्ये चित्रदूर्ग अरण्य सत्याग्रहात भाग घेतला. दावणगेरे तालुक्यातील अनगोडू आणि मायकोंड अरण्य प्रदेशातील झाडांना वाचविण्याच्या चळवळीत भाग घेऊन दिनांक 29-9-1939 ते 8-9-1940 पर्यंत कारागृह शिक्षा भोगली. नंतर 1942 मध्ये **भारत छोडो** चळवळीत भाग घेतला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मैसूरु संस्थान भारतात समावेश करण्याचा निर्णय घ्यावा म्हणून 1947 साली राजवाड्यात सत्याग्रह किंवा मैसूरु चलो सत्याग्रह प्रारंभ झाला. या चळवळीत बळ्ळारी सिद्दम्माने भाग घेतला. या चळवळीनंतर मैसूरु राज्याचा भारताच्या एकसंघ राज्यात समावेश केला. यामुळे ऑक्टोबर 1947

मध्ये के.सी.रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार आस्तित्वात आले. स्वातंत्र्यानंतर दावणगेरे तालुक्यातील संसद सदस्य म्हणून सेवा बजावली. ग्रामीण गरीब महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी मातृ मंदिरे स्थापन करून त्याना नवीन प्रकाश दिला. त्यांच्या या सेवा कार्याला राज्य सरकारने ताम्रपट देऊन गौरविले. याप्रमाणे बळ्ळारी सिद्दम्माने मैसुरु स्वातंत्र्य चळवळीत सक्रियपणे भाग घेऊन महिलांचा गौरव वाढविला.

## कमलादेवी चट्टोपाध्याय (1903–1988)



कमलादेवी चट्टोपाध्याय

कमलादेवी चट्टोपाध्याय यांचा जन्म 3 एप्रिल 1903 रोजी मंगळूरु येथील श्रीमंत कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव धारेश्वर अनंतराय व आईचे नाव गिरीजाबाई होय. वडील ब्रिटिश वसाहत व्यवस्थेत उच्च अधिकारी होते. कमलादेवीचे शिक्षण कॅथॉलिक कॉन्व्हेंट व सेंट मेरी शाळेत झाले. त्यांचा वयाच्या 14 व्या वर्षी विवाह झाला. परंतु अल्पकाळातच त्या विधवा झाल्या. नोकरीत असलेल्या वडीलांची बदली मद्रासला झाली तेव्हा त्यानी पुढील शिक्षण घेतले. पुढे इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकनॉमिक्स येथून पदवी मिळवून भारतात येऊन समाज सुधारण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी कवी, साहित्यिक, रंगकलाकार हरींद्रनाथ चट्टोपाध्याय यांच्याशी परिचय झाला. नंतर त्यांच्याशी पूनर्विवाह करून कमलादेवी चट्टोपाध्याय झाल्या.

कमलादेवी या राष्ट्रीय राजकारणात ओळखल्या जाणाऱ्या कर्नाटकातील बहुमुखी प्रतिमेच्या महिला होत. त्यानी गांधीजी व सरोजीनी नायडू यांच्या प्रभावाने असहकार चळवळीत भाग घेतला. संपूर्ण कर्नाटकात प्रवास करून युवा जनतेला स्वातंत्र्य चळवळीत भाग घ्यायला प्रोत्साहित केले. 1929 मध्ये अलाहाबाद शहरात राष्ट्रध्वज धरून घोषणा देत मिरवणूकीत भाग घेऊन ब्रिटिशांचा दबाव झुगारुन दिला. लाहोर काँग्रेस अधिवेशनाच्या निर्णयाप्रमाणे गांधीजीनी 12 मार्च 1930 रोजी आपल्या 78 अनुयायीसह साबरमती आश्रमापासून मिठाच्या सत्याग्रहाला प्रारंभ केला. 5 मे ला दांडी

येथे पोहचून 6 मे ला मीठ तयार करून ब्रिटिशांचा मिठाचा कायदा भंग केला. यावेळी देशातील जनतेला  मिठाच्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आव्हान केले. कमलादेवीने गांधीजीची भेट घेऊन महिलाना मिठाच्या सत्याग्रहात भाग घेण्याची अनुमती मिळवली. कमलादेवी आणि अवंतीबाई गोखले या पहिल्या गटातील महिला म्हणून मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला.

गांधी मीठ स्वीकारा याची किंमत सहा महिने शिक्षा असे म्हणत मीठाचा व्यापार करून कैदी म्हणून यरवडा जेलमध्ये शिक्षा भोगली. शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर सुद्धा बाँबेच्या गबाकापूरमध्ये स्वदेशी वस्तू विकल्या. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसच्या सेवादलाच्या महिला गटाची जबाबदारी घेऊन देशांतर्गत प्रवास करून महिला स्वयंसेवकांची संघटना तयार केली. बाँबे व बोरीवलीमध्ये महिला स्वयंसेवक प्रशिक्षण शिबिर चालविले. सेवादळाच्या या संघटनेवर ब्रिटिशांनी बंदी घालून कमलादेवीना बंदी करून आर्थर रोड जेलमध्ये पाठविले. तेथे मीरा बेहन यांचा परिचय झाला. नंतर बेलूरु जेलमध्ये स्थलांतररित केले.

काँग्रेस पक्षात अनेक मतभिन्नता होती. समाजवादाचा प्रभाव असलेले नेहरु, राम मनोहर लोहिया, आचार्य नरेंद्रदेव इत्यादीनी काँग्रेस पक्षात **काँग्रेस सोशियालिस्ट पक्ष** स्थापन केला. कमलादेवी चट्टोपाध्यायानी 1934 मध्ये या पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले. समाजवाद तत्वांच्या प्रचारासाठी कर्नाटकात सार्वजनिक व्याख्याने देऊन लोकांच्यामध्ये जागृती निर्माण केली. यामुळे अनेक समस्याना तोंड द्यावे लागले. कमलादेवी चटोपाद्याय या केवळ स्वातंत्र्य चळवळीकार न राहता समाज सुधारक, स्त्रिवादी चिंतक, साहित्यिक आणि चलनचित्र नटी म्हणून कार्य केले. त्यानी विविध क्षेत्रात केलेल्या कार्यासाठी 1955 मध्ये पद्मभूषण, 1962 मध्ये वतमूल फौंडेशन प्रशस्ती, 1966 मध्ये रामन म्यागसे इंटरनॅशनल प्रशस्ती, शांतीभारत देसेटीकोतं प्रशस्ती, सेंट्रल अकादमी प्रशस्ती आणि 1987 मध्ये पद्मविभूषण प्रशस्ती देऊन गौरविण्यात आले. अशी बहुमुखी प्रतिभा असलेल्या कमलादेवी चटोपाद्याय या कर्नाटकाला गौरवाचा विषय आहेत. या 1988 मध्ये मरण पावल्या.

## यशोधरम्मा दासप्पा (1905–1980)

यशोधरम्मा यांचा जन्म 28-05-1905 रोजी बेंगळूरुमध्ये झाला. त्यांच्या वडीलांचे नाव रामय्या व आईचे नाव रेवम्मा होते. वडील सुधारणावादी होते. बेंगळूरुमध्ये प्रारंभिक शिक्षण संपवून नंतर मद्रास येथील क्वीन्स मेरी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व तेथून इंटर मेडीएट शिक्षण संपविले. बेंगळूरुला परत आल्यावर राव साहेब चेन्नय्यन यांचा तिसरा मुलगा दासप्पनबरोबर 1926 मध्ये विवाह केला. दासप्पा आणि यशोधरम्मा दासप्पा हे दोघेही समाजसेवक होते. गांधीजीच्या प्रभावामुळे राष्ट्रीय काँग्रेसचे सक्रीय कार्यकर्ते बनले. काही काळ वार्दसेवाग्राममध्ये सेवा करून परत आले. मैसूरु संस्थानाच्या स्वातंत्र्य चळवळीत निरंतर भाग घेऊन स्वातंत्र्यानंतर मैसुरुच्या एकीकरणाचे साक्षीदार बनले.

मैसुरु न्यायविधेयक सभेसाठी झालेल्या निवडणूकीत आपले पती एच.सी. दासप्पानी प्रजा संयुक्त पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहिले तरी यशोधरम्मा काँग्रेसच्या सदस्या म्हणून राहिल्या. समाज सेविका म्हणून कार्य करणाज्या यशोधरम्मा यानी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन 1938 मध्ये शिवपूरच्या ध्वज सत्याग्रहात भाग घेतला. 1942 च्या भारत छोडो आंदोलनात यशोधरम्मा दासप्पा याचे घर स्वातंत्र्य चळवळीला पुरक भूमीगत चळवळीचे केंद्र बनले होते. चळवळीसाठी लेखन करून **ज्वाला** या पत्रिकेमधून प्रसारित केले.

मैसुरु संस्थानातील प्रजा सरकार स्थापनेसाठी 1947 मध्ये मैसुरु चलो चळवळीत यशोधरम्मा दासप्पा यानी लोकांच्या संघटनेसाठी कार्य केले. मैसुरु राजवाड्या समोर हरताळ, संप घडवून आणला. या चळवळीच्या तिव्रतेनंतर महाराजांचे अधिकार लोकांकडे हस्तांतरित केले गेले. स्वातंत्र्य संस्थानात लोकप्रतिनीधी व लोकसभा सदस्य म्हणून तसेच एस. निजलिंगप्पा मंत्रीमंडळात समाज कल्याण मंत्री म्हणून उत्कृष्ठ कार्य केले. अशा बहुमुखी प्रतिभा लाभलेल्या यशोधरम्मा दासप्पा यांचा कॅन्सरमुळे 1980 साली अंत झाला.

## उमाबाई कुंदापूर (1892-1992)



उमाबाई कुंदापूर

उमाबाई कुंदापूर यांचा जन्म कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्हयातील कुंदापूर येथे 1892 साली झाला. त्यांच्या वडीलांचे नाव गोलीकेरे कृष्णराय व आईचे नाव तुंगाबाई होते. वयाच्या 13 व्या वर्षी स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवर असलेल्या संजीव राव याच्याशी विवाह झाला. पतीच्या प्रोत्साहनामुळे 1921 नंतर स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. खादीधारक बनून काँग्रेस चळवळीत प्रचार कार्य हाती घेतले. 1923 मध्ये पतीचे निधन झाल्यानंतर हुब्बळ्ळी येथे राहिल्या.

लोकमान्य टिळक, गांधीजी आणि हर्डिकर यांच्या राष्ट्रीयतेच्या आंदोलनामुळे प्रभावित होऊन मराठी भाषेत **स्वदेशी व्रत** हे नाटक लिहून स्वदेशी तत्वाचे महत्व पटवून दिले. मुंबईमध्ये सारस्वत साहित्यिक समाज आणि भगिनी मंडळ तसेच टिळक शाळेची जबाबदारी सांभाळली. यानी स्त्रीयांमध्ये स्वदेशी, खादीचा प्रचार, राष्ट्रीय शिक्षणाबद्धल जागृती केली. टिळकांच्या काळात स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला तसेच गांधीजींच्या नेतृत्वाखालील चळवळीत भाग घेतला. 1923 मध्ये एन.एस. हर्डीकर यानी स्थापन केलेल्या सेवादलाच्या महिला गटाचे नेतृत्व स्वीकारले. 1924 साली झालेल्या बेळगावी काँग्रेस अधिवेशनात महत्वाची भूमिका निभावली. मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. यासाठी चार महिने हिंडलगा व यरवडा जेलमध्ये कारावास भोगला. जेलमधून सुटका झाल्यानंतर अंकोला, शिरसी, सिद्दापूर इत्यादी ठिकाणी सत्याग्रहात भाग घेऊन शिक्षा भोगली. उमाबाई कुंदापूर यानी अनेक निराश्रीत महिलाना आश्रय दिला. अनारोग्याच्या कारणामुळे 1942 मध्ये भारत छोडो आंदोलनात प्रत्यक्ष भाग न घेता भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांना आश्रय देऊन पाठींबा दर्शविला. गांधीजीच्या सल्ल्यानुसार कस्तुरबा निधीची जबाबदारी निभावली व समाज सुधारण्याच्या कार्यात अग्रेसर राहिल्या. अशा निस्वार्थी व्यक्ती असलेल्या भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केलेल्या उमाबाई कुंदापूर या 1992 मध्ये मरण पावल्या.

## अभ्यास

### I. खालील वाक्यातील रिकाम्या जागा भरा.

1) राणी अब्बकाच्या स्मरणार्थ उल्लाळमध्ये .............. साजरा करतात.

2) बळ्ळारी सिद्दम्मांचा जन्म .................... साली झाला.

3) 1938 मध्ये यशोधरम्मानी ................. मध्ये भाग घेतला.

4) यशोधरम्मा यानी ................ मंत्रीपद भुषविले.

5) स्वदेशी व्रत नाटक ............... यानी लिहिले.

### II. गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. उल्लाळच्या रक्षणासाठी पोर्तुगीजाविरुद्ध राणी अब्बक्कादेवी यानी केलेला संघर्ष विवरण करा.

2) बहुमुखी प्रतिभा असलेल्या कमलादेवी चटोपाद्याय या कर्नाटक गौरव आहेत याचे स्पष्टीकरण करा.

3) स्वातंत्र्य चळवळीत उमादेवी कुंदापूर यानी दिलेले योगदान वर्णन करा.

### III. उपक्रम

1) स्वातंत्र्य चळवळीत प्रमुख भूमिका निभावलेल्या स्त्रियांची जीवन चरित्रे वाचा.

2) स्वातंत्र्यानंतर कर्नाटकाच्या अभिवृद्धीत महिलांची भूमिका याबाबत भाषण स्पर्धा आयोजित करा.

☆ ☆ ☆

| पाठ 9 | # कर्नाटकाचे एकीकरण आणि सीमा वाद |
|---|---|

## पाठाचा परिचय

कर्नाटक प्रदेशाला सुमारे दोन हजार वर्षाचा इतिहास आहे. कन्नड लोकांनी वेगवेगळ्या राजकीय व्यवस्थेत जीवन घालविले आहे. विजयनगरच्या साम्राज्याचे पतन झाल्यानंतर कन्नड भाषिकांच्या प्रदेशावर मराठा पेशव्यानी, बंडखोरानी, इंग्रजानी, सुलतान आणि नवाबांनी अशा सुमारे 20 पेक्षा जास्त राजवटीनी राज्यकारभार केला. कन्नड लोकांनी कन्नड भूमीत राहून परकीयतेची भावना अनुभवली. या पाठात कर्नाटक एकीकरण चळवळीचे टप्पे दाखवून दिले आहेत. एकीकरणात सीमावाद निर्माण झाले याचीसुद्धा ओळख यापाठाद्वारे होईल

## सामर्थ्ये

1) कर्नाटक एकीकरणाची पार्श्वभूमी आणि चळवळीतील प्रमुख भागांची माहिती समजून घेणे.

2) एकीकरण चळवळीत भाग घेतलेल्या नेत्याबध्दल समजून घेणे.

3) 1956 नंतर उदभवलेल्या सीमा वादांची माहिती करून घेऊन त्यावर परिहारात्मक सूचना देणे.

## 1 एकीकरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**कविराजमार्ग** साहित्य कृतीत कन्नड प्रदेश कावेरीपासून गोदावरी नदीपर्यंत होता असे वर्णन आहे. अनेक कन्नड राजवंशानी या प्रदेशावर राज्य केले होते. परंतु विजयनगर साम्राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर कन्नड प्रदेशात राजकीय स्थित्यंतरे घडली. राजकीय वर्चस्व साधण्यासाठी अनेकानी कन्नड लोकांना त्रास दिला. टिपूच्या मृत्यूनंतर ब्रिटिशांनी कन्नड भाषेचा प्रदेश वेगवेगळ्या भाषिकांच्या, राजकर्त्यांच्या स्वाधीन केला. कन्नडीगानी मराठे, निजाम इत्यादिकांच्या अधिन राहून परकीय भावनेने अनिवार्य म्हणून जीवन कंठले.

अशा प्रतिकूल प्रसंगातून बाहरे पडण्यासाठी कन्नडीगानी एक राज्य बनवून एकाच राज्य कारभाराखाली येण्याकरिता आंदोलने केली. यालाच एकीकरण चळवळ म्हणतात.

एकीकरणाचा आराखडा प्रारंभी बाँबे कर्नाटक भागातल्या लोकांनी तयार केला. रा.हा. देशपांडे यांच्या अध्यक्षतेत 1890 मध्ये प्रारंभ झालेल्या कर्नाटक विद्यावर्धक संघाने एकीकरण कल्पनेला सांस्थिक रूप दिले.

**कृती :** मुंबई कर्नाटक प्रदेशात कन्नड शाळा सुरू करण्यासाठी कार्य केलेल्या **कन्नड वाघ** डेप्यूटी चेन्नबसप्पनवर याबाबत माहिती संग्रहित करा.

कन्नड साहित्य परिषद बेंगळूरुमध्ये 1915 साली स्थापना करण्यात आली. यामुळे कन्नड भाषा आणि साहित्याच्या सर्वतोमुखी वृध्दी आणि कर्नाटक एकीकरणाला प्रोत्साहन इत्यादी उद्देश होते. कर्नाटक एकीकरण सभा धारवाडमध्ये 1916 साली सुरू करण्यात आली. या संघटनानी कर्नाटक एकीकरण चळवळ वाढविली.

1924 मध्ये चाललेल्या बेळगावीच्या काँग्रेस अधिवेशनात हुइलगोळ नारायणराव यानी 'उदयवागली नम्म चेलुव कन्नडनाडू' हे स्वागतगीत गाऊन एकीकरण चळवळीला धार मिळवून दिली. काँग्रेस संमेलनाचे अध्यक्ष असलेले गांधीजी यानी सुद्धा एकीकरणाला आपला पाठींबा दिला. एकीकरण चळवळीने स्वातंत्र्य चळवळीला चांगली साथ दिली.

**कृती:** एकीकरणाला साथ देऊन कार्य केलेल्या साहीत्यिकांची नावे जमवा व यादी करा. बी.एम.श्री यांचेबाबत अधिक माहिती संग्रह करा.

## 2. एकीकरण चळवळीमध्ये पत्रकारिता आणि साहित्याची भूमिका

विश्व कर्नाटक, नव कर्नाटक, वाग्भूषण, जय कर्नाटक, संयुक्त कर्नाटक इत्यादी दैनिकांनी व साप्ताहिकानी एकीकरण चळवळीला प्रेरणा दिली. ही दैनिके विविध भागातून प्रकाशित होतात. याबरोबरच साहित्य कृतीनी एकीकरणाला स्फूर्ती दिली.

कर्नाटकाची भाषा, संस्कृती संवर्धनासाठी अपार कष्ट घेतलेली महान व्यक्ती म्हणजे आलूर व्यंकटराय हे होत. कर्नाटकची त्या काळातली वाईट स्थिती पाहून त्यानी असे उद्‌गार काढले. छे, कर्नाटक कोठे आहे? चारही बाजूनी वाटून गेलेला कर्नाटकाचा भाग एकत्र करून अखंड करणार कोण? असा अभिमान निर्माण होईल का?

कन्नड राज्याचे भाषा वैभव कन्नडीगाना समजून देण्याचा उद्देश व्यंकटराय यांचा होता. त्यासाठी त्यानी कर्नाटकचे गतवैभव हे पुस्तक लिहिले. आणि स्वखर्चाने प्रकाशित केले. हे पुस्तक अत्यंत स्फूर्तीदायक ठरले. हैदराबादच्या कन्नडीगानी त्यांचा सन्मान (1941) करुन **कर्नाटक कुल पुरोहीत** ही पदवी अर्पण केली. मुंबई कर्नाटकमध्ये कन्नडीगांच्यात जागृती करण्याचे कार्य शांतकवी यानी केले. साहित्य संमेलनाच्या खर्चासाठी भिक्षेसाठी कन्नडभक्त आला आहे. वाढग आई, वेळ घालवू नकोस, असे म्हणत विष्णूभक्त बनून पैसा जमा केला. कुवेंपू यांचे जय हे कर्नाटक माते, पाय ठेवता तोच कर्नाटक इत्यादीनी लक्षावधी कन्नडीगांचे ह्रदय स्फूरले. हुईलगोळ नारायण यांचे उदय वागली नम्म चेलुव कन्नड नाडू या प्रादेशिक गीताने लोकप्रियता मिळविली. कन्नडचे पहिले राष्ट्रकवी मंजेश्वर गोविंद पै यानी कर्नाटकामध्ये कासरगोडचा समावेश व्हावा यासाठी अखेरपर्यंत लढा दिला. अनेक कवीनी, लेखकानी कन्नडीगांच्यात तीव्र अभिमान जागृत केला.



आलूर व्यंकटराय



हुईलगोळ नारायणराव



कुवेंपू

## 3. स्वातंत्र्योत्तर एकीकरण चळवळी

अर्ध्या शतकापेक्षा जास्त कालावधी एकीकरणाचे स्वप्न पाहात असले. तरी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीन टप्प्यात हे शक्य झाले.

### 1. पहिली पायरी (सा.श. 1947-48)

1947 पूर्वी आमच्या देशात दोन प्रकारच्या राजवटी होत्या. ब्रिटिशांचे भारतातील प्रांत आणि संस्थानिकांची 562 राज्ये होती. संविधानच्या सभेत भारताची भाषावार प्रांत रचना करण्यात आली. भारताचे चार प्रकारात राजकीय घटक करण्यात आले. ते ए.बी.सी. आणि डी घटक होत. कर्नाटकाचे वीस शासकीय घटकांचे पाच घटकात पूनर्विभाजन करण्यात आले. ते पाच घटक म्हणजे मुंबई, मद्रास, मैसूरु, हैद्राबाद आणि कोडगू हे होय. ही कर्नाटकाच्या एकीकरणासाठीची पहिली पायरी होय.

### 2. दुसरी पायरी (सा.श. 1953)

1951-52 मध्ये लोकसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यानंतर तीव्र चळवळीच्या भावनेतून 'अखंड कर्नाटक राज्य निर्माण परिषद' स्थापन झाली. त्यावेळी सुमारे 5000 लोकाना अटक करून करागृहात टाकण्यात आले. त्यानी एकत्रीकरणासाठी

सत्याग्रह केला. त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या केंगल हनुमंतय्या यानी एकीकरणास पाठिंबा दिला आणि एकीकरणासाठी राज्यभर दौरा केला. प्रचार भाषणे केली.

1952 मध्ये पोट्टी श्रीरामलू नावाच्या आंध्रप्रदेशातील नेत्याने आंध्र प्रांताच्या रचनेसाठी तीव्र उपोषण केले. 58 दिवसानंतर त्यांचे निधन झाले. आंध्रात तीव्र दंगे सुरू झाले. श्री रामलू यांच्या निधनानंतर पंतप्रधान नेहरुनी आंध्र राज्याची निर्मिती करण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे असे जाहीर केले. त्या प्रमाणे आंध्र प्रदेशाची रचना करण्यात आली. आंध्र प्रदेशाची रचना करताना बळ्ळारी जिल्हयातील सात तालुके मैसूरु प्रांतात विलिन करण्यात आले. ही एकीकरणाची दुसरी पायरी होय.

### 3. शेवटची पायरी

आंध्र प्रदेशच्या रचनेनंतर भाषावार आधार धरून भारताची पुन्हा रचना करावी ही मागणी अत्यंत तीव्रपणे पुढे आली. केंद्र सरकारने राज्यांची पूर्नरचना करण्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी 'राज्य पुनर्रचना आयोग' (एन.आर.सी.) नेमले. या आयोगाचे अध्यक्ष एस. फजल अली होते. (त्यामुळे फजल अली आयोग म्हणतात). त्यात एच.एन. कुंजू आणि के.एम.पणीकर हे इतर सदस्य होते. आयोगाने 1955 मध्ये अहवाल सादर केला. त्यानुसार भारतात भाषा आधारानुसार आणि शासकीय अनुकुलतेचा विचार करून पुनर्रचना कार्य सुरू केले. प्रदेशातील व भारतातील सर्व पक्षांनी या आयोगाला मान्यता दिली. परंतु कासरगोड केरळ राज्याला जोडला. बळ्ळारी जिल्हयातील काही तालुके आंध्र प्रदेशाला जोडले. याबाबत केलेल्या सूचनांना कन्नडीगानी एकमुखी विरोध केला.

केंद्र सरकारने राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल स्वीकारला. एकीकरण झालेले हे राज्य 1 नोव्हेंबर 1956 रोजी विशाल मैसूरु राज्य या नावाने अस्तित्वात आले. एकीकरण केलेल्या या मैसूरु राज्यात खालील जिल्हयांचा समावेश होता.

| | |
|---|---|
| 1. जुन्या प्रांतातील मैसुरु नऊ जिल्हे | मैसुरु, मंड्या, बेंगळूरु, कोलार, हासन, तुमकूरु, चिक्कमंगळूरु, शिवमोग्गा, चित्रदुर्ग. |
| 2. मुंबई प्रांतातील | बेळगावी, धारवाड, विजापूर (विजयपूर) आणि उत्तर कन्नड. |
| 3. हैद्राबाद प्रांतातील | गुलबर्गा (कलबुरगी), रायचूर आणि बिदर. |
| 4. मद्रास प्रांतातील | दक्षिण कन्नड जिल्हे, कोळ्ळेगाल (तालुका) बळ्ळारी (बळ्ळारी 1953 मध्ये आंध्र प्रदेशाची निर्मिती झाली तेव्हा समावेश केला.) |
| 5. सी. राज्य | कोडगू |

(1956 मध्ये 19 जिल्हे होते. आता एकूण 30 जिल्हे आहेत)




कर्नाटकाचे एकीकरण 1956

1956 मध्ये उदयाला आलेल्या मैसूरु राज्याचे पहिले मुख्यमंत्री एस. निजलिंगप्पा हे होते. विशाल मैसूरु राज्याचे 1 नोव्हेंबर 1973 या दिवशी त्यावेळचे मुख्यमंत्री डी. देवराज अरस यांनी 'कर्नाटक' राज्य असे नामकरण केले.



**केंगल हनुमंतय्या मुख्यमंत्री**



**एस. निजलिंगप्पा**



**डी. देवराज अरस**

## 4. सीमा वाद

राष्ट्रीय दृष्टीकोनानुसार भाषावर प्रांताची रचना अंमलात आल्यामुळे सीमा भागावरील काही प्रदेशातील कन्नडीग अन्यायाने पिडीत झाले आहेत. भाषिक बहुसंख्याक असलेले दुसऱ्या राज्यात त्यांचा समावेश झाल्यामुळे तेथील परिस्थितीनुसार ते अल्पसंख्यांक झाले आहेत. केरळमधील कासरगोड, आंध्रप्रदेशातील आलूर, अदवानी, रायदुर्ग आणि माडकशिरा तालुके, तमिळनाडू मधील होसूर आणि ताळवाडी तालुके, महाराष्ट्रातील चंदगड, सोलापूर, जत, अक्कलकोट या प्रदेशातील अधिक कन्नड बोलणाऱ्या लोकांचा कर्नाटकात समावेश करण्यास हवा होता पण ते दुसऱ्या राज्यात राहिले. याप्रमाणे आताही कर्नाटक सरकार आणि कन्नड चळवळीकार हे प्रदेश कर्नाटकात पुन्हा घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. प्रामुख्याने महाराष्ट्र, केरळ, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू बरोबर निरंतर सीमा संघर्ष चालला आहे. या संघर्षाचा पर्याय शोधण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**कृती: कन्नड अभिमान जागृत करणाऱ्या गाण्यांचा संग्रह करा.**

## 1 कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ यांच्यामधील सीमा वाद

कर्नाटक, महाराष्ट्र आणि केरळ मधील सीमावाद संपविण्यासाठी 1965 मध्ये केंद्र सरकारचे सुप्रिम कोर्टाचे निवृत्त न्यायाधीश महाजन या एक सदस्य आयोगाची रचना केली. या आयोगाने विवाद असलेल्या तिन्ही राज्यांची व्यापक समिक्षा करून महाराष्ट्रातील अक्कलकोट, जत, केरळचा कासरगोड मैसूरु राज्याला व निप्पाणी, खानापूर, हल्याळ महाराष्ट्राला जोडला पाहिजे असा केंद्र सरकारला अहवाल सादर केला. जादा प्रदेशाची अपेक्षा करणाऱ्या महाराष्ट्राला कमी प्रदेश मिळत असल्यामुळे या अहवालाचा स्वीकार केला नाही. सीमावादाची समस्या न सोडवता केंद्र सरकारने तशीच ठेवली आहे.

### अभ्यास

**I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) कर्नाटक विद्यावर्धक संघ किती साली स्थापन केला?
2) कर्नाटक कुलपुरोहीत असे कोणाला म्हणतात?
3) कर्नाटक एकीकरणाला योगदान दिलेल्या दोन संघटनांची नावे लिहा.
4) 'उदयवागली नम्म चेलूव कन्नड नाडू' हे गीत कोणी लिहिले?
5) विशाल मैसूरु राज्य केव्हा अस्तित्वात आले?
6) 'कर्नाटक' असे नामकरण कोणी व केव्हा केले?

**II गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) कर्नाटक एकीकरणाला प्रेरणा दिलेले कवी कोण? व त्यांच्या कविता कोणत्या?
2) राज्य पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष व सदस्य कोण होते?

**उपक्रम**

1) कर्नाटकाचा नकाशा काढून जिल्हा केंद्रे दाखवा.
2) एकीकृत कर्नाटकाच्या (1956) सीमा भारताच्या नकाशात दाखवा.
3) 'उदयवागली नम्म चेलूव कन्नड नाडू' आणि गोविंद पै याचे 'कन्नडीगर ताई' ही गीते समुहाने गा.

☆ ☆ ☆

| पाठ 10 | आपली संरक्षण दले |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठात आपल्या संरक्षण दलातील विभाग, त्यांचे कार्य, प्रशिक्षण केंद्र, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, केंद्र कचेरी इत्यादींचा परिचय देण्यात आला आहे. त्याचबरोबर पुरक रक्षण दले, सहायक दले आणि नागरिक रक्षण दलाबाबत या पाठात माहिती दिली आहे.

## सामर्थ्ये

1. आपल्या संरक्षण दलाबाबत समजून घेणे.
2. भूसेना, नौका दल आणि वायूसेनेबाबत जाणून घेणे.
3. संरक्षण दलांच्या सामर्थ्याविषयी जाणून घेणे.
4. पूरक संरक्षण दलाबाबत जाणून अभिमान बाळगणे.
5. सहायक सेवादलाच्या स्वयं सेवेबद्धल अभिमान बाळगणे.

## संरक्षण दले

देशाचे परकीय आक्रमणापासून रक्षण करणे हे राष्ट्राचे प्रथम कर्तव्य आहे. हे कार्य संरक्षण दलाकडे कायमस्वरूपी सोपविले आहे. त्यामुळे संरक्षण दलांची भूमिका फार महत्वाची आहे. भारतात शिस्तप्रिय, सामर्थ्यवान आणि पराक्रमी संरक्षण दले आहेत. ही अभिमानाची गोष्ट आहे. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाच्या अखंडतेच्या प्रश्नाचा आपण समर्थपणे सामना केला आहे. उदा: चीन आणि पाकिस्तान यानी केलेले आक्रमण. आपल्या संरक्षण दलानी मातृभूमीसाठी सर्वस्व पणाला लावून, त्याग करण्याची सिद्धता कारगील युद्धात प्रदर्शित केली आहे.

- भारतीय सीमारेषा 15,200 कि.मी. असून 7516.5 कि.मी. जल सीमारेषा आहे.
- देशाच्या संरक्षणासाठी आर्थिक संकल्पाचा शेकडा 40 इतका भाग राखीव ठेवला जातो.

## संरक्षण दलांची जबाबदारी

* देशांच्या सीमारेषांचे रक्षण करणे.
* देशाची एकात्मता अबाधित ठेवणे.
* दहशतवाद आणि बेकायदा कार्याला आळा घालणे.

भारताचे राष्ट्रपती हे आपल्या संरक्षण दलांचे मुख्य होत. त्याना आमच्या संरक्षणाचा सर्वोच्च अधिकार दिलेला आहे. संरक्षण व्यवस्था तीन विभागात विभागली आहे. भूसेना, नौकादल आणि वायू सेना. संरक्षण दले स्वातंत्र्योत्सवात आणि प्रजासत्ताक दिनाच्या परेड मध्ये भाग घेऊन स्वतःचे सेना सामार्थ्य प्रदर्शित करतात.

संरक्षण दलात स्वतःचे सामर्थ्य वृद्धींगत करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे आहेत. त्यापैकी काही मुख्य केंद्रे राष्ट्रीय संरक्षण कॉलेज नवी दिल्ली, संरक्षण सेवा नोकर प्रशिक्षण केंद्र उदकमंडल, भारतीय मिलीटरी अकादमी डेहराडून आणि राष्ट्रीय संरक्षण अकादमी खडकवासला, पूणे.

## भारतीय भूसेना



भूसेनेचे चिन्ह

भारताची भूसेना ही जगात दुसऱ्या क्रमांकाची मोठी भूसेना आहे. भूसेनेचे सैनिक, अश्वदल, उंटदल, तोफदल आणि रणगाड्यानी सुसज्जीत आहेत.

भूसेनेत एकूण 11,00,000 जण योद्धे आहेत. 9,60,000 राखीव सैन्य दल आहे.

भूसेनेच्या प्रमुखाला फिल्डमार्शल (जनरल) असे म्हणतात. सेनेचे नियंत्रण, प्रशिक्षण, कार्यभार आणि व्यवस्था नवी दिल्लीतील भूसेनेच्या मुख्य कचेरीतून चालवतात.

देशाच्या सीमारेषेच्या रक्षणाबरोबर नैसर्गिक आपत्ती जसे भूकंप, पूर, दुष्काळ, दरड कोसळणे इत्यादी प्रसंगी मानवीय कार्य पार पाडतात. भूसेनेत तांत्रिकदृष्ट्या सुधारित व्यवस्था आहे.



नौकादलाचे चिन्ह

## भारतीय नौकादल

किनारपट्टीच्या आणि बेटांच्या रक्षणासाठी नौकादलाची आवश्यकता आहे. भारताचे नौकादल जगात सहाव्या क्रमांकाचे मोठे नौकादल आहे. नौकादलाच्या प्रमुखाना ॲडमिरल असे म्हणतात. नौकादलाची मुख्य कचेरी नवी दिल्ली येथे आहे.

नौकादलात आधुनिक पद्धतीच्या क्षेपणास्त्रधारी जहाजे आणि पाणबुड्यांचा समावेश आहे. त्यापैकी आय.एन.एस. विभूती आणि आय.एन.एस. गोदावरी प्रमुख आहेत. आय.एन.एस. विराट आणि आय.एन.एस. विक्रमादित्य यासारखी विमानवाहू जहाजे सुसज्जीत आहेत. कर्नाटकातील कारवार येथे सी.बर्ड नावाचा नाविक तल स्थापन केला आहे.

## भारतीय वायूसेना



वायूसेनेचे चिन्ह


लढाऊ विमान

भारतीय वायूसेना जगात पाचव्या क्रमांकाची वायूसेना आहे. वायूसेनेच्या प्रमुखाला **एअरचीफ मार्शल** म्हणतात. त्यांची प्रमुख कचेरी नवी दिल्ली येथे आहे. अनुकूल कारभारासाठी वायूसेनेचे पाच विभाग केले आहेत. बेंगळूरु, हैदराबाद आणि डीडींगल मध्ये (तामिळनाडू) वायूसेनेची मुख्य प्रशिक्षण केंद्रे आहेत. वायूसेनेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अनेक नवीन युद्ध विमाने शस्त्रसज्ज ठेवली आहेत.

आपल्या वायूसेनेत जाग्वार सारख्या आधुनिक युद्ध विमानांचा समावेश आहे. यात एकूण 1,00,000 इतके सैनिक, 1330 इतकी विमाने आहेत. वायूसेनेचे सामर्थ्य हा आम्हा सर्वांचा अभिमानाचा विषय आहे.

## निमलष्करी संरक्षण दले

देशाच्या संरक्षण दलाव्यतिरिक्त काही खास कामासाठी निमलष्करी दले कार्य करतात.

### * सीमा सुरक्षा दल (Border Security Force)



सीमा सुरक्षा दल

भारताच्या सीमांचे रक्षण करणे हे सीमा सुरक्षा दलाचे मुख्य कार्य होय. कारगीलच्या युद्धात सीमा सुरक्षा दलाचे सैन्य पर्वताच्या उंचीपर्यंत जाऊन भारतीय सैन्याबरोबर लढले. **मरणापर्यंत कर्तव्य** (Duty until death) हे त्यांचे घोषवाक्य होय.

### * सीमा रस्ते संघटना (Border Roads Organisation)

सीमा भागातील रस्ते तयार करुन सैनिकाना सहाय्य करणे हे यांचे मुख्य काम होय. रस्ते निर्माण, पूल निर्माण आणि खंदक निर्माण करणे अशी कामे करतात.

## *   तट रक्षक दल (Coast Guards)

हे आणखी एक निमलष्करी दल आहे. यांचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. किनारपट्टीचे रक्षण करणे हे यांचे मुख्य कर्तव्य आहे. वादळ, चक्रीवादळ त्सुनामी यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी रक्षण कार्य हाती घेतात. घुसखोरी रोखणे, चोरुन होणारी मालाची नेआण रोखणे हे यांचे प्रमुख कार्य होय.



तटरक्षक दल

तटरक्षक दलामध्ये 84 अत्याधुनिक जहाजे आणि 45 विमाने व हेलीकॉप्टरांचा समावेश आहे. 5440 सैनिक तटरक्षक दलात आहेत.

## *   केंद्रीय औद्योगिक संरक्षण दल

हे जगातील सर्वात मोठे औद्योगिक संरक्षण दल आहे. 1,28,000 सैनिक यात आहेत. हे दल देशातील सुमारे 300 पेक्षा जास्त सरकारी, खासगी उद्योगधंदे आणि प्रयोगालयाना संरक्षण देतात. या शिवाय विमान तळ, बंदरे, रेल्वे स्टेशन, ऐतिहासिक स्मारके आणि अणू उर्जा केंद्राना संरक्षण देतात.

## सहाय्यक सैन्य

देशातील युवकामध्ये सेवा आणि देशप्रेम वाढविण्यासाठी शाळा व महाविद्यालया मध्ये अनेक कार्यक्रम हाती घेतात. त्यापैकी एन.सी.सी. एक प्रमुख होय.

## * एन.सी.सी. [National Cadet Corps]



एन.सी.सी.कॅडेट

सामुहीक जीवनातील प्रामुख्यता, नायकत्व इत्यादी गुण एन.सी.सी. शिकविते. हे प्रशिक्षण घेणाऱ्याना सैन्यात भरती होताना विशेष प्राधान्य देण्यात येते. उच्च शिक्षण घेणाऱ्याना या मध्ये राखीवता मिळते. शाळा व महाविद्यालयातील युवक व युवती एन.सी.सी. मध्ये प्रवेश घेऊ शकतात. एकूण राष्ट्र रक्षणाचे बीजारोपण हा याचा प्रमुख उद्देश होय. शिस्त व एकता यांचे ध्येय वाक्य आहे.

> 2012 ला भारतात 610 जिल्ह्यामध्ये 8770 शाळा आणि 5521 महाविद्यालयामधून एन.सी.सी. च्या तुकड्या आहेत. एकूण 13,00,000 एन.सी.सी. कॅडेट आहेत.

## * गृहरक्षक दल (Home Guards)

हे पोलीस दलाला सहाय्य करते. इतर कार्ये–आंतरिक शांतता प्रस्तापित करणे व आणिबाणीची स्थिती आणि नैसर्गिक आपती वेळी सहाय्य करणे.

## * नागरिक पोलीस दल

पोलीस दल राज्य आणि केंद्रीय पातळीवर आहेत. राज्य पोलीस दलाची व्याप्ती मर्यादीत असते. केंद्राने स्वतःचे पोलीस दल स्थापन केले आहे.

**राष्ट्रीय संरक्षण दल:** राष्ट्रीय संरक्षण दल महत्वाच्या व्यक्तीना संरक्षण देते. हे देशांतर्गत सुरक्षा व शांतता प्रस्तापीत करण्यास महत्व देते. बाँब शोधक पथक याला सहाय्य करते.

## * भारतीय रेडक्रॉस संस्था

भारतातील 700 जिल्हयामध्ये रेडक्रॉस संस्थेच्या शाखा कार्यरत आहेत. राष्ट्रपती याचे अध्यक्ष असतात. मानवता व स्वयंसेवा हे रेडक्रॉसचे मुख्य ध्येय होय.

रेड क्रॉस चिन्ह

## अभ्यास

### I. गटात चर्चा करुन उत्तरे लिही

1. संरक्षणाचा सर्वोच्च अधिकार कोणाला आहे?
2. संरक्षण दलाचे विभाग कोणकोणते?
3. भूसेना दलाच्या प्रमुखाना काय म्हणतात?
4. भूसेना दलाचे मुख्य कार्यालय कोठे आहे?

5. नौकादलाच्या प्रमुखाना काय म्हणतात?

6. एन.सी.सी. चे ध्येय वाक्य कोणते?

7. भूसेनेचे मुख्य कार्य कोणते?

8. सीमा सुरक्षा दलाचे कार्य कोणते?

9. रेडक्रॉस संघटनेचे ध्येयवाक्य कोणते?

10. संरक्षण दलात तुला सेवा करावीशी वाटते का? कारण लिही.

## II. चर्चा करा.

आम्ही संरक्षण दलात का सेवा केली पाहिजे?

## III.उपक्रम

**1. तुमच्या गावातील सैनिकाला भेटून शाळेत आमंत्रित करा.**

**2. संरक्षण दलातील विविध विभागाच्या चिन्हांचा संग्रह करा.**

**3. जवळच्या शाळा महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागास भेट द्या.**

### भूसेनेचे प्रमुख सैन्याधिकारी

जनरल, लेफ्टनंट जनरल, मेजर जनरल, ब्रिगेडीयर, कर्नल, लेफ्टनंट कर्नल, मेजर, कॅप्टन आणि लेफ्टनंट, नौसेना आणि वायू सेनेमध्येसुद्धा या प्रमाणे सेनाधिकाऱ्यांचे रँक आहेत.

☆ ☆ ☆

| पाठ 11 | संविधान दुरुस्ती |
| --- | --- |

## पाठाचा परिचय

भारतीय संविधानात दुरुस्ती करण्याच्या पद्धतीबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

## सामर्थ्ये

1. भारतीय संविधानाचे स्वरुप जाणून घेणे.
2. भारतीय संविधान दुरुस्ती करण्याची पद्धत समजून घेणे.
3. साध्या बहुमताने दुरुस्ती करण्याची पद्धत समजून घेणे.
4. विशेष बहुमताने दुरुस्ती करण्याची पद्धत समजून घेणे.
5. विशेष बहुमतासह अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांच्या संमतीने दुरुस्ती करण्याची पद्धत जाणून घेणे.

संविधानीक कायद्यांची स्थिरता हे एक आवश्यक लक्षण आहे. परंतू निरंतर चालणाऱ्या सामाजिक बदलामुळे आणि बदलत्या परिस्थितीनुसार संविधानात दुरुस्ती करणे गरजेचे असते.

## संविधानाचे स्वरुप

दुरुस्ती आधारानुसार संविधानाचे स्वरुप निर्धारित करु शकतो. दुरुस्ती पद्धत सुलभ असल्यास अशा संविधानास सरळ संविधान म्हणतात. दुरुस्ती पद्धत कठीण असल्यास अशा संविधानास कठीण संविधान अशी विभागणी करु शकतो. भारताचे संविधान सरळ व कठीण असे दोन्ही अंश अंतर्भूत असणारे आहे.

**संविधान दुरुस्ती पद्धती–** आपल्या संविधानामध्ये तीन पद्धतीनी दुरुस्ती करु शकतो. त्या म्हणजे.

1. साध्या बहुमताने दुरुस्ती पद्धत.
2. विशेष बहुमताने दुरुस्ती पद्धत.
3. विशेष बहुमतासह कमितकमी अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांच्या संमतीने दुरुस्ती करण्याची पद्धत. वर सांगितलेल्या दुरुस्ती पद्धतीचे विवरण पुढील प्रमाणे.




संविधान दुरुस्ती

## साध्या बहुमताने दुरुस्ती पद्धत

संविधानाचा काही भाग संसदेतील (लोकसभा आणि राज्य सभा ही दोन्ही सदने) सामान्य शासकीय प्रक्रियेच्या साध्या बहुमताने (संसदेतील अर्ध्यापेक्षा जास्त सदस्यांच्या संमतीने) दुरुस्ती करु शकतो. उदा: भारतीय नागरिकत्वाची पात्रता.

## विशेष बहुमताने दुरुस्ती पद्धत

संविधानाचा काही भाग संसदेतील विशेष बहुमताने दुरुस्ती करु शकतो. विशेष बहुमत म्हणजे संसदेतील सदस्यापैकी दोन तृतीयांश सदस्यानी संमती दिल्यास दुरुस्ती करु शकतो. उदा: मूलभूत हक्क, राज्य मार्गदर्शक तत्वे आणि इतर अंश.

## विशेष बहुमतासह किमान अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांच्या संमतीने दुरुस्ती करण्याची पद्धत

संसदेच्या विशेष बहुमतासह अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांची संमती घेऊन संविधानाच्या काही भागाची दुरुस्ती करु शकतो. ही पद्धत वरील दोन्ही पद्धतीपेक्षा कठीण आहे. या पद्धतीनुसार राष्ट्रपतीची निवड, केंद्र आणि राज्य सरकारमधील अधिकार वाटप आणि इतर अंश दुरुस्ती करु शकतो.

अशाप्रकारे तिन्ही पद्धतीनुसार भारताच्या संविधानात आवश्यक बदल करु शकतो. बदलणारा समाज आणि परिस्थितीनुसार योग्य बदल करण्यास संविधानात संधी उपलब्ध करुन दिली आहे.

8 सप्टेंबर 2016 पर्यंत आपल्या संविधानात 101 वेळा दुरुस्ती केल्या आहेत.

## अभ्यास

### I. गटात चर्चा करुन उत्तरे द्या.

1. संविधान दुरुस्ती म्हणजे काय?
2. भारतीय संविधान दुरुस्ती पद्धती कोणत्या?
3. साध्या बहुमताने दुरुस्ती पद्धत म्हणजे काय?
4. विशेष बहुमताने दुरुस्ती पद्धत म्हणजे काय?
5. भारतीय संविधान दुरुस्ती करण्याची तिसरी पद्धत वर्णन करा.

### II. चर्चा करा.

संविधानात दुरुस्ती का आवश्यक आहे या विषयी चर्चा करा.

☆ ☆ ☆

| पाठ 12 | ऑस्ट्रेलिया - अत्यंत समतल भूखंड |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठात ऑस्ट्रेलिया खंडाचे स्थान आणि आकारमान, त्याचे स्वाभाविक विभाग आणि नद्यांची व्यवस्था, हवामान, नैसर्गिक वनस्पती, उद्योगधंदे, पशुपालन, खनिजे आणि कारखानदारी, लोकसंख्यावाढ, विभागणी आणि घनता यांचा परिचय करुन दिलेला आहे.

सामर्थ्ये

1) जगाच्या नकाशात ऑस्ट्रेलियाचे स्थान, आकारमानाबाबत समजून घेणे.
2) ऑस्ट्रेलियाचे स्वाभाविक विभाग, नद्या, हवामान आणि वनस्पतीबद्धल जाणून घेणे.
3) या खंडातील शेती आणि पशुपालनाबाबत समजून घेणे.
4) विविध खनिजे आणि उद्योगधंदे यांचा परिचय करुन देणे.
5) लोकसंख्या विस्तार, वाढ, विभागणी आणि घनता याबाबत समजून घेणे.

## 1. ऑस्ट्रेलियाचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक आकारमान

**ऑस्ट्रेलियाचे स्थान:** ऑस्ट्रेलिया खंड पूर्णपणे दक्षिण आणि पूर्व गोलार्धामध्ये आहे. हा खंड $10^{o}45'$ दक्षिणपासून $43^{o}39'$ दक्षिण अक्षांश आणि $113^{o}9'$ पूर्व ते $153^{o}39'$ पूर्व रेखांशामध्ये विस्तारलेला आहे. या खंडाच्या मध्यभागातून मकर वृत्त जाते.

**विस्तार:** आकारमान व लोकसंख्या या दोन्हीमध्ये ऑस्ट्रेलिया जगात लहान खंड आहे. टास्मानिया द्विपासह त्याचे आकारमान 76.82 लक्ष चौ.कि.मी. आहे. अमेरिका संयुक्त संस्थानापेक्षा थोडेसे लहान व भारताच्या दुप्पट मोठे आहे. हा जगातील सातव्या नंबरचा खंड असून याचा दक्षिणोत्तर विस्तार 3,940 कि.मी. आणि पूर्वपश्चिम विस्तार 4,350 कि.मी. आहे. याच्या किनारपट्टीची लांबी 19,310 कि.मी आहे.




**ऑस्ट्रेलिया(राजकीय)**

ऑस्ट्रेलिया हा शब्द दक्षिण अशा अर्थास 'आस्ट्रल' (लैटीन) यापासून वापरात आला.

मध्य आणि दक्षिण पॅसिफिक महासागरातील सुमारे 10,000 द्विपांच्या समुहाला 'ओसिनिया' असे म्हणतात. यामध्ये ऑस्ट्रेलिया खंड मुख्य होय.

**भौगोलिक आकारमान :** ऑस्ट्रेलिया हिंदी महासागर आणि पॅसिफिक महासागरामध्ये असलेला द्विपखंड होय. या खंडाच्या वायव्येला तैमूर अवरुर समुद्र, ईशान्येला टोरेस आखात आणि आग्नेयेला टास्मन समुद्र आहे.

## 2. स्वाभाविक विभाग आणि नद्या

**स्वाभाविक विभाग :** ऑस्ट्रेलियाच्या एकूण आकारमानापैकी सुमारे 94 टक्के भाग समुद्रसपाटीपेक्षा 600 मी. खाली समतल आहे. यामुळे या खंडाला 'अत्यंत समतल भूखंड' असे म्हणतात. बराचसा प्रदेश पठारानी व्यापलेला आहे. यामुळे याला 'पठारांचा भूखंड' असेही म्हणतात.




**ऑस्ट्रेलिया (स्वाभाविक विभाग)**

ऑस्ट्रेलिया मूळतः गोंडवान भूमीचा एक भाग होता. याच्या भूस्वरुपावरुन याचे 3 स्वाभाविक विभागात विभागले आहे .

1. पूर्वेचा उंचवटयाचा प्रदेश
2. मध्य सखल मैदानी प्रदेश
3. पश्चिमेकडील पठारी प्रदेश

सतराव्या शतकात युरोपचा खलाशी जेम्स कूक याने आस्ट्रेलिया खंडाचा शोध लावला.

**1.पूर्वेकडील उंचवठ्याचा प्रदेश :** हा या खंडाच्या पूर्वभागात उत्तरेकडील यार्क शिखरापासून दक्षिणेकडील टास्मानियाच्या बास आखातापर्यंत विस्तारलेला आहे. ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनारपट्टीला समांतर असा हा पूर्वेकडील उंचवठयाचा प्रदेश पसरलेला आहे. हा प्रदेश म्हणजे उंच पठारांची एक रांगच होय. पश्चिमेकडील भाग उतरतीचा आहे. पूर्वी पूर्व किनारपट्टीकडून प्रवेश करणे कठीण होते. त्यामुळे याला 'ग्रेट डिवायडींग श्रेणी' असे म्हणत. या पर्वत श्रेणीतील न्यू साऊथ वेल्स मध्ये अनेक उंच शिखरे आहेत. याना 'ऑस्ट्रेलियाचे आल्प्स' आणि 'न्यू इंग्लंड श्रेणी' असे म्हणतात. उंच शिखरे हिवाळयात हिमाच्छादित होतात. या भागातील 'कोसियेस्को' (2230 मी.) हे सर्वात उंच शिखर होय.

ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनारपट्टीपासून दक्षिण किनारपट्टीपर्यंत 'ग्रेट बॅरियर रीफ' नावाची प्रवाळ रांग (2000 कि.मी.) आहे.

**2. मध्य सखल मैदानी प्रदेश :** उत्तरेकडील कार्पेंटेरीय दरीपासून दक्षिणेकेडील मरे मैदानापर्यंत हा सखल मैदानी प्रदेश विस्तारलेला आहे. पूर्व उंचवठयाच्या प्रदेशापासून पश्चिमेकडे आंतरिक जलव्यवस्था आहे. यामध्ये मध्यभागात असलेल्या 'ऐर' सरोवराकडे नद्या वाहतात. जगातील प्रसिद्ध आर्टिसियन पाण्याच्या विहिरी येथे आहेत.

हा सखल मैदानी प्रदेश 3 भागात विभागाला आहे.

1) मरेडार्लिंग मैदान

2) ऐर सरोवर मैदान

3) कार्पेंटेरीय मैदान.





आर्टिसियन विहिरी

मरे आणि डार्लिंग नद्याची मैदाने, उत्तरेला असलेले ऐर सरोवरापासून वेगळी आहेत. नद्यांच्या पाण्याच्या सोयीमुळे हा ऑस्ट्रेलियातील एक समृद्ध कृषी विभाग आहे. यामुळे उत्तरेकडील ऐर सरोवर मैदान विशाल आकाराचे आहे. येथे काही खारट पाण्याची सरोवरे आहेत.



मरे नदी



डार्लिंग नदी

याचा बहुतेक भाग नापीक प्रदेश झाला असल्यामुळे येथे विरळ लोकसंख्या आहे. फ्लींटर आणि मीचेल नद्या वाहत असलेले कार्पेंटरीय मैदान समतल आहे. हा प्रदेश ऐर नदीच्या मैदानी प्रदेशापासून बर्कले पठारी प्रदेश विभागला आहे.

**3. पश्चिमेचा पठारी प्रदेश :** हा प्रदेश कार्पेंटेरीय दरीपासून अनस्लो, पर्थ आणि अल्बेनिया पर्यंत पसरलेला आहे. हे पठार म्हणजे एक वाळवंटच बनलेले आहे. ग्रेट सँडी डेझर्ट, गीब्सन आणि विक्टोरिया वाळवंटी प्रदेश भारतातील दख्खनच्या पठाराइतका पुरातन आहे. येथे अनेक वाळूच्या टेकडया आहेत. ठिकठीकाणी खडकाळ टेकडया आहेत. यामध्ये खंडाच्या मध्यभागी असलेल्या मॅकडोनेल व मसग्रेव पर्वत रांगा आहेत.

**नद्या :** ऑस्ट्रेलियाचा जास्तीत जास्त भाग उष्ण आणि कोरडया हवामानाचा असल्यामुळे बराचसा भाग वाळवंटाने व्यापलेला आहे. यामुळे नद्या कमी असून त्यापैकी काही लहान व ठराविक ऋतूत वाहतात. समुद्राला मिळणाऱ्या नद्यापेक्षा सरोवराना मिळणाऱ्या नद्या जास्त आहेत. बहुतेक नद्या पूर्वेच्या उंच प्रदेशात उगम पावून पूर्वेकडे वाहतात.




ऑस्ट्रेलियातील नद्या

मरे ऑस्ट्रेलियाची प्रमुख नदी आहे. ही नदी न्यूसाऊथ वेल्समधील कोसियेस्को शिखराजवळ उगम पावून पूर्व आणि नैर्ऋत्येला वाहत (2,590 कि.मी) एनकाऊंटर दरीत

सामावते. डार्जलिंग, लाचलान आणि मरबीड्री या मरे नदीच्या उपनद्या होय. वर्षातील ठराविक ऋतूमध्येच या नद्यामधून नौकानयन शक्य आहे.

पूर्वाभिमुख वाहणाऱ्या नद्या लहान तसेच वेगाने वाहतात. उदा. हंटर, फिटजराय, व बेलियांडो, मिचेल, गिल्वर्ट आणि फ्लिडर्स या नद्या ईशान्य ऑस्ट्रेलियात वायव्येला वाहत कार्पेंटेरीय दरीत सामावतात. डॉली, व्हिक्टोरिया, फिटजराय इत्यादी नद्या उत्तर आणि वायव्येला वाहतात व तैमूर समूद्राला मिळतात. ऐरी सरोवराला मिळणाऱ्या अंतर्गत नद्यामध्ये कुपर क्रीक, डैंटीन व मायूंब या प्रमुख होत. मुर्चीसन व ब्लैकवूड या नद्या हिंदी महासागराला मिळतात.

ऑस्ट्रेलियात काही सरोवरे आहेत. यापैकी काही सरोवरात कमी व जास्त खारट सरोवरे आहेत. उदा. ऐर, टॉरेन्स, गेडनर इत्यादी. यापैकी ऐर सरोवर सर्वात मोठे व खंडाच्या अती सखल भागात आहे. यामुळे पश्चिम भागात जगातील विशाल शिला आहे.



*अयर्स (शिलाखंड)*



**एरी सरोवर**

## 3. हवामान आणि नैसर्गिक वनस्पती

**हवामान :** ऑस्ट्रेलियाच्या मध्यातून मकर वृत्त गेले आहे. यामुळे ऑस्ट्रेलियात उष्ण व कोरडे हवामान असते. ऑस्ट्रेलियात बहुतेक भागात वर्षभर अधिक उष्णता असते. पश्चिम किनारपट्टीवर शीत सागर प्रवाह वाहतो. यामुळे ऑस्ट्रेलियाचा पश्चिम भाग पठारी प्रदेश व कोरडया हवामानाचा आहे. उत्तरेला मान्सून आणि दक्षिणेला किनारपट्टीवर मेरीटरेनियन प्रकारचे हवामान असते.




**ऑस्ट्रेलियातील नैसर्गिक वनस्पती**

**हिवाळा :** ऑस्ट्रेलिया खंड दक्षिण गोलार्धामध्ये असल्यामुळे ऋतुकालमान उत्तर गोलार्धाच्या विरुद्ध असते. म्हणजे उत्तर गोलार्धात उन्हाळा असताना येथे हिवाळा असतो. उदा. जून पासून ऑगस्ट पर्यत उष्णांश कमी असते. उत्तरेपासून दक्षिणेकडे उष्णता कमी असते पण दाबजास्त असतो. वारे आतून समुद्राकडे वाहतात. यामुळे जास्त पाऊस आणत नाहीत. उष्ण व कोरडे हवामान असते. टास्मानियात वेगळे हवामान असते.

**उन्हाळा :** ऑस्ट्रेलियात उन्हाळा डीसेंबर पासून फेब्रुवारीपर्यंत असतो. या काळात उष्णतामान जास्त असते. खंडाच्या पूर्व भागापेक्षा पश्चिमेकडील वाळवंटी प्रदेशात तापमान अधिक असते. दक्षिण, आग्नेय भाग व टास्मानिया द्विपामध्ये साधारण उष्णतामान असते. अंतर्गत भागात दाब कमी असल्यामुळे समुद्राकडून वारे वाहतात. कमी पाऊस आणतात. खंडाच्या दक्षिण व आग्नेय भागात जास्त पाऊस पडतो.

**नैसर्गिक वनस्पती व प्राणी :** ऑस्ट्रेलिया खंडात घनदाट जंगले नाहीत. खंडाच्या बहुतेक भागात गवताळ कुरणे, खुरट्या वनस्पती विरळ आढळतात. या खंडाचे हवामान प्रतिबिंबीत करतात. ऑस्ट्रेलिया खंडातील विविध नैसर्गिक वनस्पती वर्ग खालील प्रमाणे.

**1. उष्ण कटिबंधातील अरण्ये :** ऑस्ट्रेलियाच्या उत्तर व ईशान्य किनारपट्टीवर जास्त पाऊस पडत असल्यामुळे तेथे मोठया प्रमाणात अरण्ये दिसून येतात. पण त्याचा आकार कमी आहे. येथील ॲश, निडार, बीच व ताळे या प्रमुख वनस्पती होत.

**2. समशीतोष्ण कटिबंधातील अरण्ये :** अशा प्रकारची अरण्ये पर्वत आणि टेकडयांवर आढळून येतात. यामुळे याना ‘‘ डोंगर प्रदेशातील अरण्ये’ असेही म्हणतात. अशी अरण्ये क्विन्सलँड, न्यूसाऊथवेल्स, व्हिक्टोरिया आणि टास्मेनिया मध्ये विभागली आहेत.

येथील प्रमुख नैसर्गिक वनस्पती : निलगिरी, पाईन इत्यादी यांचा वापर प्रामुख्याने तेलासाठी व कागदासाठी करतात.

**3. गवताळ कुरणे :** ऑस्ट्रेलिया गवताळ कुरणामध्ये दोन प्रकार आहेत

i) उष्ण कटिबंधातील गवताळ कुरणे (सॅव्हाना)

ii) समशितोष्ण कटिबंधातील गवताळ कुरणे अथवा डाऊन्स.

पहिल्या प्रकारची गवताळ कुरणे पूर्वेकडील उंचवठ्याच्या प्रदेशात, पश्चिमेकडील क्वीन्सलँड, उत्तर ऑस्ट्रेलियाचा मध्यभाग आणि पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या उत्तर भागात आढळतात. दुसऱ्या प्रकारची गवताळ कुरणे ‘मरे-डार्लींग’ नदीच्या मैदानी प्रदेशात विस्तारलेली आहेत. ही कुरणे पशुपालनास उपयुक्त आहेत. समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ कुरणामध्ये विचेल आणि अट्रीवल गवताचे प्रकार पहावयास मिळतात



सॅव्हाना गवताळ प्रदेश



डाऊन्स गवताळ प्रदेश

**4. खुरटया वनस्पती :** या वनस्पती पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या दक्षिण व पश्चिम भागात, दक्षिण ऑस्ट्रेलिया तसेच क्विन्सलँडच्या काही भागात आढळतात. पावसाच्या कमी प्रमाणामुळे खुरटया वनस्पती वाढतात. यामध्ये काटेरी वनस्पती जास्त प्रमाणात असतात. तसेच काही ठिकणी निलगिरी, निवडुंग आणि काटेरी वनस्पती वाढतात.

**5. वाळवंटी वनस्पती :**पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या मध्यभागात आणि पूर्वभागात या वनस्पती आढळतात. यामध्ये खुरटी झाडे, साल्टबूश, कमी उंचीचे गवत आणि विविध प्रकारचे निवडुंग वाढतात. या वनस्पती दुष्काळात सुध्दा तग धरुन राहतात.



ॲश



सिडार



ताल



निलगिरी

**6. प्राणी:** ऑस्ट्रेलियामध्ये जगात कोठेही न आढळणारे अमूल्य व विचित्र प्राणीपक्षी आहेत. प्लाटिपस नावाचा सस्तन प्राणी अंडी घालतो आणि पिलाना स्तनपान करतो. कांगारु हा आपल्या पिलाना पोटाच्या वर असलेल्या पिशवीत वाढवितो. एमू हा ऑस्ट्रेलियातील अती मोठा पक्षी होय. लैर नावाचा मोरासारखा सुंदर पक्षी येथे आढळतो. विचित्र हसण्यासारखा आवाज काढणारा कूकाबुर, काळया रंगाचे हंस इत्यादी पक्षी येथे पाहावयास मिळतात. पण येथील राष्ट्रीय प्राणी कांगारु हा होय. डिंगो नावाचा

रानटी कुत्रा येथे आढळतो. वल्लभी, एकिडन, झाडावर चढणारा लहान आकाराचा कोआला इत्यादी. ऑस्ट्रेलियात अनेक जातीचे सरपटणारे प्राणी व विषारी साप आहेत.



कांगारु



वल्लभी



डिंगो



करडीकोल



एमू



काळा हंस

ऑस्ट्रेलिया ''विलक्षण प्राणी पक्षांचा देश' - येथील सुमारे 60% प्राणी पक्षी जगात इतरत्र आढळत नाहीत.

## 5. शेती व पशुपालन

**शेती :** शेती हा ऑस्ट्रेलियातील एक प्रमुख व्यवसाय होय. येथे शेती जमीन कमी आहे. या खंडाच्या विस्तारापैकी फक्त 4% जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. ही जमीन समुद्र किनारपट्टी व नद्यांच्या किनाऱ्यावर आढळून येते. एकूण लोकसंख्येच्या 4.4% लोक शेती करतात.

पावसाचा अभाव आणि असमान विभागणी, नापीक जमीन, कृषीयोग्य कमी जमीन आणि पाण्याच्या कमतरतेुळे कृषी क्षेत्र कमी आहे. तरीसुद्धा देशाला पुरेल इतके धान्य उत्पादित करतात. त्यामुळे ते स्वावलंबी आहेत.

ऑस्ट्रेलियात शेतीचे मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण झाले आहे. निर्यात करण्याच्या उद्देशाने व्यापारी पिके जादा पिकवितात. येथे विविध प्रकारची पिके पिकवितात. उदा. गहू, ऊस, कापूस, तंबाखू, मका, जोंधळा, विविध प्रकारची फळे आणि भाज्या.

गहू हे ऑस्ट्रेलियाचे प्रमुख आहार धान्य आहे. हे पीक दक्षिण ऑस्ट्रेलिया, क्विन्सलँड, न्यूसाउथ वेल्स आणि विक्टोरियामध्ये पिकवितात. मरे डार्लिंग नद्याची मैदाने गहूसाठी प्रसिद्ध आहेत. ऑस्ट्रेलिया आपल्या गहू उत्पादनापैकी 70% निर्यात करतो.

मका हे आणखी एक आहार धान्य. याचा जनावरांचा आहार तयार करण्यासाठी उपयोग करतात. मका क्विन्सलँड आणि न्युसाउथवेल्स मध्ये जास्त प्रमाणात पिकवितात. मरे-डार्लिंगच्या मैदानी प्रदेशात काही ठिकाणी कमी प्रमाणात भात पिकवितात.



गहू



ऊस



तंबाखू



*कापसाचे पीक*



*सफरचंदाचे पीक*

ऊस हे ऑस्ट्रेलियातील प्रमुख व्यापारी पीक आहे. हे पीक जास्त प्रमाणात पूर्व किनारपट्टीवरील उत्तर न्यूसाऊथवेल्स पासून क्विन्सलँड पर्यंतच्या प्रदेशात पिकवितात.

तंबाखू हे दुसरे व्यापारी पीक क्विन्सलँड मध्ये जास्त प्रमाणात पिकवितात. विविध प्रकारची फळे आणि भाज्या टास्मानिया, विक्टोरिया आणि साउथवेल्समध्ये पिकवितात.

**पशुपालन** : हा ऑस्ट्रेलियातील प्रमुख व्यवसाय आहे. ऑस्ट्रेलिया 'पशुपालन देश' म्हणून प्रसिद्ध आहे. दूध उत्पादन, मांस, लोकर आणि चामडयांच्या वस्तूसाठी मेंढया व गुरे पाळतात.

मेंढयापालन हा ऑस्ट्रेलियातील प्रमुख आर्थिक व्यवसाय आहे. जगामध्ये सर्वात जास्त मेंढया ऑस्ट्रेलियात आढळून येतात. या पासून लोकरीचे उत्पादन घेऊन निर्यात केली जाते. विशाल गवताळ कुरणे, आर्टिशियन विहिरीमुळे पाण्याची व्यवस्था, शीत व कोरडे हवामान यामुळे मेंढयापालनाचा विकास झाला आहे. येथे असणाऱ्या मेंढयामध्ये सुमारे 75% मेंढया 'मेरिनो' जातीच्या आहेत. या पासून उत्तम जातीची लोकर मिळते. विशाल मेंढयापालन प्रदेशाला 'मेढयापालन प्रदेश' म्हणतात.



मेंढीपालन

गुराढोरांना प्रामुख्याने मांसासाठी व दूधाच्या उत्पादनासाठी पाळतात. सॅव्हाना प्रदेशात मांसासाठी आणि समशीतोष्ण कटिबंधातील डाऊन्स गवताळ कुरणाच्या प्रदेशात दूध उत्पादनासाठी गुरांची पैदास केली जाते.

## 6. खनिजे व उद्योगधंदे

**खनिजे:** खनिज पदार्थांच्या बाबतीत ऑस्ट्रेलिया समृद्ध आहे. लोखंड, बॉक्साईट, निकेल, तांबे, मॅगनिज, सोने, शिसे आणि युरेनियम ही प्रमुख खनिजे येथे सापडतात. त्याचबरोबर दगडी कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू ही इंधन खनिजेही मिळतात. यापैकी अनेक खनिजांची निर्यात करतात.

ऑस्ट्रेलिया हा लोखंड उत्पादन करणारा प्रमुख देश आहे. जास्त प्रमाणात लोखंडाची निर्यात जपानला करतात.

जगात जास्त बॉक्साईटचे साठे ऑस्ट्रेलियात आहेत. पश्चिम ऑस्ट्रेलियातील कुलगार्डी व काल्गोर्डी सोने उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. व्हिक्टोरिया, न्यू साइथवेल्स आणि क्विन्सलँडच्या काही भागात सोने सापडते. त्याप्रमाणे शिसे आणि ही खनिजेसुद्धा मिळतात.

न्यूसाउथ वेल्समध्ये जास्त तांबे उत्पादित केले जाते. त्याचप्रमाणे कार्पेंटेरीय दरीच्या प्रदेशात मॅगनीज उत्पादन करण्यात अग्रेसर आहे.

ऑस्ट्रेलियात अत्याधिक प्रमाणात युरेनियमचे साठे आहेत. ते जास्त प्रमाणात उत्तर प्रांत (60%), पश्चिम ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण ऑस्ट्रेलियामध्ये आढळतात.

**उद्योगधंदे** : ऑस्ट्रेलिया हा जगातील एक प्रमुख औद्योगिक खंड आहे. खनिज संपत्ती, कृषी अभिवृद्धी, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती, विदेशी भांडवल गुंतवणूक आणि विशाल व्यापार बाजारपेठ या गोष्टी उद्योगधंदयासाठी पूरक आहेत. प्रारंभापासूनच ऑस्ट्रेलियाने उद्योगधंद्यात विदेशी निती अवलंबिली आहे. पण यामध्ये जपानचा सहभाग जास्त आहे. प्रमुख उद्योगधंदे व उत्पादन केंद्र खालील प्रमाणे.

* लोखंड व पोलाद उद्योगधंदे
* स्वयंचलित वाहन उद्योग
* वस्त्रोद्योग
* विद्युत उपकरणे
* जहाज निर्माण
* कागद, रद्द व फळे
* तेल शुद्धीकरण



सिडनी उद्योगधंद्याचे नगर

इतर उद्योग धंदे म्हणजे विमान तयार करणे (सिडनी मेलबोर्न) पिटाची गिरणी, मासे व फळ प्रक्रिया उद्योग, रासायनिक वस्तू तयार करणे हे होत.

## 7 लोकसंख्या

**वाढ:** आजपर्यंत उपलब्ध माहितीप्रमाणे ऑस्ट्रेलिया खंड आकारमानाने व लोकसंख्येच्या दृष्टीनेसुद्धा लहान आहे. येथील एकूण लोकसंख्या 20.0 मिलियन (2012) आहे. ही जगाच्या लोकसंख्येच्या 0.31% एवढीच आहे. या खंडाची लोकसंख्या 1860 मध्ये 1.15 मिलियन होती. 1998 मध्ये 18.7 मिलियन होती. मागील शतकाच्या शेवटी खंडाची लोकसंख्या वाढल्याचे दिसून येते.

**विभागणी :** ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्या विभागणीमध्ये विरळता व असमानता दिसून येते. खंडाचा अंतर्गत भाग निर्जन आहे. साउथवेल्समध्ये लोकसंख्येची घनता जास्त (1/3) आहे. व्हिक्टोरिया दुसऱ्या स्थानी (1/4) आहे. क्विन्सलँड, दक्षिण ऑस्ट्रेलिया

आणि टास्मानिया याचा नंतर क्रमांक लागतो. उत्तर प्रांतात अगदी विरळ लोकवसती आहे. देशातील लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षा जास्त लोक 6 शहरामध्ये वास्तव्य करतात. उदा. सिडनी, मेलबोर्न, ब्रिस्बेन, ॲडीलेड, पर्थ आणि न्यूकॉसल.

**लोकसंख्येची घनता :** जगात अती कमी लोकसंख्येची घनता असलेल्या देशापैकी ऑस्ट्रेलिया एक होय. येथील सरासरी लोकसंख्येची घनता 3 लोक प्रती चौरस किलोमीटर इतकीच आहे. ही एका प्रदेशापेक्षा इतर प्रदेशात भिन्न आहे. सर्व शहरामध्ये राजधानी आणि उद्योगधंद्याच्या केंद्रात लोकसंख्येची घनता जादा आहे. उदा. विक्टोरिया, न्यूसाउथवेल्स, टास्मानिया, क्विन्सलँड इत्यादी. या खंडाच्या आग्नेय भागात साधारण आहे. परंतु वाळवंटी व उपवाळवंटी प्रदेशात म्हणजे 80% भागात लोकसंख्येची घनता फार कमी आहे. ऑस्ट्रेलियातील 15% लोक खेडयात तर 85% लोक शहरात राहतात.




ऑस्ट्रेलिया लोकसंख्या घनता

### नवीन शब्द

द्विपखंड, गोंडयान, एकशिला, कांगारु, लैर, डींगो, कूकाबूर, वल्लभी, एकीडन.

## अभ्यास

### I. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1 ऑस्ट्रेलियाला अत्यंत समतल भूखंड का म्हणतात?

2 ऑस्ट्रेलियाचे स्थान व आकारमान सांगा.

3 ऑस्ट्रेलियाचे प्रमुख स्वाभाविक विभाग कोणते ?

4 ऑस्ट्रेलियातील नद्याबातत माहिती लिहा.

5 ऑस्ट्रेलियातील प्रमुख पिके कोणती ?

6 ऑस्ट्रेलियातील प्रमुख खनिजे कोणती ?

7 ऑस्ट्रेलिया प्रमुख उद्योगधंदयाबद्धल माहिती लिहा.

8 ऑस्ट्रेलियातून निर्यात होणाऱ्या वस्तू कोणत्या?

9 ऑस्ट्रेलियात लोकसंख्या विरळ का आहे?

10 ऑस्ट्रेलियातील गवताळ कुरणांची नावे लिहा.

### कृती

1. ॲटलास पुस्तकाच्या सहाय्याने ऑस्ट्रेलिया खंडातील प्रमुख पर्वत, नद्या आणि सरोवर यांची यादी कर आणि नकाशात दाखव.

2. तू ज्या भागात राहतोस त्या भागाचे निरिक्षण करुन तेथील पिके, वनस्पती, प्राणी-पक्षी याबाबत यादी तयार कर.

☆ ☆ ☆

| पाठ 13 | अंटार्क्टिका – पांढरा भूखंड |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठात अंटार्क्टिका खंडाचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक स्थान, स्वाभाविक लक्षणे, नैसर्गिक वनस्पती व प्राणी संपत्ती, संशोधन, अंटार्क्टिका करार आणि प्रमुख संशोधन केंद्राबाबत परिचय करुन देण्यात आला आहे.

## सामर्थ्ये

1. अंटार्क्टिका खंडाचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक स्थान समजून घेणे.
2. अंटार्क्टिका खंडाची प्राकृतिक लक्षणे, जमीन आणि पाणी याबाबत जाणून घेणे.
3. नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी संपत्ती समजून घेणे.
4. अंटार्क्टिका खंडावरील मोहीम, करार आणि संशोधन केंद्राबाबत जाणून घेणे.

## 1. अंटार्क्टिका खंडाचे स्थान, विस्तार व भौगोलिक स्थान

**स्थान :** दक्षिण ध्रुवासभोवती अंटार्क्टिका खंड पसरलेला आहे. तो अंटार्क्टिका वृत्त अथवा $66^0$, $30'$ दक्षिण अक्षांशामध्ये पसरलेला आहे. उत्तर ध्रुवावरील आर्क्टिक सागराच्या विरुद्ध असा हा भूखंड आहे.

**विस्तार :** अंटार्क्टिका हा जगातील पाचव्या क्रमांकाचा मोठा खंड आहे. याचे एकूण आकारमान 14.2 मिलियन चौरस किलो मीटर आहे. याचे आकारमान भारत आणि चीन देशाच्या आकारमानापेक्षा जास्त व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानच्या विस्ताराच्या दिडपट आहे.

**भौगोलिक स्थान :** अंटार्क्टिका खंडाच्या सभोवती बर्फाच्या थरानी व्यापलेला आहे. या जलराशीला दक्षिणसागर म्हणतात. पण हा स्वतंत्र नसून हिंदीमहासागर आणि पॅसिफीक महासागरात सामावलेला भाग होय. लॅटीन अमेरिकेतील दक्षिण टोकावरील केपहारन हे या खंडाच्या जवळचे ठिकाण 900 कि.मी. दूर आहे. या खंडाच्या पूर्वेला हिंदी महासागर, पश्चिमेला पॅसिफिक महासागर आणि वायव्येला अटलांटिक महासागर आहे.




अंटार्क्टिका खंड

## 2. प्राकृतिक लक्षणे

अंटार्क्टिका खंडाचा 98% भाग बर्फाच्या थरानी व हिमनगानी व्यापलेला आहे. यामध्ये बर्फाच्छादीत पर्वत, पठारे, सखलप्रदेश व दऱ्या आहेत. बर्फाचा थर सुमारे 2300 मीटर आहे. सगळीकडे पांढराशुभ्र बर्फच बर्फ. म्हणून या खंडाला 'पांढरा खंड' असे म्हणतात. येथील हवामान अत्यंत थंड असल्यामुळे 'शीतखंड' असेही म्हणतात.



हिमखंड

या खंडावर पर्वत, पठारे, दऱ्या, सखलप्रदेश आहेत. समुद्र सपाटीपासून या खंडाची सरासरी उंची 2,300 मीटर आहे. अंटार्क्टिका पृथ्वीवरील उंचावरील खंड आहे. ट्रान्स अंटार्क्टिक पर्वत श्रेणीनी या खंडाला दोन विभागात विभागले आहे (i) पूर्व अंटार्क्टिका व (ii) पश्चिम अंटार्क्टिका.

**i) पूर्व अंटार्क्टिका:** अटलांटिक व हिंदी महासागर याना जोडलेला आहे. याने या खंडाचा अर्ध्यापेक्षा जास्त भाग व्यापलेला आहे. म्हणून याला 'ग्रेटर अंटार्क्टिका' म्हणतात. याच्या किनारपट्टीवर पर्वत, दऱ्या आणि हिमनद्या आहेत. याच्या मध्यावर पठारे आहेत. तेथे दक्षिण ध्रुवाची जमीन आहे.

**ii) पश्चिम अंटार्क्टिका:** हा भाग पॅसिफिक सागराकडे आहे. याचा बराचसा भाग समुद्रसपाटीपेक्षा खाली आहे. या भौगोलिक भागाचा अंटार्क्टिक पर्यायी भाग पर्वतानी व्यापलेला आहे. याच्या 'S' आकाराची टोके अमेरिकेकडे टोकदार आहेत. याच्या सभोवती काही द्वीपसमुह आहेत. तसेच पर्वत शिखर व ज्वालामुखी आहेत. या भागातील 'एल्सवर्त' पर्वत श्रेणीतील 'विन्सन मॅसिफ' (5140 मी.) हे अंटार्क्टिकामधील सर्वात उंच शिखर आहे. रॉस द्वीपसमुहात असलेल्या 'माऊंट एरेबस' हा एकमेव जागृत ज्वालामुखी होय. तसेच प्रीन्स चार्लस हा आणखी एक पर्वत आहे. ट्रान्स अंटार्क्टिका पर्वत श्रेणीच्या विरुद्ध टोकाना दोन मोठया खाडया आहेत. त्या म्हणजे रॉस समुद्र आणि वेड्डेल समुद्र.

## 3. वनस्पती आणि प्राणी संपत्ती

यापूर्वीच्या माहितीप्रमाणे अंटार्क्टिका खंड हिमाच्छादीत असतो. प्रतिकूल असे शीत हवामान असते. वर्षातील 6 महिने अंधार व 6 महिने प्रकाश असतो. येथे सजीव राहणे कष्टकर आहे. शेवाळ, दगडफूल या येथील प्रमुख वनस्पती होत. या वनस्पती किनारपट्टीवर आढळून येतात.

येथील प्रतिकूल वातावरणाशी सामना करत काही प्राणी जीवन जगतात. पण सभोवतालच्या सागरात विविध प्राणी राहतात. उदा. पेंग्वीन, तिमिंगल, सील, क्रील मासे आणि तऱ्हेतऱ्हेचे पक्षी. सिगडी मासे आणि क्रीलमासे भरपूर आढळतात.

ते गटागटाने पोहत राहतात. असे लहान मासे समुद्रातील मोठया माशांचा मुख्य आहार असतो.

समुद्राच्या काठावर असंख्य पेंग्वीन राहतात. हे पेंग्वीन पक्षी उडू शकत नाहीत. एंपरक आणि चीन स्क्राप या येथील पेंग्वीनच्या जाती आहेत. या हिमाच्छादित खंडात येणाऱ्या जहाजांचे सर्वप्रथम स्वागत येथील पेंग्वीन करतात. या खंडाच्या जवळील द्विपसमुह व समुद्र किनाऱ्यावर सील मासे जास्त प्रमाणात राहतात. सहा प्रकारचे सील मासे आहेत.



पेंग्वीन



सील

● पेंग्वीन आपल्या संतानाभिवृद्धीसाठी दगड, कपारीमध्ये तयार केलेल्या घरांना 'रुकरी' म्हणतात.

● दक्षिण ध्रुवाजवळ असणाऱ्या 'वोस्टाक' येथे जगातील सर्वात कमी तापमान नोंद झाले आहे. ($-89^{\circ}C$)

## 4.4 अंटार्क्टिका मोहिम अंटार्क्टिका करार

अठराव्या शतकाच्या उतरार्धापासून अंटार्क्टिका खंडाबाबत संशोधन चालू आहे. काही सागर साहसवीरांनी या खंडाच्या शोधासाठी मोहिमा आखल्या. अशापैकी ब्रिटीश संशोधक जेम्स क्लार्करॉस याने 1841 मध्ये या खंडातील रॉस समुद्राचा शोध लावला. इंग्लंडच्या रॉबर्ट फाल्कन स्कॉट याने हा समुद्र पार करण्यात यशस्वी झाला. या संशोधकानी उन्हळ्याच्या उत्तरार्धात या समुद्रमार्गे या खंडात प्रवेश केला त्यानंतर हिवाळ्यातील मोहिमा आखल्या.

अंटार्क्टिका खंडातील समस्त संशोधन मोहिमा 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात हाती घेण्यात आल्या. 1909 मध्ये इंग्लंडच्या फाकल्पन याने दक्षिणेचा ध्रुवप्रदेश शोधून काढला. नॉर्वेचा रॉल्ड अमुंडसेन हा 1911 साली दक्षिण ध्रुवावर पोहचला. 1912 मध्ये रॉबर्ट फाल्कनस्कॉटन सुद्धा त्याच ध्रुवावर जाऊन परत येताना मरण पावला. त्याच्या दैनंदिन वहीतील नोंदीमुळे पुढे वैज्ञानिकाना संशोधनात फार मोलाचे मार्गदर्शन मिळाले. अमेरिकन नौकादलाचा ॲडमिरल रीचर्ड बेयर्ड याने या खंडाच्या संशोधनासाठी विमानाद्वारे सर्वप्रथम (1929) तेथे पोहचला. तेव्हापासून या खंडाच्या अभ्यासासाठी अनेक देश पुढे आले आहेत.



स्कॉट आणि अमुंडसन

अंतरराष्ट्रीय भू भौत वर्ष 1957-58 पर्यंत अंटार्क्टिका खंडावर व्यापक संशोधनात बरीच प्रगती झाली. जगातील अनेक वैज्ञानिकानी मोहिमा आखून अध्ययनाचा प्रयत्न केला. बारा राष्ट्रातील प्रतिनिधीनी एकत्र येऊन वॉशिंगटन डी.सी. (U.S.A.) मध्ये 1959 मध्ये अंटार्क्टिका खंड करार पत्र तयार केले. 23 जून 1961 साली या करारावर सहया केल्या करार 600 अक्षाशाला लागू केला. अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेल्जीयम, चिली, फ्रान्स, जपान, न्यूजिलंड, नॉर्वे, दक्षिण आफ्रिका, रशिया, इंग्लंड, अमेरिका ही सदस्य राष्ट्रे होती.




आधुनिक संशोधन केंद्र

**अंटार्क्टिक करार:** या करारानुसार या खंडावर फक्त वैज्ञानिक संशोधन करण्याचे ठरविण्यात आले. म्हणून या खंडाला'वैज्ञानिक भूखंड' असे म्हणतात. या करारानुसार येथे अण्वस्त्र चाचणी घेण्यास बंदी आहे. कोणत्याही देशाचे येथील जमिनीवर, पाण्यावर स्वामीत्व राहणार नाही. येथे परिसर प्रदूषण करायचे नाही. या खंडावर संशोधनासाठी येणाऱ्यानी कोणत्याही प्रकारचे जीव या ठिकाणी आणायचे नाहीत. तिमींगलना भेटण्यास मनाई आहे. देशानी येथे मिळविलेल्या वैज्ञानिक माहीतीची देवाणघेवाण करावी. येथील नैसर्गिक संपतीचे रक्षण केले पाहिजे. एकूणच या खंडावर शांती राखली पाहिजे.





**बर्फाच्छादित खंडात संशोधन**

अंटार्क्टिका खंडात जगातील गोडपाण्याच्या साठयापैकी 90% पाणी हिमनगाच्या स्वरुपात आहे.

## 5. प्रमुख संशोधन केंद्र

अंटार्क्टिकामध्ये अनेक देशानी आपली वैज्ञानिक केंद्रे स्थापन केली आहेत. या खंडाचा उगम आणि भूरचना, हवामानाची परिस्थिती, जीवपरिसर व्यवस्था, जैविक विविधता आणि संरक्षण तेथील परिसर प्रदूषण आणि उपाययोजना, टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट व वापर, तेलगळतीमुळे होणारे अपघात आणि त्याबाबत घ्यावयाची काळजी मुख्य आहेत. याबाबत संशोधन करण्यासाठी जगातील अनेक राष्ट्रांनी आपली संशोधन केंद्रे तेथे स्थापन केली आहेत.





**मैत्री – भारतीय संशोधन केंद्र**



**"भारती" - भारतीय संशोधन केंद्र**

आपल्या भारत देशाने सुद्धा आपले संशोधन केंद्र या खंडात स्थापन केले आहे. सर्व प्रथम 6 डिसेंबर 1981 रोजी एस.झेड. रासीर यांच्या नेतृत्वाखाली वैज्ञानिकांचा गट गोव्यातून मोहिमेवर निघाला. हा गट ओल्ड पोलार सर्कल जहाजाच्या सहाय्याने 9

जानेवारी 1982 रोजी अंटार्क्टिका खंडावर पोहचला. भारताने 'दक्षिण गंगोत्री' नावाचे संशोधन केंद्र स्थापन केले आहे.

हे केंद्र 1983 साली स्थापन करण्यात आले आणि या केंद्राचे 1989 ला नामकरण करण्यात आले. आता हे केंद्र मानवरहीत असून याचा साठवणुकीसाठी वापर करतात.

पहिल्या मोहीमेच्या यशस्वीतेनंतर आतापर्यंत सुमारे 50 वेळा भारताचे संशोधक गट अंटार्क्टिका खंडावर जाऊन आले आहेत. भारताचे 'मैत्री' नावाचे दुसरे संशोधन केंद्र होय. हे शिर्माचर ओयॉसीस येथे निर्माण केले आहे (1988-89). या केंद्रात वर्षभर कोणत्याही ऋतूत आणि 26 जणाना राहण्याची व्यवस्था आहे. येथून 255 मीटर अंतरावर गोड पाण्याच्या पुरवठयासाठी 'प्रियदर्शिनी' नावाचे सरोवर भारताने निर्माण केले आहे. मैत्री केंद्रात भूविज्ञान, भूगोल शास्त्र आणि औषधांबाबत संशोधन चालते. 'भारती' नावाचे आणखी एक संशोधन केंद्र अंटार्क्टिकामध्ये स्थापन्याची योजना भारताने आखली आहे. याचा मुख्य उद्देश सागर संशोधनाचा आहे. आवश्यक सर्वेक्षणसुद्धा केले आहे.

### नवीन शब्द

पांढरा खंड, शीत खंड, विन्सन मासिफ, एरेबस, पेंग्वीन, तिमींगल, सील, पानकीडा, चीनस्क्रास, क्रील, भूभौत, दक्षिण गंगोत्री, मैत्री, भारती.

## अभ्यास

### I. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1 अंटार्क्टिका खंडाचे स्थान व आकारमान सांगा.

2 अंटार्क्टिका खंडाचे भौगोलिक स्थान सांगा.

3 अंटार्क्टिका खंडाला 'पांढरा खंड' असे का म्हणतात?

4 अंटार्क्टिका खंडातील प्रमुख पर्वत व शिखरे सांगा.

5 अंटार्क्टिका खंडातील वनस्पती आणि प्राण्यांची नावे सांगा.

6 अंटार्क्टिका खंडात असलेल्या भारतीय संशोधन केंद्रांची नावे सांगा.

### कृती

1. अंटार्क्टिका खंडात विविध देशानी स्थापन केलेल्या संशोधन केंद्रांच्याछायाचित्रांचा संग्रह कर आणि यादी तयार कर.
2. अंटार्क्टिका खंडात आढळणाऱ्या विविध वनस्पती आणि प्राणी यांची यादी कर. त्यांच्या चित्रांचा संग्रह कर.

☆ ☆ ☆